अव्याकरणमधीतं भिन्नद्रोण्या तरंगिणीतरणम् ॥
भेषजमपथ्यसहितं त्रयमिदमकृतं वरं न कृतम् ॥ २५८ ॥

" व्याकरणावांचून केलेलें अध्ययन, फुटक्या नावेनें नदी तरून जाणें व पथ्याशिवाय औषधाचें सेवन,—या तीन गोष्टी न केलेल्या बऱ्या. "

घटं भिंद्यात्पटं छिंद्यात्कुर्याद्वा रासभस्वरम् ॥
येन केन प्रकारेण प्रसिद्धः पुरुषो भवेत् ॥ २५९ ॥

" चव्हाट्यावर जाऊन घागर फोडून टाकावी, वस्त्रें फाडीत बसावें, किंबहुना गर्दभासारखा स्वरही काढावा; पण कोणत्या तरी रीतीनें पुरुषानें लोकप्रसिद्ध व्हावें ! "

चित्रं तपति राजेंद्र प्रतापतपनस्तव ॥
अनातपत्रमुत्सृज्य सातपत्रं द्विषद्गणम् ॥ २६० ॥

" हे राजा ! तुझ्या प्रतापसूर्याचा हा काय चमत्कार आहे पहा, कीं ज्याच्या डोक्यावर छत्र नाहीं त्यास सोडून छत्र धारण करणाऱ्या शत्रूसच तो ताप देतो. " हा विभावनालंकार होय.

मृत्युः शरीरगोप्तारं वसुभाजं वसुंधरा ॥
दुश्चारिणीव हसति स्वपतिं पुत्रलालनात् ॥ २६१ ॥

" ज्याप्रमाणें जारिणी स्त्री आपल्या पतीस पुत्रलालन करतांना पाहून हंसते, त्याप्रमाणें मृत्यु हा शरीराची जोगवण करणाऱ्या मनुष्यास व भूमि धनरक्षण करणारास हंसते ! "

साह्लादं वचनं प्रयच्छसि न मे नो वांछितं यच्छसि
प्रायः प्रोच्छ्वसिषि द्रुतं हुतवहज्वालासमं रात्रिषु ॥
कंठाश्लेषपरिग्रहे शिथिलता यन्नादराच्चुंबसे
तत्ते धूर्त हृदि स्थिता प्रियतमा काचिन्ममेवापरा ॥ २६२ ॥

कोणी मानिनी रागानें आपल्या वल्लभास म्हणतेः—" तूं माझ्याशीं आल्हादयुक्त भाषण करीत नाहींस, मला इष्ट विचारीत नाहींस, रात्रीं तुझे निरंतर उष्ण निश्वास चाललेले असतात, कंठालिंगनाचे ठायीं शिथिलता दृष्टीस पडते व अधरपानाविषयींही तुझी आसक्तता दिसत नाहीं; तेव्हां हे धूर्ता !

या सर्व चिन्हांवरून मी असें समजतें कीं, कोणी माझ्याहून निराळी प्रियतमा तुझ्या हृदयाचे ठायीं वास करीत असावी ! ”

स्मर्तव्योऽहं त्वया कांते न स्मरिष्याम्यहं तव ॥
स्मरणं चेतसो धर्मस्तच्चेतो भवता हृतम् ॥ २६३ ॥

“ हे कांते ! तूंच माझें स्मरण करावें, मला तुझें स्मरण होणार नाहीं; कां तर, स्मरण हें चित्ताचा धर्म होय आणि चित्तच मुळीं तूं हरण करून टाकलें आहेस ! ”

सर्वस्वापहरो न तस्करगणो रक्षो न रक्ताशनः
सर्पो नैव बिलेशयोऽखिलनिशाचारी न भूतोऽपि च ॥
अंतर्धानपटुर्न सिद्धपुरुषो नाप्याशुगो मारुत-
स्तीक्ष्णास्यो न तु सायकस्तमिह ये जानंति ते पंडिताः ॥२६४॥

“ सर्वस्वाचें हरण करणारा (पक्षीं, सर्व निद्रा घालवणारा) असून तस्कर नव्हे, रक्ताचें प्राशन करीत असून राक्षस नव्हे, बिळांत दडून असणारा असून सर्प नव्हे, निशाचर खरा पण भूत नव्हे, अंतर्धान करण्याविषयीं कुशल असून सिद्ध पुरुष नव्हे, गतीनें चपल असून वायु नव्हे, तीक्ष्णमुख असून बाण नव्हे,—असा कोण हें जो जाणतो तो पंडित होय ! ” या कोड्याचें उत्तर ‘ ढेंकूण ’ होय. पहिल्या विशेषणाचा श्लेषार्थ वर दिलाच आहे; बाकीचे उघडच आहेत.

सदूषणाऽपि निर्दोषा सखराऽपि सुकोमला ॥
नमस्तस्मै कृता येन रम्या रामायणी कथा ॥ २६५ ॥

“ सदूषण (दूषणयुक्त; दूषणनामक राक्षसाचा जींत संदर्भ आहे) असून निर्दोष आणि सखर (कठोर; खरनामक राक्षसाचें जींत कथानक आहे) असून अत्यंत कोमल, अशी जी रामायण कथा ती ज्यानें केली त्यास वंदन असो ! ”

आच्छादयसि किं मुग्धे वस्त्रेणाधरपल्लवम् ॥
खंडिता एव शोभंते वीराधरपयोधराः ॥ २६६ ॥

“ हे मुग्धे ! आपल्या अधरपल्लवाचें वस्त्रानें कां आच्छादन करतेस ? अगे, वीर, अधर आणि पयोधर हे क्षतांकित होत्सातेच विशेष शोभतात ? ”

मंदमंदगमना करिणी किं वा विशालनयना हरिणी किम् ॥
पूर्णचंद्रवदना रजनी किं पश्य गच्छति सखे तरुणी किम् ॥ २६७ ॥

" हे मित्रा ! ती पहा पहा राजमार्गानें कोण जाते आहे ? ती मंदमंद गमन करणारी हस्तिनी आहे काय ? अथवा विशालनेत्रा हरिणी आहे काय ? किंवा पूर्णचंद्र हेंच जिचें वदन अशी पौर्णमासी रात्रि आहे काय ! "

पंडिते चैव मूर्खे च बलवत्यपि दुर्बले ॥
ईश्वरे च दरिद्रे च मृत्योः सर्वत्र तुल्यता ॥ २६८ ॥

" पंडित, मूर्ख; बलवान्, दुर्बल; धनाढ्य, दरिद्री; या सर्वांस मृत्यूनें ग्रासलें आहे. कोणी सुटला आहे असें नाहीं ! "

वंगाः कथमंगाः कथमित्यनुयुंक्ते तथा देशान् ॥
कीदृक्कृतांतपुरमिति कोऽपि न जिज्ञासते मूढः ॥ २६९ ॥

" वंगदेश कसा आहे,* अंग कसा आहे, इत्यादि प्रकारें इहलोकींच्या अल्पमात्र वस्तींच्या देशांविषयीं मूढ जे प्रापंचिक जन त्यांची चौकशी चालत असते; पण कृतांतपुर म्हणजे यमनगरी कशी आहे हिजविषयीं कोणाचीही जिज्ञासा प्रगट होत नाहीं ! "

दाराः पुत्रेषु रताः पुत्राः पितृधनपरिग्रहव्यग्राः ॥
जननी रोदनशरणा परलोकगतसस्य को बंधुः ॥ २७० ॥

" स्त्रिया पुत्रांकडे पाहून शोक आंवरतात, पुत्र पितृधनाच्या विभागाविषयीं तत्पर होऊन त्या व्यवस्थेला लागतात, आई दुःख करीत बसते; पण जो बिचारा प्राणी परलोकाची वाट धरीत असतो त्याचा सांगाती कोण होतो !"

हृदि लज्जोदरे वह्निः स्वभावादग्निरूर्ध्वशिखः ॥
तेन मे दग्धलज्जस्य पुनरागमनं नृप ॥ २७१ ॥

" हे राया ! माझ्या हृदयाचे ठायीं लज्जा आहे व उदराचे ठायीं वन्हि आहे; तेव्हां अग्नीच्या ऊर्ध्वज्वलनरूप धर्मामुळें माझी लज्जा जळून मी तुज-

---

* बंग देशाचें सांप्रत नांव बंगाल आहे, व अंगास बहार म्हणतात. भारतीय युद्धांतला प्रसिद्ध सेनापति जो कर्ण त्यास दुर्योधनानें अंगदेशाचें आधिपत्य दिलें होतें हें वाचकांस माहीत असेलच.

कडे याचना करण्यास आलों आहे ! " तात्पर्य हें कीं, मध्यान्हींच्या समयापुढें लज्जेला टिकाव धरवत नाहीं.

मातस्तर्णकरक्षणाय यमुनाकच्छं न गच्छाम्यहम्
कस्माद्वत्स पिनष्टि पीवरकुचद्वंद्वेन गोपीजनः ॥
भ्रूसंज्ञाविनिवारितोऽपि बहुशो जल्पन्यशोदाग्रतो
गोपीपाणिसरोजमुद्रितमुखो गोपीपतिः पातु वः ॥२७२॥

" आई ! गाईच्या वत्सांचें रक्षण करण्यास मी यमुना-तीरीं जाणार नाहीं. यशोदा विचारते, ' कांरे मुला ?' कृष्ण उत्तर करतो, ' अगे या गोपी पीनस्तनद्वयेंकरून मला चेंगरून पाहातात, '— याप्रमाणें तो बोलत असतां गोपी भ्रूसंज्ञांच्या योगानें त्यास दाबीत होत्या, तरीही तो जेव्हां ऐकेना तेव्हां ज्याचें मुख गोपींच्या पाणिसरोजांनीं मुद्रित झालें आहे असा तो गोपीपति तुमचें रक्षण करो ! "

किमकारि न कार्पण्यं कस्यालंघि न देहली ॥
अस्य पापोदरस्यार्थे किमनाटि न नाटकम् ॥ २७३ ॥

" या दुष्ट उदराच्या भरणार्थ काय काय दैन्य आम्हीं दाखविलें नाहीं ! कोणाकोणाचा उंबरठा उलंडला नाहीं ! व कोणकोणतें नाटक केलें नाहीं ! "

संपोष्यं सदपत्यवत्परकराद्रक्ष्यं च सुक्षेत्रव-
त्संशोध्यं व्रणिनोऽगवत्प्रतिदिनं वीक्ष्यं च सन्मित्रवत् ॥
बध्यं बंधवदश्लथं न हि न विस्मर्यं हरेर्नामव-
न्नैवं सीदति पुस्तकं किल कदाऽप्येतद्गुरूणां वचः ॥२७४॥

" पुस्तकाचें उत्तम अपत्याप्रमाणें संपोषण करावें, उत्तम क्षेत्राप्रमाणें दुसऱ्याच्या तें कधीं हातीं लागूं देऊं नये, जखमी मनुष्याच्या शरीराप्रमाणें वरचेवर त्याचें शोधन करावें; जिवलग मित्राप्रमाणें दररोज त्याचें अवलोकन करावें, बंधनांत ठेवल्याप्रमाणें त्यास बळकट बांधावें, हरीच्या नामाप्रमाणें त्याचें कधीं विस्मरण होऊं देऊं नये;—अशा तऱ्हेनें पुस्तक ठेवलें असतां तें वाईट होत नाहीं असें गुरूचें सांगणें आहे ! "

मौने मौनी गुणिनि गुणवान्पण्डिते पण्डितोऽसौ
दीने दीनः सुखिनि सुखवान्भोगिनि भोगी प्राप्तभोगः ॥

मूर्खे मूर्खो युवतिषु युवा वाग्मिषु प्रौढवाग्मी
धन्यः कोऽपि त्रिभुवनजयी योऽवधूतेऽवधूतः ॥ २७५ ॥

" मुनिसमुदायांत मौन धारण करणारा, गुणिजनांशीं समागम झाला असतां गुण प्रगट करणारा, पंडितमंडळींत पंडित, दीनाचे ठायीं दीन, सुखी असणाऱ्यांशीं सुखी, विलासी जनांशीं विलासी, मूर्खांशीं मूर्ख, तरुण स्त्रियांशीं तरुण, वावदूकांशीं वक्ता व वैराग्याशीं वैरागी,—याप्रमाणें जो सर्वांशीं रंग पाहून वर्तणारा तो त्रिभुवनजयी चतुर पुरुष धन्य होय ! "

उच्छिष्टं शिवनिर्माल्यं वमनं शवकर्पटः ॥
काकविष्ठासमुत्पन्नः पंचैतेऽतिपवित्रकाः ॥ २७६ ॥

" उच्छिष्ट, शिवाचें निर्माल्य, वमन, प्रेतचीवर आणि काकविष्ठेपासून उत्पन्न झालेला,—हीं पांच अतिपवित्र होत ! " हीं पांच अनुक्रमें करून दूध, गंगा, मध, रेशीम व पिंपळ होत.

सौधं धाम मुखांबुजं भगवतो वक्त्रासवप्राशनम्
शय्या चाधरपल्लवोऽथ मृदुलांगुष्ठस्तदुच्छीर्षकम् ॥
अंगुल्यस्तव सेवने निरलसा ब्रूमः किमन्यत्सुखम्
हा हा वैरिणि हे तथाऽपि मुरलि त्वां नैति निद्राऽपि किम् ॥ २७७ ॥

गोपी सापत्नभावानें मुरलीस म्हणतातः—" हे मुरली ! अमृताचें केवळ गृहच असें जें भगवंताचें मुखांबुज त्यांतील आंसवाचें (मद्याचें) तुला प्राशन घडतें, त्याचा अधरपल्लव हीच तुझी कोमल शय्या होय, मृदुल जो अंगुष्ठ तो तुझें उपधान (उशी) होय, इतर अंगुली या तुझ्या सेवनाविषयीं (चरणसंवाहनाविषयीं) निरंतर तत्पर आहेत; आणखी यापेक्षां सुख तें कोणतें असावें ?—पण इतकें असून हे वैरिणी ! तुला निद्रा ती कशी येत नाहीं ! " बोलणारणींचा भाव अर्थात् हा होय कीं आपल्या वैरिणीस झोंप लागून ती शब्द करीनाशी झाली कीं तिचें सर्व भाग्य आपल्या वांट्यास येईल !

अहं तेनाऽऽहूता किमपि कथयामीति विजने
समीपे चाऽऽसीना सरलहृदयत्वादवगता ॥

ततः कर्णोपांते किमपि वदताऽऽघ्राय वदनम्
गृहीत्वा धम्मिल्लं मम सखि निपीतोऽधररसः ॥ २७८ ॥

"मला कांहीं सांगायाचें आहे असें म्हणून त्यानें मला एकांतीं बोलाविलें, तेव्हां मी भोळ्या भावानें त्याच्याजवळ गेलें, तों त्या धूर्तानें कानाशीं लागण्याचें मिष करून माझ्या मुखाचें आघ्राण केलें आणि कचप्रांत ग्रहण करून अधररसाचें पान केलें !"

संग्रामे सुभटेंद्राणां कवीनां कविमंडले ॥
दीप्तिर्वा दीप्तिहानिर्वा मुहूर्तादेव जायते ॥ २७९ ॥

संग्रामाचे ठायीं मोठ्या मोठ्या योद्ध्यांचें व कविमंडलांत कवींचें तेज पडणें किंवा तेजोहानि होणें, हीं दोन्ही एका घटकेंत होऊन जातात !"

शंभुः श्वेतार्कपुष्पेण चंद्रमा वस्त्रतंतुना ॥
अच्युतः स्मृतिमात्रेण साधवः करसंपुटैः ॥ २८० ॥

"शिव पांढऱ्या रुईच्या फुलानें, चंद्र वस्त्राच्या दशेनें, विष्णु केवळ स्मरणानें व साधु हस्तांजलीनें म्हणजे केवळ नमस्कारानें प्रसन्न होतात !"

कुचौ तु परिचर्चितुं परिचितं चिरं चंदनम्
कृताः परमुरोजयोः परिसरेऽरविंदस्रजः ॥
स्तुतिर्नतिरपि स्मृतिर्वरतनोः कृतैवादरा-
दिदं तु निखिलं पुनर्विरचितं मया नेश्वरे ॥ २८१ ॥

कोणी विषयी विरक्तता पावून कृतकर्माबद्दल अनुताप पावतोः——
"मीं चंदनाचा जो प्रयोग केला तो निरंतर स्तनलेपनार्थच केला; कमलांच्या माला ज्या घातल्या त्या स्तनांच्या आंसमंतातच घातल्या; स्तवन व वंदन हींही आदरेंकरून सुंदर स्त्रियांचींच केलीं;——पण हें सर्व परमेश्वराचे ठिकाणीं माझ्याकडून कधींही झालें नाहीं."

धर्माख्याने श्मशाने च रोगिणां या मतिर्भवेत् ॥
सा सर्वदैव तिष्ठेच्चेत्को न मुच्येत बंधनात् ॥ २८२ ॥

"धर्मविषयक आख्यानाचें श्रवण झालें असतां, स्मशानांत व रुग्णा-

वस्थेंत जी मनाची स्थिति होते तीच जर सदोदित राहील तर कोण संसार-तापापासून मुक्त होणार नाहीं ? ”

सुभाषितज्ञेन जनेन सार्क संभाषणं सुप्रभुसेवनं च ॥
आलिंगनं तुंगपयोधराणां प्रत्यक्षसौख्यं त्रयमेव लोके ॥ २८३ ॥

“ सुभाषिताच्या ज्ञानानें ज्यास वाक्चातुर्य प्राप्त झालें आहे अशा मनुष्याशीं संभाषण, चांगल्या प्रभूची सेवा व पूर्णयौवना ज्या स्त्रिया त्यांचें आलिंगन, हीं तीन या लोकींचीं मोठीं सुखें होत. ”

अहो बत विचित्राणि चरितानि महात्मनाम् ॥
लक्ष्मीं तृणाय मन्यंते तद्भारेण नमंति च ॥ २८४ ॥

“ महात्मे जे पुरुष त्यांचें चरित्रवैचित्र्य काय सांगावें ! पहा कीं, ते लक्ष्मीला तृणासमान मानतात आणि तिच्याच भारानें नम्रही होतात. ” तात्पर्य हें कीं, लक्ष्मीच्या प्राप्तीनें सज्जन उद्दाम न होतां उलटे लीनच होतात.

मिलिते मौनमातिष्ठ वाणि प्राणसमे जने ॥
अंतर्गतरसाह्लादं न जानासि कदाचन ॥ २८५ ॥

“ हे वाणि ! प्राणप्रिय जनाची गांठ पडली असतां तूं आपली मौन धारण करून असत जा; कां तर, हृदयगत जो आल्हाद त्याचा तुला मुळींच अनुभव घडत नाहीं ! ”

उच्चीयंते स्म वेश्मन्यशनविरहिते निर्धने श्रोत्रियाणाम्
यत्र श्यामाकबीजान्यपि चटकवधूचंचुकोटिच्युतानि ॥
देवे दातर्यकस्माच्चपलशिशुकराकृष्टमुक्तावलीक-
भ्रष्टास्तत्रैव दृष्टा युवतिभिरलसं घूर्णिता मौक्तिकौघाः ॥ २८६ ॥

“ निरंतर नकारघंटा वाजणाऱ्या ज्या दरिद्र ब्राह्मणांच्या घरांत चिमणीच्या चोंचींतून पडलेले दाणेही वेंचले जात असत, तेथेंच देवाच्या दयेनें संपत्ति आली असतां काय चमत्कार दृष्टीस पडूं लागला पहा; कीं, पोरांनीं दांडगाईनें गळ्यांतलें मोत्यांचें पेंडें ओढून त्यांतील दाणे चोहोंकडे घरंगळत चालले असतां बायका त्यांकडे उगीच मौजेनें पाहत राहूं लागल्या ! ”

हस्तांभोजालिमाला नखविधुहरिणश्यामलच्छायवीची
तेजोग्नेर्धूमधारा लवणिमसरसीमुग्धशैवालवल्ली ॥
वैरिश्रीवेणिदंडो वितरणकरिणो गंडदानप्रणाली
वेल्लत्यंभोधरश्रीरकबरधरणीपालपाणौ कृपाणः ॥ २८७ ॥

कोणी कवि अकबराच्या तरवारीचें वर्णन करतोः—" हस्तकमलापासून निघालेली भ्रमरमालाच काय, कीं नखचंद्रांवरील हरिणांच्या श्यामलप्रभेची लहरीच काय, कीं प्रतापाग्नीची धूमधाराच काय, कीं लावण्यसरोवरांतील सुंदर शैवाललताच काय, कीं शत्रूंच्या लक्ष्मीच्या वेणीचा पेडच काय, कीं दानरूप हस्तीच्या मदस्रावाची नलिकाच काय,—असा हा अकबर राजाच्या हातांतील मेघनील कृपाण शोभा पावत आहे ! "

तारयामि यमुनाप्रवाहतस्त्वां वरोरु तर पण्यमंतरा ॥
द्रागपाकुरु दुकूलमाननादास्तिरस्तु मम नावि चंद्रमाः ॥ २८८ ॥

कोणी चतुर नाविक कोण्या स्त्रियेस म्हणतोः—" हे रंभोरु ! या उच्छृंखल यमुनाप्रवाहावरून तुला आतरावांचून मी नेऊन पोंचवितों; येवढें मात्र कर कीं तोंडावरील बुरखा पलीकडे काढ आणि माझ्या नावेंत चंद्रम्यास प्रगट होऊं दे ! "

यत्राकुंठितदंतिदंतमुसलान्याचूर्णितान्याहवे
धारा यत्र पिनाकपाणिपरशोराकुंठिता वक्षसि ॥
तन्मे तावदुरो नृसिंहकरजैर्व्यादीर्यते सांप्रतम्
दैवे दुर्जनतां गते तृणमपि प्रायेण वज्रायते ॥ २८९ ॥

हिरण्यकश्यपूची उक्तिः—" ज्या माझ्या उरस्थळावर हत्तींची आकुंठित दंतमुसलें चूर्ण झालीं व शिवाच्या परशूची धारही ज्यावर बोथटली, तें आज नृसिंहाच्या नखांनीं विदीर्ण होत आहे; तेव्हां दैव दुष्ट झालें असतां तृणही वज्रप्राय होतें असें म्हटलें पाहिजे ! "

अन्योन्यस्य निरीक्षणादपगता नेत्रान्मुखे ह्रीः स्थिता
संलापाद्वदनं विहाय कुचयोः सीमामुपेत्य स्थिता ॥

गाढालिंगनतस्ततः कुचतटी संत्यज्य नीविं गता
भर्तुस्तत्र करे गते किमभवत्सा तन्न जानीमहे ॥ २९० ॥

नववधूच्या लज्जान्हासाचें कोणी मार्मिक कवि वर्णन करितोः—" परस्परांची दृष्टादृष्ट झाली असतां लज्जा ही नेत्रापासून निघून मुखाचे ठायीं जाऊन बसली, पुढें संभाषणाच्या वेळीं मुखापासून निघून कुचसीमेशीं जाऊन थडकली, नंतर गाढालिंगनप्रसंगीं कुचतटापासून नीविप्रदेशीं पोंचली; पण पुढें भर्त्याच्या करेंकरून नीवीचाही मोक्ष झाल्यावर ती कोणीकडे नाहींशी झाली ती आम्हांस कळत नाहीं ! "

अकृत्वा पौरुषं या श्रीर्विकासिन्यपि किं तया ॥
जरद्गवोऽपि चाश्नाति दैवादुपगतं तृणम् ॥ २९१ ॥

" पौरुष केल्यावांचून जी आयतीच प्राप्त झालेली संपत्ति तींत काय तात्पर्य आहे ? म्हातारा झालेला बैलही यदृच्छेनें उगवलेलें गवत खातो ! "

लोभाविष्टो नरो वित्तं वीक्षते न च चाऽऽपदम् ॥
दुग्धं पश्यति मार्जारो यथा न लगुडाहतिम् ॥ २९२ ॥

" लोभाविष्ट पुरुषाची दृष्टि द्रव्यावर असते, पण तें प्राप्त होतांना जी विपत्ति येणार ती त्याला दिसत नाहीं; जसें मांजराची नजर दुधावर असते, पण बडग्याकडे त्याचें लक्ष असत नाहीं ! "

चातकस्य मुखचंचुसंपुटे नो पतंति यदि वारिबिंदवः ॥
सागरीकृतमहीतलस्य किं दोष एव जलदस्य दीयते ॥ २९३ ॥

" चातकाच्या चंचुपुटांत जर पाण्याचे बिंदु पडले नाहींत, तर सारी पृथ्वी जळमय करून टाकणारा जो मेघ त्यासच दोष द्यावा काय ? "

अंसाकृष्टदुकूलया सरभसं गूढौ भुजाभ्यां स्तनौ,
आकृष्टे जघनांशुके कृतमधः संसक्तमूरुद्वयम् ॥
नाभीमूलनिबद्धचक्षुषि तथा व्रीडानतांग्या प्रिये
दीपः फूत्कृतिवातवेपितशिखः कर्णोत्पलेनाऽऽहतः ॥ २९४ ॥

" खांद्यावरून दुकूलाचें अपनयन केलें असतां प्रियेनें भुजस्वस्तिक करून उरसिजांचें निगूहन केलें; जघनांबराचें आकर्षण केलें असतां आपलें ऊरुद्वय

तिनें अत्यंत निरंतर केलें; आणि शेवटीं वल्लभाची नाभीमूलनिबद्ध दृष्टि पाहून दीपज्योतीवर फूत्काराचा प्रयोग केला, पण त्यानेंही कार्य होत नाहींसें पाहून शेवटीं कर्णावरील उत्पल दिव्यावर टाकलें !"

संन्यासमकृत कांची जहौ कलत्रं दुकूलमबलायाः ॥

तत्याज रागमधरो मुक्तिमुरीचाक्रिरे चिकुराः ॥ २९५ ॥

संभोगोत्तर स्त्रीच्या अवस्थेची व मुक्तस्थितीची कोणी कवि समता घालतोः—

"कांचीनें संन्यासवृत्ति धारण केली, अधरवस्त्रानें कलत्रत्याग केला, अधरानें रक्तता टाकून दिली आणि केशांनीं मुक्तीची स्थिति वरिली !" श्लेष वेगळा केला असतां तात्पर्य हें कीं, मेखला गळून पडली, वस्त्राचा विरह झाला, ओंठाची लाली मोडली आणि केस सुटून मोकळे झाले.

द्रुमाः पांडुप्राया धृतनिबिडगर्भाः स्त्रिय इव

प्रफुल्लास्ते कुंदा नृपतिकृतमाना इव जनाः ॥

पिको मंदं मंदं हृदि मदननामानि जपति

प्रभोरग्रे पूर्वापरिचितसभाकः कविरिव ॥ २९६ ॥

"वृक्ष हे गर्भिणी स्त्रियांप्रमाणें निस्तेज झाले आहेत, कुंद हे राजसत्कार पावलेल्या पंडितजनांप्रमाणें प्रफुल्लित झाले आहेत आणि कोकिल हा मदनाच्या नांवांचा जप मंदवाणीनें आपल्याशींच करीत होत्साता राजसभेशीं अपरिचित असणाऱ्या कवीप्रमाणें भासत आहे."

मुक्ताः पतंति भूमौ बालाः कलयंति केवलां मुक्तिम् ॥

चुंबत्यंबरमवनिं विपरीते किं न विपरीतम् ॥ २९७ ॥

"मुक्त जे स्वर्गस्थ असायाचे ते भूमीवर पडले आहेत, बाल म्हणजे अज्ञ जन ते अत्यंत मुक्ततेप्रत पावले आहेत, आणि आकाश पृथ्वीला येऊन भेटलें आहे; तेव्हां एक विपरीत झालें असतां काय काय विपरीत होणार नाहीं?" 'मुक्ताः' 'बालाः' व 'अंबरम्' यांचे दुसरे अर्थ प्रसिद्धच आहेत; व एकंदर श्लोकाचें तात्पर्यही तज्ज्ञांच्या लक्षांत येणारच आहे.

सुप्रातं दिनमद्य नः परिणतं साफल्यमद्याऽऽयुषः

कर्माण्यद्य शिवंकराणि सुमहानद्योत्सवो नेत्रयोः ॥

कार्पण्येन चिराय संप्रति कृतं प्रास्थानिकं मंगलम्
यज्जागर्ति भवन्मुखेंदुरधुना दिष्टया दृशोरग्रतः ॥२९८॥

" आज सुदिन उगवला, आयुष्याचें साफल्य पूर्ण झालें, शुभ कर्माचें सार्थक्य झालें, नेत्रांचें पारणें फिटलें आणि दैन्यानें आपलें बिऱ्हाड उचललें, कीं आज आपला मुखचंद्र डोळ्यांसमोर प्राप्त होण्याचा योग आला ! "

यदीयबलमालोक्य गतः प्रेयान्वियुज्यते ॥
आलोकये कथं सख्यस्तस्य चंद्रमसो मुखम् ॥ २९९ ॥

" हे सखींनो ! ज्याचें बळ (चंद्रबळ) पाहून प्रिय मार्गस्थ होतो, त्या विरहताप देणाऱ्या दुष्टाचें मुख मी कशी पाहूं ! "

उपाध्यायश्च वैद्यश्च ऋतुकाले वरांगना ॥
सूतिका दूतिका चैव कार्यांते तृणवन्मताः ॥ ३०० ॥

" उपाध्याय, वैद्य, ऋतुकाळीं स्त्री, सुईण आणि दूती,—इतकीं सर्वजण कार्य उरकलें असतां तृणवत् होतात ! "

संप्राप्तोऽपि महोदधिं न वितृषो जातो जलैर्वाडवो
मेघं प्राप्य च चातकोऽपि चरणौ भानुं न लेभेऽरुणः ॥
चंद्रः शंकरशेखरेऽपि सततं सोऽपि क्षयी दृश्यते
प्रायः सत्पुरुषाश्रितोऽपि लभते दैवानुरूपं फलम् ३०१

" वाडवाग्नीनें महासमुद्राचा आश्रय केला तरी त्याच्या जलांनीं त्याची तृषा हरली नाहीं, चातकास मेघाचा आश्रय झाला तरी त्याची तहान तशीच, अरुणानें सूर्याची सेवा पतकरली तरी त्यास पाय आले नाहींत, तसाच चंद्रही शिवाच्या मस्तकीं असून देखील पूर्ववत् क्षयीच राहिला; तस्मात् सत्पुरुषांचा आश्रय प्राप्त झाला तरी कोणासही दैवानुरूपच फळ मिळतें ! "

मंदाकिनीपयःपानं मंदाक्षीमुखचुंबनम् ॥
मंदरोपवनक्रीडा मंदानुष्ठानतः कुतः ॥ ३०२ ॥

" मंदाकिनीच्या उदकाचें प्राशन, लज्जामंदनयनेचें मुखचुंबन आणि मंदराचलाच्या उपवनांत क्रीडा, हीं तीन मंद तपानें कोठून प्राप्त होणार ? "

तानि तानि कमलानि तज्जलं तानि षट्पदकुलानि ते खगाः ॥
सर्वमेकसमये तु विच्युतं पंकशेषमचिराद्भूत्सरः ॥ ३०३ ॥

"तीं तीं कमलें, तें जल, तीं भ्रमर कुलें, ते हंसादि पक्षी, हीं सर्व एका कालींच निघून गेलीं; आणि फारा दिवसांनीं सरोवर कर्दमशेष होतें झालें!" ही अर्थातच अन्योक्ति होय. ही आपत्तीस पोंचलेल्या कुलास किंवा देशासही लागू पडेल.

दीपो भक्षयते ध्वांतं कज्जलं च प्रसूयते ॥
यदन्नं भक्षयेन्नित्यं जायते तादृशी प्रजा ॥ ३०४ ॥

"दीप हा अंधकाराचें भक्षण करतो आणि काजळास प्रसवतो. ठीकच आहे, जसें नित्य अन्न खावें त्यासारखी प्रजा होते!"

ललाटे कस्तूरीतिलकमबलाः कज्जलरुचिम्
दृशोः कर्णद्वंद्वे विमलमणिताटंकयुगुलम् ॥
गले मुक्तामाला शुचिवसनमंगे च सततम्
वशीकर्तुं विश्वं दधति खलु बाह्योपकरणम् ॥ ३०५ ॥

"ललाटाचे ठायीं कस्तूरीचा तिलक, डोळ्यांत अंजन, दोन्ही कानांत मणिताटंक (रत्नांचीं तानिवडें), गळ्यांत मुक्ताहार, शुचिवस्त्र निरंतर परिधान केलेलें,—या सर्व थाटावरून मला असें वाटतें कीं, स्त्रिया ह्या सर्व विश्वाच्या वशीकरणार्थ वरील साहित्य बाळगीत असतात!" वशीकरणांत तिलक, अंजन, मणि वगैरे सामग्री अवश्य असून निरंतर सोवळ्यांत राहिलें पाहिजे हें लोकप्रसिद्धच आहे.

स्नेहोपपन्न इति पूर्णदशाविशेष-
शाली स्वमात्मनि वसुप्रकरं निधाय ॥
लब्धोदये तमथ गृह्णति पद्मबंधौ
दीपा भवंति कलुषा बलवान् हि लोभः ॥ ३०६ ॥

"सूर्यानें अस्तंगमनाच्या समयीं दीपाचे ठायीं आपला वसु (तेज; द्रव्य)—समूह जो ठेवला, कीं हे स्नेहयुक्त (पक्षीं, तैलयुक्त) आहेत व पूर्णदशेनें (संपन्नतेनें—वातीच्या अग्रानें) विराजमान आहेत असें समजून,—

तेच दीप त्यानें आपल्या उदयकालीं आपला वसुप्रकर माघारी घेतला असतां ज्यापक्षीं मलिनमुख होतात त्यापक्षीं लोभ हा परम दुर्धर आहे असें म्हटलें पाहिजे!"

मौनं कालविलंबश्च प्रयाणं भूमिदर्शनम्॥
भृकुट्यन्यमुखी वार्ता नकारः षड्विधः स्मृतः॥ ३०७॥

"आपलें कोणापाशीं कांहीं काम असलें आणि त्यानें बळकट मौन धरलें, किंवा कामास उशीर लावला, अगर न भेटतां चालता झाला, किंवा गांठ पडली असतां भुईकडे पाहूं लागला, अथवा त्याच्या कपाळावर आठी दिसली किंवा मुद्दाम दुसऱ्याकडे पाहून बोलूं लागला, म्हणजे नन्नाचा पाढा समजावा. नकाराचे वरील सहा प्रकार आहेत."

लज्जे त्वं मज्ज सिंधौ गिरिवरशिखरे त्वं च तिष्ठ प्रतिष्ठे
शांते प्रांते दिशांते कुरु वसतिमहो गर्व खर्वो भवाशु॥
तेजः पातालमूलं भज भुवि भगवन्मान मा नाम तेऽस्तु
प्रेम्णैकामाश्रयंतीं सततममहिमां तूर्णमाशां श्रयिष्ये॥ ३०८॥

"हे लज्जे! तूं समुद्रांत बुडी मार; हे प्रतिष्ठे! तूं एखाद्या मोठ्या पर्वताच्या शिखरावर जाऊन बैस; हे शांते! दिशांच्या प्रांतभागीं तूं वस्ती कर; हे गर्वा! तूं ठेंगणा होऊन रहा; हे तेजा! तूं पाताळच्या तळवटीं जाऊन बैस; हे भगवंता माना! तुझें नांवही येथें राहूं देऊं नको;—कां तर मला प्रेमानें धरून राहणारी जी द्रव्यतृष्णा तिचाच मी इतःपर अंगीकार करणार!" तात्पर्य, धनलोभ म्हटला म्हणजे वरील साऱ्या मंडळीस पूर्ण रजाच मिळाली म्हणून समजावें.

यः पठति लिखति पश्यति परिपृच्छति पंडितानुपासयति॥
तस्य दिवाकरकिरणैर्नलिनीदलमिव विकास्यते बुद्धिः॥ ३०९॥

"जो अध्ययन करतो, लिहितो, जगाच्या व्यवहाराचें किंवा पुस्तकांचें वरचेवर अवलोकन करतो, नेहेमीं संशयनिवृत्ति करून घेतो, पंडितांच्या

समागमें असतो, त्याची बुद्धि सूर्यकिरणांनीं जशी कमलिनी तशी विकास पावत जाते ! " *

पक्ष्माग्रग्रथिताश्रुबिंदुनिकरैर्मुक्ताफलस्पर्धिभिः
कुर्वंत्या हरहासहारि हृदये हारावलीभूषणम् ॥
बाले बालमृणालनालवलयालंकारकांते करे
विन्यस्याऽऽननमायताक्षि सुकृती कोऽयं त्वया स्मर्यते॥३१०॥

" हे बाले ! मुक्ताफलांची स्पर्धा करणारे जे पक्ष्माग्रापासून गळणारे अश्रुबिंदु त्यांनीं शिवहास्यतुल्य शुभ्र वक्षःस्थलावर मोत्यांचा जणूं काय हारच धारण करणारी जी तूं, ती कोंवळ्या कमलतंतूंच्या वलयांनीं सुशोभित केलेल्या हस्तावर आपलें मुख टेकून कोणत्या धन्य पुरुषाचें एकाग्रतेनें ध्यान करीत आहेस ? "

साहजिकरूपवत्या भवति भवत्या विभूषणं भारः ॥
सर्वांगसौरभिण्या दमनकवल्ल्याः किमालि कुसुमेन ॥ ३११ ॥

" साहजिकच सौंदर्यानें मंडित जी तूं त्या तुला अलंकार हे केवळ भाररूप होत ! पहा कीं, सर्वांगाहीं सुगंध परिपूर्ण जी दमनवल्ली (दवणा) तिला हे सखि ! पुष्पांचें काय प्रयोजन होय ! "

कर्णलंघिगुणोत्कर्षास्त्यागिनो धन्विनस्तथा ॥
निष्फलान्न विमुंचंति मार्गणान्संमुखे स्थितान् ॥ ३१२ ॥

(दातृपक्षीं) " दाते जे आहेत हे मार्गणांस (याचकांस) त्यांचा गुणोत्कर्ष त्यांच्या कानावरून गेला असतां व ते संमुख आले असतां त्यांस निष्फळ दवडीत नाहींत; म्हणजे अर्थात् त्यांची योग्य संभावना करून त्यांस बोळवितात ! "

(धन्विपक्षीं) " धनुर्धर जे आहेत ते संमुख म्हणजे हातास आलेल्या मार्गणांस (बाणांस), कीं ज्याचा गुण (दोरी) आकर्षून कर्णप्रदेशापर्यंत

---

* बेकनचें वाक्य वाचकांस आठवेलच:—" वाचनानें मनुष्य बहुश्रुत होतो; लिहिण्यानें ठाकठिकी येते आणि संभाषणाच्या योगानें समयसूचकता येते. "

(" Reading makes a man full, writing exact, and conversation ready. ")

आवळा आहे, त्यास निष्फळ सोडीत नाहींत; म्हणजे ज्याला पुढचें लोखंडी फळ नाहीं असा सोडीत नाहींत. (नीट लक्ष्यावर योजून त्यांचें संधान करतात !) "

चिरश्रांतो दूरादहमुपगतो हंत मलया-
त्तदेकं त्वद्गेहे तरुणि परिणेष्यामि दिवसम् ॥
समीरेणोक्त्यैवं नवकुसुमिता चूतलतिका
धुनाना मूर्धानं नहि नहि नहीत्येव वदति ॥ ३१३ ॥

वसंतांतील वाऱ्यानें डोलणाऱ्या आम्रमंजरीवर उत्प्रेक्षाः—" हे प्रमदे ! हा मी येवढ्या दूरच्या मलयाचलापासून चालत आल्यामुळें अगदीं दमून गेलों आहे, तर एक दिवसभर तुझ्या घरीं मला राहूं दे.—याप्रमाणें वसंत वायूनें प्रार्थना केली असतां नवपुष्पित (श्लेषार्थ स्पष्टच आहे !) जी आम्रलता ती शिरःकंपानें छे ! छे ! छे ! म्हणून जणों काय त्याचा निषेध करते !"

यद्यपि धनेन धनिनः क्षितितलनिहितेन भोगरहितेन ॥
तस्माद्वयमपि धनिनस्तिष्ठति नः कांचनो मेरुः ॥ ३१४ ॥

" पृथ्वीच्या पोटांत पुरून ठेवलेलें जें अनुपभुक्त धन त्याच्या योगानें जर धनी आपणास धनवान् म्हणवीत असतील, तर मग आम्हीही श्रीमंतच आहों,—अवघा सुवर्णमेरु आमचाच आहे ! "

काचिन्मृगाक्षी प्रियविप्रयोगे गंतुं निशापारमपारयंती ॥
उद्गातुमादाय करेण वीणामेणांकमालोक्य शनैरहासीत्॥३१५॥

" कोणी विरहिणी रात्र जाइना म्हणून सतार जवळ घेऊन आतां तिजवर गाणार तों मृगांकाकडे पाहून वीणा खालीं ठेविती झाली ! " अभिप्राय उघडच आहे कीं, रात्र जाण्याचा जो उपाय आपण करणार तोच ती लांबण्यास मात्र कारण होईल असें तिच्या लक्षांत तेव्हांच आलें. लांबण्याचें कारण 'मृगांक' शब्दांत सूचित होतें. मृग हें सुस्वरास अत्यंत लुब्ध असल्यामुळें तो थांबला असतां चंद्राची गति सहजच खुंटली !

उद्योगादनिवृत्तस्य ससहायस्य धीमतः ॥
छायेवानुगता तस्य नित्यं श्रीः सहचारिणी ॥ ३१६ ॥

" निरंतर नेटानें उद्योग करणारा बुद्धिमान् आणि ज्यास मित्राची

अत्यंत अनुकूलता आहे अशा पुरुषांच्या मागोमाग संपत्ति कायमची सदोदित चालत असते!"

विरला जानंति गुणान्विरलाः कुर्वंति निर्धनस्नेहान् ॥
विरलाः परकार्यरताः परदुःखेनापि दुःखिता विरलाः ॥३१७॥

"गुणज्ञ लोक विरळ सांपडतात. निर्धन पुरुषाशीं स्नेह ठेवणारे विरळा, दुसऱ्याच्या कार्याला झटणारे थोडेच आणि परदुःख पाहून कळवळणारे थोडेच!"

का विद्या कवितां विनाऽर्थिनि जने त्यागं विना श्रीश्च का
कः सूनुर्विनयं विना कुलवधूः का स्वामिभक्तिं विना ॥
को धर्मः स दयां विना नरपतिः को नाम नीतिं विना
भोगाः के रमणीं विना क्षितितले किं जन्म कीर्तिं विना ॥३१८॥

"कवितेशिवाय विद्येची काय शोभा? याचकांस दान न केल्यास ती संपत्ति काय उपयोगाची? विनयहीन पुत्र काय कामाचा? नवऱ्यावर जिची भक्ति नाहीं अशा कुलवधूस काय करावें? दया नाहीं तर धार्मिकता ती कसली? नीति ज्यास अवगत नाहीं त्यास राजा काय म्हणावें! रमणीय स्त्रीच्या व्यतिरिक्त भोगांत काय मजा? कीर्तियुक्त नाहीं तर तें जिणें कसचें?"

निष्पद्मं शिशिरेण धीवरगणैर्निर्मत्स्यनिष्कूर्मकम्
व्याधैर्निर्विहगं निरंबु रविणा निर्नालकं दंतिभिः ॥
निःशालूकमकारि शूकरगणैर्नामैकमात्रं सरो
हे जीमूत परोपकारक पयोदानेन मां पूरय ॥ ३१९॥

"हें सरोवर शिशिर ऋतूनें निष्पद्म करून टाकलें आहे, धीवरांनीं त्यांतील जलचर पार केले आहेत, व्याधांनीं ज्याच्या तीरीं विहार करणाऱ्या पक्ष्यांचा संहार केला आहे, रवीनें जल शोषून टाकलें आहे, हत्तींनीं त्यांतील कमलिनी उपटून विध्वंस केला आहे, डुकरांनीं चिखलांतील कमळाचे कांदे खाऊन पार केलें आहे,—तेव्हां या सर्वस्व नाशामुळें हें केवळ नामशेष होऊन बसलें आहे; तर हे परोपकारक मेघा! मजवर दया करून मला भरून टाक!"

बधिरयति कर्णकुहरं वदनं मूकयति नयनमंधयति ॥
कुटिलयति गात्रयष्टिं संपद्रोगोऽयमद्भुतो लोके ॥ ३२० ॥

"संपत्तीचा विकार साऱ्या रोगांहूनही प्रबळ आहे. पहा कीं, याच्या योगानें कान बहिरे होतात, वाचा बसते, डोळ्यांना दिसेनासें होतें आणि शरीर वांकडें होतें !" हें लाक्षणिक वर्णन सर्वांस समजण्यासारखेंच आहे.

यावच्छकलितो वायुरेकीभवितुमर्हति ॥
तावदेव तुरंगोऽयमाजगाम जगाम च ॥ ३२१ ॥

कोणी घोड्याच्या वेगाचें वर्णन करतो:—"वायु दुभंग झाला असतां तो पुनः मिळून एक जों होतो न होतां, तोंच हा घोडा गेला आणि आला सुद्धां !"

चिकीर्षिते कर्मणि चक्रपाणेर्नापेक्षते तत्र सहायसंपत् ॥
पांचालजायाः पटसंविधाने मध्येसभं यन्न तुरी न वेमा ॥ ३२२ ॥

"भगवंताच्या मनांत कोणतीही गोष्ट कर्तव्य असली म्हणजे तेथें साहाय्यांची अपेक्षा असते असें नाहीं. पहा कीं, जेव्हां द्रौपदीच्या लज्जारक्षणार्थ तो थांबला तेव्हां सभेच्या मध्यें धोट्या किंवा चात्या चालवाव्या लागल्या नाहींत !"

अंब श्राम्यसि तिष्ठ गोरसमहं मथ्नामि मंथानकम्
आलंब्य स्थितमीश्वरं सरभसं दीनाननो वासुकिः ॥
सासूयं कमलालया सुरगणाः सानंदमुद्यद्भयम्
राहुः प्रैक्षत यं स वोऽस्तु शिवदो गोपालबालो हरिः ॥ ३२३ ॥

"आई ! तूं दधिमंथन करतांना दमली आहेस तर थांब, मी अंमळ मंथन करतों—असें म्हणून मंथनकाचें ज्यानें ग्रहण केलें असतां ज्याच्याकडे वासुकि दीनमुख होत्साता पाहूं लागला, लक्ष्मी सवतमत्सरानें पाहूं लागली, देवगण आनंदित होत्साते बघूं लागले आणि राहु सभय होत्साता पाहूं लागला, तो गोपालपुत्र हरि तुम्हांस कल्याणप्रद होवो !" वरील वृत्तींचीं कारणें उघडच आहेत कीं, वासुकीस पूर्वीच्या करकोच्यांची आठवण होऊन पुनः तो प्रसंग येतो कीं काय असें वाटलें; लक्ष्मीस वाटलें कीं, या मंथनाच्या योगानें मला सवत निर्माण होते कीं काय कोण जाणें; देवं नव्या

अमृताविषयीं सस्पृह झाले, आणि राहूस आपणावर पुनः काय प्रसंग गुदरतो कोण जाणें हा धाक पडला !

कुलरीतिप्रियप्रीतिस्तंभद्वयविलंबिनि ॥
तन्वीहृदयहिंदोले हंत दोलायते स्मरः ॥ ३२४ ॥

" कुलाचार आणि वल्लभाविषयीं प्रेम या दोन खांबांवर लोंबणाऱ्या स्त्रीहृदयरूप हिंदोळ्यावर मदन हा आंदोलन पावत आहे. " म्हणजे एकीकडे कुलरीतीचा भंग होईल असा धाक वाटतो आणि एकीकडे हृदयवल्लभाकडे मन ओढतें; आणि त्यामुळें मदनाची स्वारी दोहोंकडे हेलकावे खात राहिली आहे.

विधौ विरुद्धे न पयः पयोनिधौ सुधौघसिंधौ न सुधा सुधाकरे ॥
न वांछितं सिध्यति कल्पपादपे न हेम हेमप्रभवे गिरावपि ॥ ३२५ ॥

" दैव प्रतिकूल झालें असतां जलनिधींतही जल सांपडायाचें नाहीं, अमृतौघाचा सिंधु जो चंद्र त्याच्या ठायीं सुधेचा बिंदुही मिळायाचा नाहीं, प्रत्यक्ष कल्पवृक्षाकडे गेलें तरी इष्टसिद्धि व्हावयाची नाहीं आणि सुवर्णप्रभव जो मेरु त्याच्या ठायींही सोनें सांपडायाचें नाहीं ! "

मित्रे क्वापि गते सरोरुहवने बद्धानने ताम्यति
क्रंदत्सु भ्रमरेषु वीक्ष्य दयिताश्लिष्टं पुरः सारसम् ॥
चक्राह्वेण वियोगिना बिसलता नाऽऽस्वादिता नोज्झिता
कंठे केवलमर्गलेव निहिता जीवस्य निर्गच्छतः ॥ ३२६ ॥

" सूर्य दिगंतरीं चालता झाला असतां कमलवन हें निमीलितमुख होत्सातें दीनवाणें दिसूं लागलें असतां, तसेंच हंसास सप्रियांनीं आलिंगित पाहून भ्रमर दुःखानें आक्रोश करूं लागले असतां, चक्रवाक पक्षी स्त्रीवियुक्त होत्साता कमलतंतु तोंडीं धरीना व टाकूनही देईना, तर त्यानें ते कंठाचे ठायीं नुसते धारण मात्र केले, कीं प्राण जाऊं लागल्यास त्यांस त्यांनीं अटकाव करावा ! "

प्रियायाः प्रत्यूषे गलितकबरीबंधनविधा-
वुदंचद्दोर्वल्लीदरदलितचेलांचलपुरः ॥

घनाकूते पश्यत्यथ मयि समंदाक्षिवलितम्
नर्मत्या यद्रूपं न हि लिखितुमीशो मनसिजः ॥ ३२७॥

" प्रिया प्रभातसमयीं गलितकचभाराचें बंधन करूं लागली असतां तिच्या उन्नमित भुजांनीं किंचित् अस्ताव्यस्त झालेल्या अंचलाकडे व वक्षःप्रदेशाकडे मी सस्पृह पाहूं लागलों असतां तिनें खालीं लवून लज्जामंदकटाक्षांनीं जें मजकडे अवलोकन केलें तें रेखण्यास प्रत्यक्ष मदनहीं समर्थ होणार नाहीं ! "

सहस्रकरपूरणाभिखिलजंतुवक्त्रांबुज-
प्रकाशकरणादथ प्रबलवैरितेजोवधात् ॥
दरिद्रतिमिरोद्धृतेरखिलभूपचूडामणि-
र्जगन्मणिरहर्मणिर्जगदिदं च धत्तः समम् ॥ २२८ ॥

कोणी कवि राजाचा स्तव करतोः—" सर्व भूपांत श्रेष्ठ व पृथ्वीचें रत्न असा हा राजा आणि सूर्य हे दोघे मिळून जगाचें धारण करीत आहेत; कसें ? तर सूर्य सहस्रकिरण प्रगट करतो व हा राजा हजारों याचकांचे हस्त दानपूरित करतो; सूर्य सर्व प्राण्यांच्या मुखकमलांस प्रकाशित करतो व राजाही सर्वांचीं तोंडें प्रफुल्लित करतो; सूर्य इतर ग्रह जे त्याचे प्रतिस्पर्धी त्यांचा तेजोवध करतो आणि राजा आपल्या शत्रूंस स्वप्रतापानें दिपवून टाकतो; आणि सूर्य जसा अंधकाराचा ध्वंस करतो त्याप्रमाणें राजा हा राष्ट्रांत दारिद्र्य म्हणून राहूं देत नाहीं ! "

सेयं सीधुमयी वा सुधामयी वा हलाहलमयी वा ॥
दृग्भ्यां निपीतमात्रा मदयति मोदयति मूर्छयति च ॥ ३२९ ॥

" ही मद्यमय आहे ! अमृतमय आहे ! किंवा विषमय आहे हें मला कळत नाहीं; पहा कीं डोळ्यांनींच हिचें प्राशन करतांच उन्माद येतो. हर्ष होतो, व मूर्छाही प्राप्त होते ! "

दोषमपि गुणवति जने दृष्ट्वा गुणरागिणो न खिद्यंते ॥
प्रीत्यैव शशिनि पतितं पश्यति लोकः कलंकमपि ॥ ३३० ॥

" गुणवंताच्या ठायीं दोष पाहूनही गुणाचे चाहते खेद पावत नाहींत; पहा कीं चंद्रावरचा कलंकही लोक प्रीतीनेंच पाहतात ! "

अनवसरे गुणवानपि हृदयादवतार्यते स्त्रिया हारः ॥
पश्य शलाकावसरे भूपेनापि प्रसार्यते स्वकरः ॥ ३३१ ॥

“ हार हा गुणवान् खरा तथापि अप्रसंगीं तो स्त्रियांकडून हृदयापासून दूर केला जातो आणि दुसऱ्यापक्षीं म्हणजे प्रसंगींचे ठायीं राजाही काडी-करतां आपला हात पसरतो ! ” वरील दोन्ही प्रसंग सहज लक्ष्यांत येण्यासारखे आहेत; पहिला रतीचा व दुसरा भोजनोत्तर आचमन समयींचा. ‘गुणवान्’ यावरचा नेहमींचा श्लेष स्फुट करावयास नकोच.

संतु नाम भुवनेषु देवता यास्तपोभिरपि दूरदर्शनाः ॥
भाति गर्भशिशुरक्षणेऽप्यलं यत्कृपा निरलसा समे गतिः॥३३२॥

“ भुवनाचे ठायीं असणाऱ्या ज्या अनेक देवता आहेत, कीं ज्या तपें करूनही दर्शन देत नाहींत. त्या एकीकडे असूं द्या; माझी श्रद्धा त्या परमेश्वरावरच आहे कीं, ज्याची कृपा गर्भींच्या बालकाच्या रक्षणाविषयींही समर्थ आहे ! ”

अपूर्वरसनाव्याली खलाननबिलेशया ॥
कर्णमूले दशत्यन्यं हरत्यन्यस्य जीवनम् ॥ ३३३ ॥

“ खलाचें मुख हेंच कोणी विवर यांत राहणारी जी जिव्हारूप विलक्षण सर्पीण ती एकाच्या कानाला डसते आणि तिसऱ्याचाच जीव जातो ! ” अर्थ उघडच आहे कीं चहाडलोक एकाच्या कानाला लागतात आणि त्याचा परिणाम निराळ्याच मनुष्यावर घडतो.

चरंतीनां सौधे नृपतिरमणीनां तनुरुचो
गवाक्षांतर्वाताः कतिचन गृहीत्वा जलमुचः ॥
क्षणे गोपायंति क्षणरुचिमिषेण क्षणमहो
विवृण्वंति स्वर्णं करगतमिवाकिंचनजनः ॥ ३३४ ॥

“ राजस्त्रिया आपल्या महालांत फिरत असतां गवाक्षमार्गानें बाहेर पडलेल्या ज्या त्यांच्या शरीरप्रभा त्यांपैकीं मेघांनीं कांहीं लुबाडून घेऊन त्याच आतां विद्युल्लतेच्या मिषानें क्षणभर प्रगट व क्षणभर अप्रगट करीत आहेत, कीं ज्याप्रमाणें निर्धन पुरुष कोणाचा अपहार करून मिळविलेलें सोनें केव्हां लपवितात केव्हां बाहेर काढतात ! ”

चंचत्कांचनशैलावस्या वक्षोरुहौ तन्व्याः ॥
नो चेत्तावधिरूढा कथमनिमिषतां भजेत मे दृष्टिः ॥३३५॥

" या तन्वीचे वक्षोज हे कांचनशैल (सुमेरू) होत ह्यांत संशय नाहीं. कां कीं, तसें नसतें तर त्यावर आरूढ होतांच माझी दृष्टि अनिमिष झाली हें कसें ? " *

बलिः पातालनिलयोऽधः कृतश्चित्रमत्र किम् ॥
अधःकृतो दिवस्थोऽपि चित्रं कल्पद्रुमस्त्वया ॥ ३३६ ॥

" हे राजा ! पातालांत असणाऱ्या बलीस तूं दानशूरत्वांत खालीं केलास यांत नवल तें काय ? पहा, स्वर्गस्थ कल्पतरूस तूं खालीं करून टाकला आहेस !"

यदेतच्चंद्रांतर्जलदलवलीलां वितनुते
तदाचष्टे लोकः शशक इति नो मां प्रति तथा ॥
अहं त्विंदुं मन्ये त्वदरिविरहाक्रांततरुणी-
कटाक्षोल्कापातव्रणकणकलंकांकिततनुम् ॥ ३३७ ॥

चंद्रगत कलंकावर उत्प्रेक्षाः—" हे राजा ! चंद्राच्या ठायीं लहानशा ढगासारखें जें दिसतें त्याविषयीं लोक अशी कल्पना करतात कीं, तो ससा आहे, पण मला तसें भासत नाहीं; माझी कल्पना अशी होते कीं, तुझ्या शत्रूंच्या स्त्रिया या पतिविरह असह्य होऊन चंद्राकडे जे निर्भर्त्सनपर तीव्र कटाक्ष फेंकतात त्यांच्या योगानें त्यास व्रण पडले असावेत ! "

रे रे रासभ वस्त्रभारवहनात्कुग्रासमश्नासि किम्
राजाश्वावसथं प्रयाहि चणकाभ्यूषान्सुखं भक्षय ॥
सर्वान्पुच्छवतो हयानिति वदंत्यत्राधिकारे स्थिता
राजा तैरुपदिष्टमेव मनुते सत्यं तटस्थाः परे ॥ ३३८ ॥

---

* अनिमिष म्हणजे जिचीं पातीं लवत नाहीत अशी सुमेरूवर वास करणारे जे देव त्यांच्या लक्षणांपैकीं एक लक्षण हें आहे कीं, मनुष्याप्रमाणें त्यांच्या डोळ्यांच्या पापण्या लवत नाहींत. तर यावरून कवि कल्पना करतो कीं ज्या अर्थी आरोहणमात्रेंकरून हें दैविक लक्षण दृष्टीस प्राप्त झालें,—म्हणजे ती तेथें निश्चित झाली,—त्या अर्थी वक्षोज हे खरोखर सुवर्णाचल होत !

" हे रासभा ! तूं परटांच्या घरीं राहून पांघुरणांचे भारे वाहण्याचे कष्ट करून उगाच कुग्रास कां खातोस ? तर तुला सांगतों असें कर, राजाच्या वाड्यांत प्रवेश कर, म्हणजे तुला शानदार हरभऱ्यांची चंदी मिळत जाईल. कसें म्हणशील तर अश्वशालेवरील अधिकाऱ्यांची परीक्षा इतपत आहे कीं, शेपूट असली कीं, त्या जनावरास घोडा म्हणून ते बाळगतात. राजाचा पूर्ण भरंवसा त्यांच्यावर आणि इतर केवळ उदासीन, त्यांस कसचीच फिकीर नाहीं!"

यत्पूर्वं पवनाग्निशस्त्रसलिलैश्चीर्णं तपो दुश्चरम्
तस्यैतत्फलमीदृशं परिणतं यज्जातरूपं वपुः ॥
मुग्धापांगकपोलचुंबनसुखं संगश्च रत्नोत्तमैः
प्राप्तः कुंडल वांछसे किमपरं यन्मूढ दोलायसे ॥ ३३९ ॥

" हे कुंडला ! वायु, अग्नि, शस्त्रें आणि उदक या सर्वांचें सेवन करून जें तूं दुर्धर तप आचरलेंस त्याचें फळ हें तुला प्राप्त झालें आहे कीं, तुझी सुवर्णरूप काया बनली, तरुणीच्या नेत्रप्रांतभागाचें व कपोलाचें चुंबन तुला घडतें आणि उत्कृष्ट रत्नांशीं तुझा सहवास झाला आहे; मग इतकें भाग्यही पुरेसें न होऊन तूं अजून जे झोंके खात आहेस त्या तुझ्या मनांत वेड्या ! आणखी ती हाव कसली आहे ? " सोनें हें मूळच्या खनिज स्थितींत असतां त्याजवर त्याची खरी कळा आणण्यास अग्न्यादि संस्कार त्यास व्हावे लागतात हें प्रसिद्धच आहे; व त्याप्रमाणेंच पंचाग्निसाधन वगैरे तपश्चरणाचे मार्ग आहेत हेंही प्रसिद्धच आहे. कुंडलाचें आंदोलन स्वभावसिद्ध असतां त्यावर ही वरील कल्पनाच केली आहे.

मांधाता च महीपतिः कृतयुगालंकारभूतो गतः
सेतुर्येन महोदधौ विरचितः क्वासौ दशास्यांतकः ॥
अन्ये चापि युधिष्ठिरप्रभृतयो याता दिवं भूपते
नैकेनापि समं गता वसुमती नूनं त्वया यास्यति ॥ ३४० ॥

भोजप्रबंध.

मुंजराजानें भोज्याच्या वधार्थ जे पुरुष पाठविले होते ते पुढील लेख घेऊन त्याच्याकडे परत आले. आपला वध निश्चित होणार असें पाहून पुढील

निर्भर्त्सनगर्भित श्लोक भोजानें रचून आपल्या चुलत्याच्या हवालीं करण्यास सांगितलें:—

" राजा! कृतयुगास अलंकारभूत जो मांधाता राजा तो गेला; ज्यानें महोदधीवर सेतु रचना केली तो दशाननांतक राम तरी कोठें आहे? दुसरे जे युधिष्ठिरादि राजे मोठे मोठे होऊन गेले तेही सर्व स्वर्गाचा मार्ग धरते झाले;—पण इतक्यांपैकीं एका बरोबरही ही पृथ्वी गेली नाहीं. ही बहुधा तुजबरोबर मात्र येईल असें वाटतें! "

मुरली महदीयवंशजा परपुंसा परिचुंबिता सती ॥
विजने विपिने भयातुरा परमेशं स्मरती ररास सा ॥ ३४१ ॥

" महावंशापासून (पक्षीं, वेळूपासून) उत्पन्न झालेली मुरली ही परपुरुषानें (पक्षीं कृष्णानें) चुंबिली गेली असतां, आपण एकीकडे रानीं आहों असें जाणून भयभीत होत्साती परमेशाचें स्मरण करूनच जणों काय आक्रोश करती झाली! "

विद्वद्राजशिखामणे तुलयितुं धाता त्वदीयं यशः
कैलासं च निरीक्ष्य तत्र लघुतां निक्षिप्तवान्पूर्तये ॥
उक्षाणं तदुपर्युमासहचरं तन्मूर्ध्नि गंगाजलम्
तस्याग्रे फणिपुंगवं तदुपरि स्फारं सुधादीधितिम् ॥ ३४२ ॥

" हे सुज्ञशिरोमणि राजा! तुझ्या यशाचें परिमाण करण्याचें मनांत आणून ब्रह्मदेवानें पहिल्यानें सगळा कैलासचा कैलास पारड्यांत घातला; पण तेवढ्यानें होत नाहींसें पाहून नंतर त्यावर नंदी उभा केला; त्यापुढें शिव व पार्वती हीं नंदीवर बसविलीं. पुढें शिवाच्या जटेवर गंगेस ठेविलें. नंतर सर्प व सरतेशेवटीं देदीप्यमान चंद्र यांचें आरोपण केलें! "

दारिद्र्यानलसंतापः शांतः संतोषवारिणा ॥
याचकाशाविघातांतर्दाहः केनोपशाम्यतु ॥ ३४३ ॥

" दारिद्र्यरूप अग्नीचा संताप संतोषरूप उदकानें शमन पावला; पण दारीं आलेल्या याचकाच्या आशाभंगानें जो अंतर्दाह होतो तो कशानें शांत व्हावा? " तात्पर्य हें कीं, स्वतःचें दैन्य सज्जन हे धैर्येंकरून सोसतील; पण

दुसऱ्याच्या दैन्याचें निवारण करण्याचें जें असामर्थ्य दरिद्र्याच्या पोटीं येतें त्याचे दुःखावेग कसे सहन करावे ?

धन्या सा गृहदेहली स्पृशति या तत्पादपद्मप्रभाम्
जाता सा सरसी रसाद्विशति सा यस्यां विहारेच्छया ॥
वंद्यः कोऽपि स एव यः खलु तया नेत्रेण संभाव्यते
धिग्धिग्वेधसमेषु मां यदनयत्रैकं कथंचित्कथम् ॥ ३४४ ॥

कोणी उत्कंठित म्हणतोः—" तिच्या चरणाची प्रभा ज्याच्यावर पडते तो उंबरठा धन्य होय; ज्या पुष्करिणींत ती विहार करण्यास हौसेनें उतरते ती स्पृहणीय होय; व जो कोणी तिच्या प्रेक्षणानें धन्यत्व पावतो तो वंद्य होय; पण ब्रह्मदेवास धिक्कार असो कीं, त्यानें या तिहींपैकीं एके ठिकाणींही माझा योग होऊं दिला नाहीं ! "

स्फुरसि बाहुलते किमनर्थकम्
त्वमपि लोचन वाम भव स्थिरम् ॥
तमहमागतमप्यपराधिनम्
न परिरब्धुमलं न च वीक्षितुम् ॥ ३४५ ॥

" हे भुजलते ! तूं उगीच कशाला स्फुरण पावतेस ? हे वामनेत्रा ! तूंही स्थिर हो कसा ! कां कीं तो अपराधी मजकडे आला तरीही मी त्यास आलिंगन करणार नाहीं किंवा त्याच्याकडे नुसती पाहणार देखील नाहीं ! " ही अर्थातच खंडित झालेल्या मानिनीची उक्ति होय.

याः पश्यंति प्रियं स्वप्ने धन्यास्ताः सखि योषितः ॥
अस्माकं तु गते कांते गता निद्रापि वैरिणी ॥ ३४६ ॥

" ज्या स्त्रियांस आपल्या वल्लभाचा समागम स्वप्नांत घडतो त्या धन्य होत; पण आमची तर विरहसमयीं अशी स्थिति होते कीं, वैरीण निद्राही आम्हांस पारखी ! "

राजन्दौवारिकादेव प्राप्तवानस्मि वारणम् ॥
मदवारणमिच्छामि त्वत्तोऽहं जगतीपते ॥ ३४७ ॥

" हे राजा ! तुझ्या द्वारपालापासून मी वारण (गमनप्रतिबंध—पक्षीं,

हत्ती) पावलों; तेव्हां आतां तुजपासून मदवारणाची (माझ्या अप्रतिबंधाची—पक्षीं, मंदोन्मत्त हत्तीची) मी अपेक्षा करतों ! "

अर्था न संति न च मुंचति मां दुराशा
त्यागे रतिं वहति दुर्ललितं मनो मे ॥
याञ्चा च लाघवकरी स्ववधे च पापम्
प्राणाः स्वयं व्रजत किं परिदेवितेन ॥ ३४८ ॥

कोणी दरिद्री आपली स्थिति वर्णितोः—" मजपाशीं पैसा नाहीं; इकडे पहावें तर द्रव्यतृष्णा मला सोडीत नाहीं. माझें लाडकें मन दुसऱ्याची धनाशा पूर्ण करण्याविषयीं उत्सुक होतें; पण इकडे याच्ञा तर लघुत्व आणणारी आहे. बरें, या दोहेरी त्रासापासून आपणास मुक्त करून टाकीन म्हटलें तर आत्महत्येचें महापातक धरलें आहे. तेव्हां हे प्राणांनो ! तुम्ही आपोआपच मला सोडून जा कसे ! व्यर्थ शोक करून फळ काय ? "

कूपे पानमधोमुखं भवति मे नद्यो वराक्यः स्त्रियः
सारंगैर्बकटिट्टिभैः सह सरस्येवं समालोकयन् ॥
नाऽऽदत्ते तृषितोऽपि हीनसलिलं क्रूरैर्वृतं जंतुभि-
र्मानादुन्नतकंधरः सुरपतिं तच्चातको याचते ॥ ३४९ ॥

चातकाच्या दिव्यजलपानावर उत्प्रेक्षाः—" विहिरीचें पाणी पिण्यास अधोमुख व्हावें लागतें, नद्या तर बिचाऱ्या स्त्रियाच आहेत, सरोवर हें हंस, बक आणि टिट्टिभ यांनीं परिपूर्ण असतें; तेव्हां क्रूर प्राण्यांनीं व्याप्त अशा कुजलसंचयापासून जें उदक घ्यावयाचें तें तृषासमयींही घेण्याचें न पतकरून मानी जो चातक तो गर्वानें ऊर्ध्वकंठ होत्साता देवाधिदेव जो इंद्र त्यापाशीं काय ती याचना करतो. "

भवारण्यं भीमं ननु गृहमिदं छिद्रबहुलम्
बली कालश्चोरो नियतमसिता मोहरजनी ॥
गृहीत्वा ज्ञानासिं विरतिफलकं शीलकवचम्
समाधानं कृत्वा स्थिरतरदृशो जागृत जनाः ॥ ३५० ॥

" हे जनहो ! हें संसारारण्य भयंकर आहे, शरीररूप गृह सुरक्षित

असेल म्हणावें तर हें मुळींच बहुच्छिद्र आहे, मृत्युरूप चोर हा बलिष्ठ आहे, मूढत्वरूप रात्री ही केवळ अंधकारव्याप्त आहे; तर ज्ञान हाच खड्ग, शांति हीच ढाल, शील हेंच कवच अशीं तीन घेऊन मोठ्या खबरदारीनें जागत बसा ! ”

दैवे समर्प्य चिरसंचितकर्मजालम्
सुस्थाः सुखं वसत किं परयाचनाभिः ॥
मेरुं प्रदक्षिणयतोऽपि दिवाकरस्य
ते तस्य सप्त तुरगा न कदाचिदष्टौ ॥ ३५१ ॥

“ चिरसंचित हें कर्मजाल त्याचा दैवावर हवाला ठेवून स्वस्थपणेंकरून सुखानें राहा; मग याचना करून काय प्राप्त होणार आहे ? पहा कीं, येवढा सूर्य सुवर्णमेरूस प्रदक्षिणा घालीत असतां त्याचे जे सात घोडे आहेत ते आहेत; साताचे आठ कधीं तरी झाले आहेत काय ? ”

परस्परं संवदतां जडानां मौनं विधेयं सततं सुधीभिः ॥
कोलाहले काकजनस्य जाते विराजते कोकिलकूजितं किम्॥३५२॥

“ मूर्खांचें परस्पर भांडण लागलें असतां बुद्धिमान् पुरुषांनीं नेहेमीं मौन धारण करावें हें बरें; कावळ्यांचा कलकलाट चालला असतां कोकिलाचें कूजित शोभतें काय ? ”

उपभुक्तखादिरवीटीजनिताधररागभंगभयात् ॥
पितरि मृतेऽपि हि वेश्या रोदिति हा तात तातेति ॥ ३५३ ॥

“ विडा खाऊन कातानें तोंड रंगलें असतां अधरोष्ठाची लाली मोडेल या भयानें वेश्या ही आपल्या बापाच्या मरणाची बातमी ऐकून निरोष्ठ शोक करते, “ हा तात ! हा तात ! ” (‘ हा पितः ’ म्हणेल तर ओठाला ओठ लागून अधररागाचा भंग होईल !) ”

किमंगारवद्गां खुरैः स्पर्शयंतः कुरंगा इवांगानि संकोचयंतः ॥
अटंतो नटंतो भटं तोषयंतस्तुरंगाः सुरंगाः पुरं गाहयंति॥३५४॥

“ पृथ्वीवर जणों काय निखारेच पसरले आहेत अशा भावनेनें तिला खुरांनीं स्पर्श करणारे, न करणारे, हरणांप्रमाणें अंगसंकोच करणारे, फिरणारे,

नाचणारे आणि राउताच्या मनांत भरणारे, असे चांगल्या तऱ्हेचे घोडे नगरींत प्रवेश करिताहेत ! "

यदि प्रभुरुदारधीः सुरसकाव्यकौतूहल-
स्तथैव च सभासदः सदसि तद्गुणग्राहिणः ॥
सुवर्णसदलंकृतिर्भवति तत्र नृत्योद्यता
मदीयरसनानटी रसघटीयमानंदभूः ॥ ३५५ ॥

" जर प्रभु उदार असेल आणि सुरसकाव्याच्या श्रवणाविषयीं त्यास हौस असेल, त्याप्रमाणेंच सभासद हे काव्यगुणग्राहक असतील, तर रसाची कवळ पात्रीच आणि आनंददायक अशी जी माझी जिव्हारूप नटी, ती सुवर्ण (सोने, उत्तमवर्ण)–घटित अलंकारांनीं (श्लेष स्पष्टच आहे.) युक्त होत्साती सभेंत नृत्य करण्यास तयार आहे ! "

यन्नाम्नः प्रथमाक्षरं विजयते भानौ द्वितीयाक्षरम्
नृत्यं नृत्यति सत्कवींद्रवदने भूत्वांऽत्यवर्णद्वयम् ॥
रामो रावणमाजघान समरे शंभोः शिरःशालिनी
सा सर्वाक्षरमालिनी भवतु मे भाग्याय भागीरथी ॥ ३५६ ॥

" जिच्या नांवाचें पहिलें अक्षर (भा–'तेज') सूर्याचे ठायीं विराजमान होतें, दुसरें (गी–' वाणी ') सत्कवींच्या वदनाचे ठायीं नृत्य करतें आणि शेवटलीं दोन अक्षरें (रथी) होऊन रामानें रावणास रणांगणीं मारिलें ती शंभुशिरीं शोभणारी सर्वाक्षरयुक्त भागीरथी माझा भाग्योदय करो. "

स्वयं स्थाणुरपर्णा स्त्री विशाखस्तनयः स्मृतः ॥
तथाऽपि कुरुते छायां भवतापापहारिणीम् ॥ ३५७ ॥

" शिव हा स्वतः स्थाणु (शंकर; झाडाचा बुंधा) आहे, स्त्री अपर्णा (पार्वती; पर्णरहिता) आणि पुत्र विशाख (कार्तिकेय; शाखारहित) होय, तरी शिवाची छाया संसारसंतापास दूर करते ! "

बिडौजाः पुरा पृष्टवानब्जयोनिं धरामंडले सारभूतं किमस्ति ॥
चतुर्भिर्मुखैरुत्तरं तेन दत्तं तमाखुस्तमाखुस्तमाखुस्तमाखुः ॥३५८॥

" पूर्वी एके समयीं असें झालें कीं, इंद्रानें ब्रह्मदेवास प्रश्न केला, कीं

पृथ्वीतलावर सर्वोत्कृष्ट वस्तु आपण कोणती निर्माण केली आहे ? ब्रह्मदेवानें चारी मुखांनीं एकदम उत्तर केलें, " तमाखु, तमाखु, तमाखु, तमाखु ! "

कीटोऽयं भ्रमरी भवेदविरतध्यानात्तथा चेदहम्
रामः स्यां त्रिजटे तथा ह्यनुचितं दांपत्यसौख्यच्युता ॥
एवं चेत्कृतकृत्यतैव भविता रामस्तव ध्यानतः
सीता त्वं च निहत्य राक्षसपतिं सीतांतिके यास्यसि ॥३५९॥

सीता अशोकवनिकेंत असतां तिनें व त्रिजटेनें एका भ्रमरानें एक किडा धरलेला पाहिला. त्यावरून सीता त्या राक्षसीस म्हणते:—

" हे त्रिजटे ! या किड्यास भ्रमराचें ध्यान लागलें असल्यामुळें हा भ्रमर होईल, तद्वतच मीही जर राम बनलें तर मोठें अनुचित होऊन मी दांपत्यसौख्यापासून भ्रष्ट होईन. " त्रिजटा म्हणते, " असें जर घडेल तर कृतकृत्यता होईल; कां तर राम तुझ्या ध्यानेंकरून सीता होईल आणि तूं राम होत्साती रावणास मारून सीतेच्या भेटीस जाशील ! "

जन्मप्रभृति वक्रस्य हलस्य च खलस्य च ॥
सोढुं तयोर्मुखाक्षेपं भवत्येकैव सा क्षमा ॥ ३६० ॥

" जन्मापासून वक्र जो हल (नांगर) आणि खल यांच्या तोंडाचा तडाखा सोसण्यास एक क्षमाच (पृथ्वी; क्षांति) समर्थ ! "

धत्तूर धूर्त तरुणेंदुनिवासयोग्ये
स्थाने पिशाचपतिना विनिवेशितोऽपि ॥
किं कैरवाणि विकसंति तमः प्रयाति
चंद्रोपलो द्रवति वार्धिरुपैति वृद्धिम् ॥ ३६१ ॥

" हे शाहण्या धोतऱ्या ! जें स्थान बालचंद्राच्या वसतीस योग्य तेथें शंकरानें तुला ठेविला असतांही तुझ्या योगानें कैरवें विकास पावतात काय ? अंधकाराचा नाश होतो काय ? चंद्रकांत द्रवतो काय ? आणि समुद्र वाढतो काय ? "

तथ्यं पथ्यं सहेतु प्रियमितमृदुलं सारवद्दैन्यहीनम्
साभिप्रायं दुरापं सविनयमशठं चित्रमल्पाक्षरं च ॥

बहर्थं कोपशून्यं स्मितयुतघनदाक्षिण्यसंदेहहीनम्
वाक्यं ब्रूयाद्रसज्ञः परिषदि समये सप्रमेयाप्रमत्तम् ॥ ३६२ ॥

" रसज्ञानें समेत समय पाहून जें वाक्य बोलावयाचें तें अशा प्रकारचें असावें:—खरें, हितकर, सप्रमाण, प्रिय, मित, मृदु, अर्थयुक्त, धीटपणाचें, साभिप्राय, दुर्लभ, विनययुक्त, प्रांजल, मनोहर, स्वल्प, प्रौढ, शांत, सस्मित, दाक्षिण्ययुक्त, निःसंदेह, प्रमेयसहित आणि प्रमादरहित. "

पदशब्दलीनहृदयो रूपालंकारभावनाचतुरः ॥
कविरिव विनिद्रितनिद्र (संचितमुद्र) स्तरुणि तवार्थे स्थितस्तरुणः ३६३

दूति नायिकेस सांगते:—" हे तरुणि, जसा कवि पदांच्या शब्दांच्या रचनेंत गढून गेला असतो व रूपकालंकार साधण्याविषयीं चतुर असतो त्याप्रमाणें नायक हा निद्रेचें मिष करून तुझ्याकरतां संकेतस्थानीं येऊन बसला आहे; कसा तर तुझ्या पावलांचा शब्द ऐकण्याविषयीं परमोत्सुक आणि तुझें रूप व अलंकार यांची मनोमय भावना करण्यांत चूर होऊन गेलेला असा !"

उद्भिन्नं किमिदं मनोभवनृपक्रीडारविंदद्वयम्
सूते तत्कथमेकतः किल लसद्रोमावलीनालतः ॥
चक्रद्वंद्वमिदं क्षमं तदपि न स्थातुं मुखेंदोः पुरो
लावण्यांबुधिमग्नयौवनगजस्याविमि कुंभद्वयम् ॥ ३६४ ॥

कोणी कवि स्तनद्वयावर उत्प्रेक्षा करतो:—" मदननृपाचें हें क्रीडाकमलद्वय उत्पन्न झालें काय ! पण असें म्हणावें तर उदरस्थलावर शोभणारी जी रोमावलीरूप वेली ती एक असतां या पुष्पद्वयास कशी प्रसवेल ? तेव्हां ही कल्पना जमत नाहीं बरें, हें चक्रवाक पक्ष्यांचें जोडपें आहे म्हणावें तर मुखचंद्राच्या समोर हें वियुक्त झाल्याखेरीज कसें राहील ? तेव्हां माझा असा तर्क होतो कीं लावण्यरूप जलाशयांत बुडी मारून राहिलेला जो यौवनरूप गज त्याचें हें गंडस्थल होय ! "

दंता विश्लथदंताः केशाः काशप्रसूनसंकाशाः ॥
नयनं तमसामयनं तथाऽपि चित्तं धनांगनायत्तम् ॥ ३६५ ॥

" दांत हालूं लागले, केश हे काशपुष्पाप्रमाणें पांढरे झाले, डोळे हे

अंधकाराचें स्थान झालें, तथापि चित्ताची आसक्ति धन आणि स्त्री यांवरील कमी होत नाहीं ! ”

तप्ता मही विरहिणामिव चित्तवृत्ति-
स्तृष्णाऽध्वगेषु कृपणेष्विव वृद्धिमेति ॥
सूर्यः करैर्दहति दुर्वचनैः खलो नु
च्छाया सतीव न विमुंचति पादमूलम् ॥ ३६६ ॥

उष्णकालांतील मध्यान्हाचें वर्णनः—“ विरही पुरुषांच्या चित्तवृत्ती-प्रमाणें पृथ्वी ही अत्यंत तप्त झाली आहे, कृपणाचे ठायीं जशी (धन-) तृष्णा वाढत असते त्याप्रमाणें पांथांची या वेळेस वाढत आहे, जसा दुर्जन हा दुर्वचनांनीं दुसऱ्यास जाळीत असतो त्याप्रमाणें सूर्य हा आपल्या किरणांनीं संताप करीत आहे आणि छाया ही साध्वीप्रमाणें चरणांची मिठी सोडीत नाहीं ! ”

जीवंतु मे शत्रुगणाः सदैव तेषां प्रसादात्सुविचक्षणोऽहम् ॥
ये ये यथा मां प्रति बाधयंति ते ते तथा मां प्रति बोधयंति॥ ३६७॥

“ माझे शत्रुगण चिरकाळ जिवंत असोत; त्यांच्या प्रसादानें मला बुद्धि प्राप्त झाली आहे. जे जे मला बाधा करतात ते ते मला त्याच मानानें बोधही करतात ! ”

रोलंबो मधुपः पिकस्तु परभृद्रंध्रानुसारी मरु-
द्धंसाः केवलपक्षपातनिरताश्चंद्रोऽपि दोषाकरः ॥
चेतो नैति शुकस्त्विहैकपठिताख्यायी पयोदो जडः
कं वाऽहं प्रहिणोमि हंत कठिनस्वांताय कांताय मे ॥ ३६८॥

कोण्या विरहिणीची उक्तिः—“ कठिणहृदय जो वल्लभ त्याच्याकडे दूत तरी कोण पाठवावा ? भ्रमर तर मधुप (मद्यप), कोकिल दुसऱ्याचे घरीं वाढलेला, वायु हा रंध्रान्वेषी, हंस हे केवळ पक्षपात करणारे (नेहमीं पंख हलविणारे), चंद्र हा दोषाकर (दोषांची खाण; निशाकर), मनाच्यानें तर जावयतच नाहीं, शुक पढविलेलें तेवढें बोलणारा आणि मेघ हा जड (मंदबुद्धि) होय ! ”

बहुनिष्कपटद्रोही बहुधान्योपघातकः ॥
रंध्रान्वेषी च सर्वत्र दूषको मूषको यथा ॥ ३६९ ॥

खल आणि मूषक यांचें साम्यः—(खलपक्षीं) "जे अत्यंत निष्कपट त्यांचा द्रोह करणारा, प्रायः दुसऱ्याच्या नाशाविषयीं उद्युक्त आणि सर्वत्र छिद्रान्वेषणाविषयीं तत्पर, असा खल असतो "

(मूषकपक्षीं) " अत्यंत मूल्यवान् वस्त्रांचा नाश करणारा, धान्याचा विध्वंस करणारा आणि जिकडे तिकडे भोंकें पाडणारा. "

आजन्मानुगतेऽप्यस्मिन्नाले विमुखमंबुजम् ॥
प्रायेण गुणपूर्णेषु रीतिर्लक्ष्मीवतामियम् ॥ ३७० ॥

" जन्मापासून अनुगत म्हणजे मागें असणारें जें नाल त्याशींही कमल हें विकसित होऊं लागलें असतां विमुख होतें, तेव्हां लक्ष्मी ज्यांस प्राप्त होते, त्यांची गुणवंतांविषयीं (' गुण ' शब्द श्लिष्ट होय.) अनास्था व्हावयाची ! "

तवैव प्रावीण्यं जलद जगदानंदकरणम्
यदंभःपालीराहरसि खलसत्त्वाज्जलनिधेः ॥
निसर्गात्क्षारास्ता नयसि च कथंचिन्मधुरता-
मथाऽऽसारैस्तासां युगपदुपकर्तासि जगतः ॥ ३७१ ॥

" हे मेघा ! तुझेंच कौशल्य या जगास आनंद करणारें आहे. तें असें कीं, दुष्टसत्त्व (दुष्टस्वभाव, पक्षीं दुष्ट आहेत जलचर ज्यांत) जो समुद्र त्यापासून उदकसमूहाचें तूं हरण करतोस आणि तीं उदकें स्वभावतः क्षारयुक्त असतां त्यांचे ठायीं तूं चमत्कारिक रीतीनें माधुर्य उत्पन्न करून त्यांच्या वृष्टींनीं जगाचें हित करतोस ! "

अक्षराणि परीक्ष्यंतामंबराडंबरेण किम् ॥
शंभुरंबरहीनोऽपि सर्वज्ञः किं न जायते ॥ ३७२ ॥

" कोणाच्या विद्वत्तेची परीक्षा कर्तव्य असतां त्याची विद्या पहावी; पोषाखाचा थाटमाट काय करायाचा आहे ? पहा कीं, शंभु हा वस्त्रहीन असल्यानें त्याची सर्वज्ञता नाहींशी होते काय ? "

इह रूपमात्रसारे चित्रगते कनककह्लारे ॥
न रसो नापि च गंधो मधुकरबंधो वृथा भ्रमसि ॥ ३७३ ॥

" हे मूढ मधुकरा ! हें चित्रांतील सुवर्णकमल केवळ रूपानें मात्र खऱ्या

कमळासारखें आहे ! यांत मकरंद नाहीं व सुगंधही नाहीं। मग उगीच कशाला भोंवतालीं हिंडत आहेस ? ”

कवयति पंडितराये कवयंत्यन्येऽपि विद्वांसः ॥
नृत्यति पिनाकपाणौ नृत्यंत्यन्येऽपि भूतवेतालाः ॥३७४॥

पंडितराय आपली व स्वकालीन कवींची तुलना करतातः—

“ पंडितराय कविता करीत असतां दुसरे विद्वान्ही कवित्व करीत आहेत; ज्याप्रमाणें शिव तांडव करूं लागला असतां भूतवेतालादि मंडळीही नाचूं बागडूं लागते ! ”

च्युता दंताः सिताः केशा वाङ्निरोधः पदे पदे ॥
पातसज्जमिमं देहं तृष्णा साध्वी न मुंचति ॥ ३७५ ॥

“ दांत पडले, केंस पांढरे झाले आणि प्रत्येक शब्दाला जीभ अडखळते; पण याप्रमाणें हा देह पतनोन्मुख झाला असतां आशा ही साध्वी स्त्रीप्रमाणें त्यास सोडीत नाहीं ! ”

अलमतिचपलत्वात्स्वप्नमायोपमत्वा-
त्परिणतिविरसत्वात्संगमेनांगनायाः ॥
इति यदि शतकृत्वस्तत्त्वमालोकयाम-
स्तदपि न हरिणाक्षीं विस्मरत्यंतरात्मा ॥ ३७६ ॥

“ क्षणभर टिकणारा, स्वप्नदर्शनाप्रमाणें आभासरूप आणि परिणामीं विरस, असा जो स्त्रीसंगम तो पुरे झाला, असें शंभर वेळां जरी आपणास तत्त्व कळलें, तथापि जीव हा हरिणाक्षीपुढें पुनः लुटपुटतोच ! ”

औत्सुक्यात्परिमिलतां त्रपया संकोचमंचतां च मुहुः ॥
नवसंगमयोर्यूनोर्नयनानामुत्सवो जयति ॥ ३७७ ॥

“ उत्सुकतेनें एके ठिकाणीं मिळणारें आणि लज्जेनें पुनः संकोच पावणारे असे जे नूतन विवाहित स्त्रीपुरुषांचे नेत्र त्यांचा विलास हा अत्यंत शोभा पावतो ! ”

वयोवृद्धास्तपोवृद्धा ये च वृद्धा बहुश्रुताः ॥
ते सर्वे धनवृद्धस्य द्वारि तिष्ठंति किंकराः ॥ ३७८ ॥

" वयोवृद्ध, तपोवृद्ध आणि विद्यावृद्ध हे सर्व धनवृद्धाच्या द्वारीं दास होऊन राहतात."

तल्पे प्रभुरिव गुरुरिव मनसिजशास्त्रे श्रमे भुजिष्येव ॥
गेहे श्रीरिव गुरुजनपुरतो मूर्तेव सा व्रीडा ॥ ३७९ ॥

" शय्यास्थानीं ती मला प्रभूप्रमाणें होय, कामशास्त्रांत गुरूप्रमाणें, गृहकृत्यांत सेवकाप्रमाणें, घरांत लक्ष्मीप्रमाणें आणि वडीलमाणसांपुढें जणों मूर्तिमती लज्जाच !"

यस्य नास्ति विवेकस्तु केवलं यो बहुश्रुतः ॥
स न जानाति शास्त्रार्थान्दर्वी पाकरसानिव ॥ ३८० ॥

" ज्याला स्वतः विवेचनाचें सामर्थ्य नाहीं त्यानें जरी बहुत अध्ययन केलें तरी त्यास शास्त्रांतील गम्य असत नाहीं. ज्याप्रमाणें सैपाकांतल्या पळीला जातीनें तिखट मीठ गोड वगैरे कांहीं कळत नाहीं, तिचें काम नुसतें ढवळण्याचें !"

अर्थो नराणां पतिरंगनानां वर्षा नदीनामृतुराट् तरूणाम् ॥
स्वधर्मचारी नृपतिः प्रजानां गतं गतं यौवनमानयंति ॥३८१॥

" अर्थसंचय हा पुरुषांचें, पति स्त्रियांचें, वर्षर्तु नदींचें, ऋतूंचा राजा जो वसंत तो वृक्षांचें, स्वधर्मास अनुसरून वागणारा राजा प्रजांचें यौवन पुनः पुनः त्यांस आणितो."

गौरवं प्राप्यते दानान्न तु वित्तस्य संचयात् ॥
स्थितिरुच्चैः पयोदानां पयोधीनामधः स्थितिः ॥ ३८२ ॥

" गौरव जें प्राप्त होतें तें द्रव्याच्या दानानें होतें, संचयानें होत नाहीं. पहा कीं, मेघांची स्थिति आकाशांत आणि समुद्राची भूमीवर!"

वसु यच्छतु वा न वा नरेशो मम कर्णेऽपि च भारतीं करोतु ॥
रतिमिच्छतु वा न वा नवोढा यदि केलीगृहदेहलीमुपैतु ॥३८३॥

" राजा हा मला द्रव्य देवो किंवा न देवो, माझ्याशीं त्यानें कानगोष्ट मात्र करावी म्हणजे झालें; नूतन स्त्री ही रतेच्छा मनांत धरो अथवा न धरो, क्रीडामंदिराच्या उंबरठ्यावर तिनें पाऊल ठेवावें म्हणजे झालें !"

रे कूप जीवनागार यदि दातृत्वमिच्छसि ॥
तदा त्वं गुणवत्पात्रमेकं वा संनिधौ कुरु ॥ ३८४ ॥

" जीवनाचें (उदकाचें—जीविकेस साधन जें द्रव्य त्याचें) आगर असणाऱ्या हे कूपा ! तुला जर दातृत्वाची कीर्ति संपादन करण्याची असेल तर तूं आपल्या जवळ एक गुणवत् पात्र (दोरी लावलेलें भांडें—गुणवान् पुरुष) ठेव ! "

गलच्चक्षु मिलज्जानु प्रस्खलच्च पदे पदे ॥
मक्षिकालक्षसंयुक्तं भट्टतट्टु विराजते ॥ ३८५ ॥

कोणी भटजींच्या तट्टाचें वर्णन करतो:—" ज्याचे डोळे अर्धमुर्धे मिटलेले आहेत; गुडघे एकमेकाला लागलेले आहेत, जें पावलोंपावलीं अडखळतें आणि लाखों माशांनीं पीडलेलें, असें भट्टतट्टू विराजमान होतें ! "

कृत्वा विग्रहमश्रुपातकलुषं शय्यासनादुत्थिता
क्रोधार्ताऽपि विगृह्य गर्भभवनाद् द्वारं रुषा प्रस्थिता ॥
दृष्ट्वा चंद्रमसं प्रभाविरहितं प्रत्यूषवाताहता
हा रात्रिस्त्वरिता गतेति पतिता कांता प्रियस्योरसि ॥३८६॥

" नवऱ्याशीं भांडून व रडूनकढून फणकाऱ्यानें पलंगावरून उठली आणि तशीच रागानें महालाच्या दाराकडे जाऊं लागली; पण इतक्यांत प्रभाविरहित झालेला चंद्र तिच्या दृष्टीस पडला व पहांटचा गार वारा आंगाला लागला, तेव्हां खेद पावून पुनः माघारी आली आणि ' रात्र ही किती लवकर गेली ' असें म्हणून कांतास आलिंगिती झाली ! "

युगपत्स्वगंडचुंबनलोलौ पितरौ निरीक्ष्य हेरंबः ॥
तन्मुखमेलनकुतुकी स्वाननमपनीय परिहसन्पायात् ॥ ३८७ ॥

" शिव व पार्वती या दोघांस आपल्या चुंबनाविषयीं एकदम उत्सुक पाहून गणपतीनें काय केलें कीं आपलें तोंड एकदम मागें घेतलें, तेव्हां त्यांचींच मुखें परस्पर मिळालेलीं पाहून हंसणारा जो हेरंब तो तुमचें रक्षण करो ! "

मय्येव जीर्णतां यातु यत्त्वयोपकृतं कपे ॥
नरः प्रत्युपकारार्थे विपत्तिमभिवांछति ॥ ३८८ ॥

रामाची मारुतीप्रत उक्तिः—" हे कपे, तुझे जे मजवर उपकार आहेत ते माझेच ठायीं जिरून जावोत, ते फेडण्याची मी इच्छा करीत नाहीं; कां कीं प्रत्युपकार करावयाचा म्हटला म्हणजे दुसऱ्याच्या विपत्तीची आशा करावी लागते ! "

उडुराजमुखी मृगराजकटिर्गजराजविराजितमंदगतिः ॥
यदि सा वनिता हृदये निहिता क जपः क तपः क समाधिगतिः ३८९

" चंद्रासारखें जिचें वदन, सिंहाच्या सारखी कंबर आणि गजराजाप्रमाणें विराजमान अशी मंदगति, अशी वनिता जर हृदयस्थळीं प्राप्त झाली तर जप कोणीकडे, तप कोणीकडे आणि समाधि कोणीकडे ! "

सच्छिद्रो मध्यकुटिलः कर्णः स्वर्णस्य भाजनम् ॥
धिग्दैवं विमले नेत्रे पात्रं कज्जलभस्मनः ॥ ३९० ॥

" काय दैवाची कृति आहे पहा ! कीं जो कर्ण सच्छिद्र आणि मध्यें वांकडा त्याला सुवर्णभूषण मिळतें आणि विमल जीं नेत्रें तीं बिचारीं काजळाला पात्र झालीं आहेत ! " ' सच्छिद्र, ' ' कुटिल, ' आणि ' विमल ' यांचीं अर्थांतरें प्रसिद्धच आहेत.

विश्वेश्वरस्तु सुधिया गलितेऽपि भेदे भावेन भक्तिसहितेन समर्चनीयः ॥
प्राणेश्वरश्चतुरया मिलितेऽपि चित्ते चैलांचलव्यवहितेन निरीक्षणीयः९१

" जो सुधी आहे त्यास आत्मज्ञान होऊन जीवेश्वरांच्या मधील भेद त्याचा जरी गलित झाला, तरी त्यानें विश्वेश्वराची पूजा भावानें व भक्तीनें अवश्य करावी; कीं ज्याप्रमाणें चतुर स्त्री ही परस्परांचें मन मिळालें असतांही वस्त्राच्छादित होत्सातीच आपल्या वल्लभाच्या दृष्टीस पडते ! "

तव विरहमसहमाना सा तु प्राणान्विमुक्तवती ॥
किंतु तथाविधमंगं न सुलभमिति ते न मुंचंति ॥३९२॥

" तुझा विरह सहन करण्यास असमर्थ होत्साती ती तर प्राणांस टाक-

ण्यास तयार झाली, पण असलें सुंदर शरीर आपणास मिळायाचें नाहीं या लोभानें ते प्राणच तिला सोडीनात ? "

दोषागमनमाशंक्य रविरेष तिरोहितः ॥
कथमिंदुः समायाति कुतः शंका कलंकिनः ॥ ३९३ ॥

" दोषागमन (रात्रीचें येणें—दोषप्राप्ति) पुढें होणार तों अगोदरच सूर्य आपला क्षितिजाखालीं दडून राहेला. पण त्या समयास इंदूनें वर डोकें काढलें; ठीकच आहे, जो मुळींच कलंकयुक्त (दोन्हीं अर्थ स्पष्टच आहेत.) त्यास शंका कोठून प्राप्त होणार ! "

तप्तं कैर्न तपोभिः फलितं तद्गोपनारीणाम् ॥
लोचनयुगले यासामंजनमासीन्निरंजनं ब्रह्म ॥ ३९४ ॥

" आजपर्यंत तपश्चर्या कोणीं केल्या नाहींत ? पण एका गोपींचीं तपें मात्र फळाला आलीं असें म्हटलें पाहिजे; कां कीं त्यांच्या नेत्रयुगीं निरंजन जें परब्रह्म तें अंजन होऊन बसलें ! "

आश्लेषशेषा रतिरंगनानामामोदशेषा कुचकुंकुमश्रीः ॥
तूणीरशेषः कुसुमायुधोऽपि प्रभातशेषा रजनी बभूव ॥ ३९५ ॥

" स्त्रियांच्या रतांतील केवळ आलिंगन मात्र शेष राहिलें, कुचावर केलेल्या केशरलेपापैकीं केवळ सुगंध मात्र शेष राहिला, मदनापाशीं शेष काय तो भाता मात्र आणि रात्रीपैकीं पहाट मात्र उरली ! "

ललिता गलिता रदावली लवलीवद्धवली भवंति केशाः ॥
न तथाऽपि कथा रथांगपाणेः श्रवणप्रीतिकरीति मंदरीतिः ॥ ३९६ ॥

" सुंदर जी दंतपंक्ति ती गळून गेली व केंस हे लवलीप्रमाणें पांढरे होत आहेत; तथापि चक्रपाणि जो कृष्ण त्याची कथा कानांस आवडत नाहीं;—अशीच मूर्खांची रीति होय ! "

वागुच्चारोत्सवमात्रं तत्क्रियां कर्तुमक्षमाः ॥
कलौ वेदांतिनो भांति फाल्गुने बालका इव ॥ ३९७ ॥

" सांप्रत कलियुगांत वेदांत बोलणारे पंडित कसे भासतात ? कीं जशीं

शिमग्यांतली पोरें तोंडानें यथेच्छ बडबड मात्र करतात, पण त्यांतील मर्म म्हणून त्यांस बिलकुल माहीत नसतें ! "

तुंगासनास्तुंगतराः समर्था मनोरथान्पूरयितुं न नीचाः ॥
धाराधरा एव धराधराणां निदाघदाहं शमितुं न नद्यः ॥३९८॥

" उंच पदवीचे व स्वभावानें थोर असे लोक हेच लोकांचे मनोरथ पुरविण्यास समर्थ होतात; जे मुळींच नीच त्यांच्या हातून तें कार्य घडत नाहीं. पहा कीं पर्वतांचा संताप दूर करण्याचें सामर्थ्य मेघांचेच ठायीं असतें नद्यांचे ठायीं असत नाहीं. "

हरेः पदाहतिः श्लाघ्या न श्लाघ्यं खररोहणम् ॥
स्पर्धाऽपि विदुषा युक्ता न युक्ता मूर्खमित्रता ॥ ३९९ ॥

" सिंहाचा पादप्रहारही श्लाघ्य होय, गर्दभावर आरोहण केलेलेंही श्लाघ्य नव्हे; याप्रमाणेंच विद्वान् पुरुषाबरोबर स्पर्धाही श्रेयस्कर होय; परंतु मूर्खाबरोबर मैत्री कामाची नाहीं. "

निर्गुण इति मृत इति च द्वावेकार्थाभिधायिनौ विद्धि ॥
पश्य धनुर्गुणशून्यं निर्जीवं यदिह शंसन्ति ॥ ४०० ॥

" निर्गुण मनुष्य हे मेल्यासारखेच समजावयाचें; पहा, गुणरहित (श्लेषार्थ हा उघडच आहे) असें जें धनुष्य तें असून नसून सारखेंच. "

कर्कशतर्कविचारव्यग्रः किं वेत्ति काव्यहृदयानि ॥
ग्राम्य इव कृषिविलग्नश्चंचलनयनावचोरहस्यानि ॥ ४०१ ॥

" मनाला कठोरत्व देणारे जे तर्कविचार त्यांतच सदा जो गडलेला त्याला काव्याचें हृदय तें काय कळणार ? जसें, नांगर धरणाऱ्या कुणब्यास चतुर कामिनीच्या भाषणांतील मर्म काय समजणार ! "

अंतःप्रतप्तमरुसैकतदह्यमान-
मूलस्य चंपकतरोः क्व विकासचिंता ॥
प्रायो भवत्यनुचितस्थितिदेशभाजाम्
श्रेयः स्वजीवपरिपालनमात्रमेव ॥ ४०२ ॥

" अतिशय तापलेलें जें मारवाडांतील वाळवंट त्याची धग ज्याच्या

मुळाशीं निरंतर आहे अशा चंपकवृक्षाचा पुष्पविकास होईल ही आशा कशाला पाहिजे ? अयोग्यस्थानीं जे जाऊन पडले त्यांनीं आपला प्राण रक्षण करून ठेवला म्हणजे त्यांचें भाग्य समजावें ! "

तथाऽभूदस्माकं प्रथममविभक्ता तनुरियम्
ततोऽनु त्वं प्रेयानहमपि हताशा प्रियतमा ॥
इदानीं नाथस्त्वं वयमपि कलत्रं किमपरम्
मयाऽऽप्तं प्राणानां कुलिशकठिनानां फलमिदम् ॥ ४०३ ॥

" पूर्वी आपली अशी स्थिति होती कीं, दोघांचीं शरीरें जणूं काय एक होतीं; पुढें तूं माझा वल्लभ आणि मी दुर्भाग्या प्रियतमा इतकाच दोघांत भिन्नभाव झाला; आणि आतां तर तूं पति आणि मी स्त्री इतकाच संबंध राहिला आहे. तेव्हां वज्राप्रमाणें कठीण असे जे माझे प्राण त्यांचें हें फळ मला प्राप्त झालें आहे. "

निर्मित्सुः सुदतीमजो विरचिते वक्त्रे शशिभ्रांतितः
कोशीभूतनिजांबुजासनमधिष्ठातुं न शक्तो विधिः ॥
मध्यं विस्मृतवान्कुचौ च कठिनौ पीनौ नितंबौ कचा-
न्वक्रान्निर्मितवान्मतिः स्फुरति हि स्वस्थे नृणां चेतसि ॥४०४॥

"ब्रह्मदेव या स्त्रीस जेव्हां निर्माण करूं लागला तेव्हां त्यानें प्रथमतः हिचें मुख केलें; त्याच्या योगानें काय झालें कीं चंद्राची शंका वाटून त्याच्या आसनाचें कमल मिटूं लागेल;—तेव्हां आसनसंकोचामुळें पीडित होत्सात्या विधीनें राहिलेली सर्व रचना भराभर घाईनें आटपून टाकली. ती अशी कीं, स्तन आणि नितंब हे द्दोने तसेच जाडी ठेवले, केंस वांकडेच राहिले आणि कंबर करायास तर तो मुळींच विसरला ! एकंदरींत चित्त अस्वस्थ असलें म्हणजे कोणतेंही काम नीट होत नाहीं ! "

देव त्वत्कर-नीरदे दिशि दिशि प्रारब्धपुण्योन्नतौ
चंचत्कांचनरत्नराजितडिति स्वर्णामृतं वर्षति ॥
स्फीता कीर्तितरंगिणी समभवत्तृप्ता गुणिग्रामभूः
पूर्णं चार्थिसरः शशाम विदुषां दारिद्र्यदावानलः ॥ ४०५ ॥

" हे राजा ! तुझा हस्तरूप मेघ दशदिशांचे ठायीं उत्कृष्ट उन्नति पावला असतां आणि स्फुरण पावणारीं जीं रत्नजडित सुवर्णकंकणें त्यांची विद्युल्लतेसारखी प्रभा पडून सुवर्णरूप उदकाचा वर्षाव झाला असतां, कीर्तिरूप नदीस पूर येऊन ती चोहोंकडे पसरली आहे, गुणिजनरूप भूमि वृष्टीनें तृप्त झाली आहे, याचकसमूहरूप सरोवरें तुडंबलीं आणि विद्वज्जनांचा दारिद्र्यरूप दावानल विझून गेला आहे. "

यद्दुर्गामटवीमटंति विकटं क्रामंति देशांतरम्
गाहंते गहनं समुद्रमटनक्लेशं कृषिं कुर्वते ॥
सेवंते कृपणं पतिं गजघटासंघट्टदुःसंचरम्
सर्पंति प्रधनं धनांधितधियस्तल्लोभविस्फूर्जितम् ॥ ४०६ ॥

"दुर्गम अरण्यांतून जाणें, भयंकर परदेशांतून फिरणें, गहन जो समुद्र त्यावर पर्यटन करणें, शेतकीची दगदग करणें, कृपण धन्याची सेवा करणें, हत्तींच्या गर्दीमुळें संचार करण्यास भीतिदायक अशा रणांगणी मरण पावणें, इतके सर्व प्रकार धनलुब्ध लोक जे करतात हा लोभाचा प्रभाव होय ! "

व्यासादीन्कविपुंगवाननुचितैर्वाक्यैः सलीलं हस-
न्नुच्चैर्जल्प निमील्य लोचनयुगं श्लोकान्सगर्वं पठन् ॥
काव्यं धिक्कुरु यत्परैर्विरचितं स्पर्धस्व सार्धं बुधै-
र्यद्यभ्यर्थयसे श्रुतेन रहितः पांडित्यमाप्तुं बलात् ॥ ४०७ ॥

" जर तुला अंगीं विद्वत्ता नसतांही फुकाची पंडितगिरी मिळवायाची असेल तर पुढील गोष्टी कर:—व्यासादिक महान् महान् कवींविषयीं हवातसा चारगटपणा करून त्यांची थट्टा कर. मोठ्यानें बोल आणि डोळे मिटून मोठ्या डौलानें श्लोक म्हण, दुसऱ्यानें केलेल्या काव्याची निंदा कर आणि पंडितजनांशी नेहमी स्पर्धा करीत जा ! "

मूर्खत्वं सुलभं भजस्व कुमते मूर्खस्य चाष्टौ गुणा
निश्चिंतो बहुभोजकोऽतिमुखरो रात्रिंदिवं स्वप्नभाक् ॥
कार्याकार्यविचारणांधबधिरो मानापमाने समः
प्रायेणामयवर्जितो दृढवपुर्मूर्खः सुखं जीवति ॥ ४०८ ॥

" रे वेड्या ! मूर्खत्व संपादन करण्यास कांहीं आयास पडत नाहींत, व त्यापासून पुढील आठ लाभही आहेत तर हेंच आपल्या ठायीं दृढ ठेव. आठ गुण येणेंप्रमाणें:—निश्चिंतपणा, यथेष्ट भोजन, अति मुखरत्व, रात्रंदिवस झोंप, कार्याकार्यविचाराविषयी अंधत्व व बधिरत्व, मान व अपमान हे दोन्ही सारखे, प्राय: शरीरास आरोग्य असून गलेलठ्ठ होऊन पडणें,—इत्यादि प्रकारें मूर्ख हा सुखेंकरून राहतो ! "

अनाकाशे चंद्रः सरसिजदलद्वंद्वसहितो
गृहीतः पश्चार्धे कुटिलकुटिलैः सोऽपि तिमिरैः ॥
सुधां मुंचत्युच्चैरनिशमथ संमोहजननीम्
किमुत्पातालीयं वदत जगतः कर्तुरुदिता ॥ ४०९ ॥

" ब्रह्मदेवानें ही उत्पातपरंपरा निर्माण केली आहे काय ? कोणती ? तर आकाशाशिवाय चंद्र, त्यावर कमलपत्रांची जोडी, मागें कुटिल अंधकारसमूहानें तो बद्ध केलेला आणि असा चंद्र नेहमी अमृताचा वर्षाव करणारा, कीं ज्या अमृतवृष्टीनें उज्जीवन जें व्हावयाचें तें न होतां उलटें संमोहन होतें (पक्षी–मूर्छा येते)! "

पुष्पेषोरभिषेकहेमकलशौ हारप्रभावाहिनी–
चक्राह्वौ मदनोन्मदद्विपपतेः कुंभौ रतेः कंदुकौ ॥
कंदौ बाहुमृणालिकायुगुलयोर्लीलालतासत्फले
नव्यौ रत्नसमुद्रकौ वहति सा लावण्यपूर्णौ स्तनौ ॥ ४१० ॥

स्तनयुगुलावर उत्प्रेक्षा—" मदनास सार्वभौमाभिषेक करण्याचे हे सुवर्णकलश आहेत काय ? अथवा मुक्ताहारप्रवाहरूप नदींतील हे चक्रवाक आहेत काय ? किंवा मदनरूप मदोन्मत्त हत्तीचें गंडस्थल, रतीचे क्रीडाकंदुक, बाहुरूप कमलनालाचे कांदे, लीलारूपलतेचीं दोन उत्कृष्ट फळें, किंवा लावण्यानें भरलेले हे नवे रत्नकरंडक आहेत काय ? "

तन्वंग्या गुरुसंनिधौ नयनजं यद्वारि संस्तंभितम्
तेनांतर्गलितेन मन्मथशिखी सिक्तो वियोगोद्भवः ॥

मन्ये तस्य निरस्यमानकिरणस्यैषा मुखेनोद्गता
श्वासायाससमागतालिसरणिव्याजेन धूमावली ॥ ४११ ॥

" स्त्रियेनें गुरुजनांच्या समोर डोळ्यांतील अश्रु जे तसेच संस्तब्ध करून ठेवले ते आंतल्या आंत जिरल्यामुळें वियोगजन्य जो मदनाग्नि त्यावर ते पडले त्या योगानें तो किंचित् विझून त्याची जी धूमावली निर्माण झाली ती निश्वास सुगंधास लुब्ध झालेल्या भ्रमरमालेच्या रूपानें जणों काय बाहेर पडली!"

तरुमूलादिषु निहितं जलमाविर्भवति पल्लवाग्रेषु ॥
निभृतं यदुपक्रियते तदपि महांतो वहंत्युच्चैः ॥४१२॥

" वृक्षांच्या मूळांशीं जें उदक घालावें तें त्यांच्या पल्लवाग्रांवर प्रगट होतें; ठीकच आहे कीं जे थोर आहेत ते गुप्तपणें केलेल्या उपकारासही प्रसिद्ध-पणें मिरवतात ! "

हृदयं कौस्तुभोद्भासि हरेः पुष्णातु वः श्रियम् ॥
राधाप्रवेशरोधाय दत्तमुद्रमिव श्रिया ॥ ४१३ ॥

" कौस्तुभानें शोभा पावणारें असें विष्णूचें हृदय तुमचें कल्याण करो; कीं ज्याचे ठायीं वरील रत्नाच्या मिषानें लक्ष्मीनें जणों काय मोहरच करून ठेवली आहे, कीं राधेनें आंत प्रवेश करूं नये म्हणून ! "

पिनाकफणिबालेंदुभस्ममंदाकिनीयुता ॥
तथाऽपि भव ते मूर्तिरपवर्गप्रदायिनी ॥ ४१४ ॥

" हे शंभो ! तुझी मूर्ति पिनाक (धनुष्य), फणी (सर्प), बालेंदु (बालचंद्र), भस्म आणि मंदाकिनी (स्वर्गंगा) यांनीं युक्त असतांही अपवर्गातें म्ह० मोक्षातें देणारी आहे. " पिनाक, फणी, बालेंदु, भस्म आणि मंदाकिनी या शब्दांची आद्याक्षरें अनुक्रमानें पवर्गांतील आहेत हें उघडच आहे.

द्रुतं यस्याऽऽलोकाद्विरहिजनशोकापनयनम्
यदंके सानंदं नयनमरविंदं विहरति ॥
नयस्यापैति श्रीः कचनिचयराहोरपि पुनः
स मे खेदं रामावदनहिमधामा शमयतु ॥ ४१५ ॥

स्त्रीमुख व चंद्र यांचें व्यतिरेकानें वर्णनः—" ज्याच्या आलोकानें (अव

लोकनानें, प्रकाशानें) विरहिजनांच्या शोकाचें हरण तेव्हांच होतें, ज्याच्या-पाशीं नयनरूप कमल आनंदानें विहार करतें आणि कचकलापरूप जो राहु त्याच्या योगानेंही ज्याचें तेज कमी होत नाहीं, तो स्त्रीमुखरूप चंद्रमा माझ्य संतापास दूर करो ! " विरहिजनांचा ताप खऱ्या चंद्राच्या योगानें वाढतो, कमलें संकुचित होतात व राहुग्रासाची त्यास भीति असते, या तीन गोष्टी प्रसिद्धच आहेत.

मौलौ किंनु महेश मानिनि जलं किं वक्त्रमंभोरुहम्
किं नीलालकवेणिका मधुकरी किं भ्रूलता वीचिका ॥
किं नेत्रे शफरी किमु स्तनयुगं प्रेंखद्रथांगद्वयम्
साशंकामिति वंचयन्गिरिसुतां गंगाधरः पातु नः ॥ ४१६ ॥

शिवानें गंगेस मस्तकीं धारण केली असतां त्याचा व पार्वतीचा संवादः—

" हे महेशा ! हें मस्तकावर काय ?—हे मानिनि ! हें जल आहे; तोंड दिसतें आहे तें ?—तें कमल आहे; नील केशपाश दिसतो आहे हा ?—तो मधुकरींचा समूह आहे; भ्रूलता दिसते आहे ?—तो तरंग आहे; डोळे ?—ते दोन मासे आहेत; स्तनयुग ?—तें जलविहार करणारें चक्रवाकांचें जोडपें आहे;—याप्रमाणें साशंक झालेली जी पार्वती तिचें वंचन करणारा गंगाधर आमचें रक्षण करो ! "

धन्यास्ते कवयो यदीयरसनारूक्षाध्वसंचारिणी
धावंतीव सरस्वती द्रुतपदन्यासेन निष्क्रामति ॥
अस्माकं रसपिच्छिले पथि गिरां देवी नवीनोदय-
त्पीनोत्तुंगपयोधरेव युवतिर्मांथर्यमालंबते ॥ ४१७ ॥

" ते कवि धन्य होत, कीं ज्यांच्या जिव्हारूप कोरड्या ठणठणीत रस्त्यावरून सरस्वती ही भराभर पावलें टाकीत धांवतच निघून जात असते, पण आमची स्थिति अशी आहे कीं, जिचे पीनोत्तुंग पयोधर नवे उद्भेद पावले आहेत अशी युवति निसरड्या जागेवरून जात असतां जशी जपून हळुहळू चालते त्याप्रमाणें आमची वाग्देवी रसानें परिप्लुत अशा मार्गावरून मंद मंद पदांनीं गमन करते ! " ' रस ' आणि ' पद ' या शब्दांचे दोन दोन अर्थ सुगमच आहेत.

समये पयोधराणामपतितया नैव शक्यते स्थातुम् ॥
उत्कंठिताऽसि बाले नहि नहि सखि पिच्छिलः पंथाः ॥४१८॥

" या पयोधरकालीं (वर्षासमयीं) अपतिता मोठी दुःसह होय, म्हणजे पतिसमागमाशिवाय दिवस कंठणें मोठें कठिण आहे. ही कोणा एका तरुणीची उक्ति ऐकून तिची सखी तीस विचारते, ' अगे उत्कंठित झाली आहेस काय ? ' बाला उत्तर करते, " छे छे ! चोहोंकडे चिखल झालेला म्हणून अपतितावस्था म्हणजे पडल्याशिवाय राहणें कठिण आहे असें मी म्हणतें ! " हें छेकापन्हुतीचें उदाहरण होय.

भीतिर्नैव भुजंगपुंगवविषात्प्रीतिर्न चंद्रामृता–
न्नाशौचं नृकपालकंठलुलनाच्छौचं न गंगाजलात् ॥
नोद्वेगश्चितिभस्मनो न च सुखं गौरीस्तनालिंगना–
दात्मारामतया हिताहितसमः स्वस्थो हरः पातु वः ॥ ४१९ ॥

" ज्याला गळ्यांतील महासर्पाच्या विषापासून भीति नाहीं व शिरस्थ चंद्राच्या अमृतापासून आनंद नाहीं; गळ्यांत नरकपालांची माला रुळत असल्यानें ज्याला अपवित्रता नाही व जटाजूटस्थ गंगेच्या जलापासून पावित्र्य नाहीं; ज्याला चिताभस्म अंगास फांसल्यापासून उद्वेग नाहीं व गौरीच्या स्तनालिंगनापासून सुख नाहीं;–असा इष्टानिष्टाविषयीं उदासीन व आत्मस्थितीस पावल्यामुळें सदोदित स्वास्थ्य अनुभवणारा शिव तुमचें कल्याण करो ! "

नायं प्रयाति विकृतिं विरसो न यः स्या–
न्न क्षीयते बहुजनैर्नितरां निपीतः ॥
जाड्यं निहंति रुचिमेति करोति तृप्तिम्
नूनं सुभाषितरसोऽन्यरसातिशायी ॥ ४२० ॥

" सुभाषितरसाची दुसऱ्या कोणत्याही रसास सर येणार नाहीं; पहा कीं, इतरांप्रमाणें हा कधींही विकार पावत नाहीं, विरस होत नाहीं, बहुतांनीं सेवन केला असतांही कमी होत नसून जाड्याचें (मूर्खत्वाचें) हरण करतो, रुचीची वृद्धि करतो आणि आनंददायक होतो ! "

दुर्जनहुताशदग्धं काव्यसुवर्णं विशुद्धिमुपयाति ॥
दर्शयितव्यं तस्मान्मत्सरिमनसः प्रयत्नेन ॥ ४२१ ॥

" काव्यरूप सुवर्ण दुर्जनरूप अग्नींत दग्ध झालें असतां अत्यंत शुद्ध होतें; यास्तव मत्सरी मनाच्या मनुष्यांस तें आदरून दाखवावें ! "

त एव पदविन्यासास्त एवार्थविभूतयः ॥
तथाऽपि नव्यं भवति काव्यं ग्रथनकौशलात् ॥ ४२२ ॥

" तीच शब्दांची योजना व अर्थाचें गौरव, तथापि पदरचनेच्या चातुर्यानें काव्य नवेसें भासूं लागतें ! "

इह तुरगशतैः प्रयांतु मूर्खा धनरहिता विबुधाः प्रयांतु पद्भ्याम् ॥
गिरिशिखरगताऽपि काकपंक्तिः पुलिनगतैर्न समत्वमेति हंसैः ॥४२३॥

" मूर्ख हे शंभर घोड्यांवर बसून फिरोत व पंडित निर्धन होत्साते पायांनींच चालोत; तरी पंडित जे श्रेष्ठ ते श्रेष्ठच; पहा कीं, पर्वतशिखरावर बसलेली काकपंक्ति ही नदीच्या वाळवंटावर फिरणाऱ्या हंसांची बरोबरी करूं शकत नाहीं ! "

कतिचिदुद्धतनिर्भरमत्सराः कतिचिदात्मवचस्तुतिशालिनः ॥
अहह केऽपि निरक्षरकुक्षयस्तदिह संप्रति कं प्रति मे श्रमः॥४२४॥

" कोणी पाहावें तर त्यांच्या ठायीं मत्सर परिपूर्ण नांदत असून वरचेवर उचंबळत असतो; कोणी पाहावे, त्यांस आपल्या स्वतःच्या कवितेखेरीज इतर कोणाचीही पसंत नसून तिची कायती नेहमीं प्रशंसा; बाकी पुष्कळ तर बिचारे अक्षरशत्रुच; तेव्हां काव्य जें करावयाचें तें कोणासाठीं म्हणून करावें ? "

स्थिरा शैली गुणवतां खलबुद्ध्या न बाध्यते ॥
रत्नदीपस्य हि शिखा वात्ययाऽपि न नाश्यते ॥ ४२५ ॥

" जे स्वभावतःच सज्जन त्यांचें शील खलांच्या उपदेशानें बिघडत नाहीं; कसें ? तर ज्याप्रमाणें रत्नदीपाची ज्योत वावटळीच्याही वाऱ्यानें विझत नाहीं ! "

केनांजितानि नयनानि मृगांगनानाम्
को वा करोति रुचिरांगरुहान्मयूरान् ॥

कश्चोत्पलेषु दलसंनिचयं करोति
को वा करोति विनयं कुलजेषु पुंसु ॥ ४२६ ॥

" हरणीच्या डोळ्यांत कोणीं अंजन घातलें आहे ? मोरांचे पिसारे चित्र-विचित्र कोणीं केले आहेत ? नीलकमलांस पत्रशोभा कोणीं दिली ? कुलज जे पुरुष त्यांच्या ठायीं विनय कोणीं आणला ? "

मा भूत्सज्जनयोगो यदि योगो मा पुनः स्नेहः ॥
स्नेहो यदि विरहो मा यदि विरहो जीविताशा का ॥ ४२७ ॥

" प्रथमतः सज्जनांची गांठच पडूं नये, पडली तर स्नेह जडूं नये, तोही जडलाच तर विरह तरी होऊं नये, कां कीं विरह झाल्यावर मग जीविताची आशा कशाला हावी ? "

अनुकुरुतः खलसुजनावग्रिमपाश्चात्ययोः सूच्याः ॥
विदधाति रंध्रमेको मुद्रणमस्यापरोऽपि विदधाति ॥ ४२८ ॥

" खल आणि सज्जन हे सुईच्या पुढल्या व मागल्या भागांप्रमाणें होत; रंध्र पाडणें हें पहिल्याचें काम व त्याचें आच्छादन करणें हें दुसऱ्याचें ! "

यदमी दशंति दशना रसना तत्स्वादुसौख्यमनुभवति ॥
प्रकृतिरियं विमलानां क्लिश्यंति यदन्यकार्येषु ॥ ४२९ ॥

" हे दांत जें चावतात त्याचें मधुर सौख्य जिव्हा अनुभवते; निर्मल अंतःकरणाचे जे सज्जन त्यांचा स्वभावच हा, कीं दुसऱ्याच्या कल्याणाकरितां कष्ट सोसावे ! "

लक्ष्मीर्यादोनिधेर्यादो नादो वादोचितं वचः ॥
बिभेति या धीवरेभ्यो जडेष्वेव निमज्जति ॥ ४३० ॥

" लक्ष्मी ही समुद्रांतील जलचर आहे हें वचन वादास्पद नव्हे; कां कीं, धीवरांस (पक्षीं, बुद्धिमान् पुरुषांस) भिते व जडांचे ठायीं निमज्जन पावते ! " म्हणजे बुद्धिमंतास प्राप्त होत नाहीं व जड म्हणजे मूर्ख यांजपाशीं वास करते. ' ड ' आणि ' ल ' यांच्या साम्यास्तव ' जलांत बुडून राहते ' हा श्लेषार्थ उघडच आहे.

एकेन तिष्ठताऽधस्तादन्येनोपरि तिष्ठता ॥
दातृयाचकयोर्भेदः कराभ्यामेव सूचितः ॥ ४३१ ॥

" दाता आणि याचक यांजमधील भेद पालथा आणि उलथा हात एवढ्यानेंच सूचित होतो ! "

लक्ष्मीपयोधरोत्संगकुंकुमारुणितो हरेः ॥
धन्यो बलिः स येनास्य भिक्षापात्रीकृतः करः॥४३२॥

" बलीची धन्यता काय वर्णावी ? कीं ज्यानें लक्ष्मी कुचाभोगकुंकुमानें रंगलेला जो हरीचा हस्त त्यास दानग्रहणार्थ भिक्षापात्र करविला ! "

दुर्जनसहवासादपि शीलोत्कर्षं न सज्जनस्त्यजति ॥
प्रतिपर्व तपनवासी निःसृतमात्रः शशी शीतः ॥ ४३३ ॥

" दुर्जनांचा सहवास घडला असतांही साधु आपलें शील टाकीत नाहींत; पहा कीं, प्रति अमावास्येला चंद्राला सूर्याचा सहवास घडतो, पण त्याजपासून निघाला कीं पुरे लागलीच आपलें शीतलत्व प्रगट करतो ! "

विगृहीतः पदाक्रांतो भूयो भूयश्च खंडितः ॥
माधुर्यमेवावहति सुश्लोक इव सज्जनः ॥ ४३४ ॥

" उत्कृष्ट श्लोकाचा जरी विग्रह केला, पदें पाडलीं, किंवा पुनः पुनः निरनिराळा अन्वय लावला तरी त्याचें सौंदर्य कमी होत नाहीं, त्याप्रमाणेंच सज्जनाशीं विग्रह (कलह) केला, त्यास पदाक्रांत केला (म्ह० त्याची अवज्ञा केली) किंवा त्याची वारंवार खंडना केली, तरी त्याचें नैसर्गिक शील ढळत नाहीं ! "

अपूर्वः कोऽपि कोपाग्निः सज्जनस्येतरस्य च ॥
एकस्य शाम्यति स्नेहाद्वर्धतेऽन्यस्य वारितः ॥ ४३५ ॥

" सज्जन व दुर्जन यांचा कोपाग्नि किती विलक्षण तऱ्हेचा आहे पहा ! कीं एक स्नेहाच्या योगानें शमला जातो व दुसरा वारला असतां वृद्धि पावतो ! " ' स्नेह ' शब्दाचा दुसरा अर्थ ' तेल ' हा होय; व ' वारित ' याचा अर्थ ' पाण्यापासून ' असा होतो. तेलानें विस्तव विझणें व पाण्यानें वाढणें हें विलक्षण आहे हें उघडच आहे.

जलनिधौ जननं धवलं वपुर्मुरारिपोरपि पाणितले स्थितिः ॥
इति समस्तगुणान्वित शंख भोः कुटिलता हृदये न निवारिता॥४३६॥

" हे शंखा ! तुझें जन्म समुद्रांत झालें, तुझें शरीर पांढरें शुभ्र आहे, मुरारीच्या हस्तनलीं तुला सदोदित वास घडतो, याप्रमाणें समस्त गुणांनीं तूं युक्त असतां तुझ्या हृदयाच्या ठायींची कुटिलता कांहीं निघाली नाहीं ! " शंखाचें अभ्यंतर वक्र असतें हें प्रसिद्धच आहे.

यत्राऽऽत्मीयो जनो नास्ति भेदस्तत्र न विद्यते ॥
कुठारैर्दंडनिर्मुक्तैर्भिद्यंते तरवः कथम् ॥ ४३७ ॥

" जेथें घरचा भेद्या मिळाला नाहीं तेथें फूट पडत नाहीं; जर कुऱ्हाडीचे दांडे काढून घेतले तर झाडें कशीं तुटलीं जातील ? "—' कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ ' ही म्हण प्रसिद्धच आहे.

द्यूतेन धनमिच्छंति मानमिच्छंति सेवया ॥
भिक्षया भोगमिच्छंति ते दैवेन विडंबिताः ॥ ४३८ ॥

" द्यूत खेळून जे धनप्राप्तीची इच्छा करतात, सेवा करून मानाची अपेक्षा करतात, आणि भिक्षावृत्तीचें अवलंबन करून भोगाची आशा करतात, ते हतभाग्य होत ! "

अयश्चणकचर्वणं फणिफणामणेः कर्षणम्
करेण करितोलनं जलनिधेः पदा लंघनम् ॥
प्रसुप्तहरिबोधनं निशितखड्गसंरोपणम्
कदाचिदपि संभवेन्न कृपणस्य वित्तार्जनम् ॥४३९ ॥

" लोखंडाचे हरभरे दातांनीं फोडणें, सर्पाच्या फणेवरील मणी हिसकावून घेणें, हातांत हत्ती तोलून धरणें, समुद्र पायांनीं उतरून जाणें, निजलेल्या सिंहास डवचून जागें करणें, तीक्ष्ण तरवारीवर बसणें;—हीं सर्व संभवतील; पण कृपणाच्या वित्ताचें हरण करणें हें कधीं घडणार नाहीं ! "

तैलाद्रक्षेज्जलाद्रक्षेद्रक्षेच्छिथिलबंधनात् ॥
मूर्खहस्ते न दातव्यमेवं वदति पुस्तकम् ॥ ४४० ॥

" पुस्तक म्हणतें, माझें तेलापासून, पाण्यापासून व शिथिलबंधनापासून रक्षण कर; आणि मला मूर्खाच्या हातीं देऊं नकोस. "

व्याधेस्तत्त्वपरिज्ञानं वेदनायाश्च निग्रहः ॥
एतद्वैद्यस्य वैद्यत्वं न वैद्यः प्रभुरायुषः ॥ ४४० ॥

" वैद्याची वैद्यगिरी म्हणजे इतकीच, कीं व्याधींचें निदान त्यानें ठरवावें, वेदना बंद करावी; वैद्य कांहीं आयुष्याचा धनी नाहीं. "

पल्लवे नास्ति माधुर्यं सुधायां नास्ति शोणिमा ॥
विद्रुमे नास्ति मृदुता तत्रयं दयिताधरे ॥ ४४१ ॥

" पल्लवाच्या ठिकाणीं माधुर्य नसतें, अमृताचे ठायीं लालपणा नसतो, आणि पोंवळ्याच्या अंगीं मार्दव नाहीं, पण हे तिन्ही गुण प्रियेच्या अधरोष्ठाचे ठायीं वास करतात ! "

लोभमूलानि पापानि व्याधयो रसमूलकाः ॥
स्नेहमूलानि दुःखानि त्रयं त्यक्त्वा सुखी भवेत् ॥ ४४२ ॥

" सर्व पापांचें मूळ लोभ हा होय, व्याधींचें मूळ षड्रस होत, दुःखांचें मूळ ऐहिक वस्तूवर धरलेली ममत्वबुद्धि होय, यास्तव हीं तिन्ही सोडून देणें हा सुखाचा मार्ग होय ! "

मार्जारो लभते न पंजरशुकालापेन कौतूहलम्
कस्तूरीहरिणस्य सौरभतया व्याघ्रो न संतुष्यति ॥
प्रीतिर्नास्ति मयूरतांडवविधौ व्याधस्य दुष्टात्मभि-
र्व्याप्तायां भुवि संति केऽपि विरलाः संतो गुणग्राहकाः ॥४४३॥

" मांजरास पिंजऱ्यांतील राघूच्या बोलण्याचें कौतुक वाटत नाहीं, वाघास कस्तूरीमृगाच्या सुगंधानें संतोष होत नाहीं, पारध्यास मोराचा नाच पाहून आनंद होत नाहीं. सारांश, दुष्टांनीं भरलेली जी पृथ्वी हिचे ठायीं कोणी विरळ गुणग्राहक आहेत ते आहेत ! "

परस्परासंगसुखान्नतभ्रुवः पयोधरौ पीनतरौ बभूवतुः ॥
तयोरमृष्यन्नयमुन्नतिं परामवोन्नि मध्यस्तनिमानमेति ॥४४४॥

" परस्पर समागमाच्या सुखानें स्त्रीचें वक्षोज पुष्टतर झालें, पण त्याची उन्नति न साहून मध्य (कटिप्रदेश) हा मत्सरानें झुरून कृश झाला असें मला वाटतें ! "

पात्रे त्यागी गुणे रागी विरागी विषयेष्वति ॥
शास्त्रे बोद्धा रणे योद्धा पुरुषः पंचलक्षणः ॥ ४४५ ॥

" पात्राचे ठायीं दान करणारा, गुणिजनांचे ठिकाणीं आदरबुद्धि धरणारा, विषयाविषयीं पराङ्मुख असणारा, शास्त्रांत निष्णात आणि रणांत शौर्य प्रगट करणारा,—हीं पांच महापुरुषाचीं लक्षणें होत. "

एकेन राजहंसेन या शोभा सरसो भवेत् ॥
न सा बकसहस्रेण परितस्तीरवासिना ॥ ४४६ ॥

" एका राजहंसानें जी सरोवरास शोभा येईल ती साऱ्या तीरासभोंवतीं जमलेल्या हजार बगळ्यांनीं येणार नाहीं. "

यथा खरश्चंदनभारवाही भारस्य वेत्ता नतु चंदनस्य ॥
तथा हि विप्रः श्रुतिशास्त्रपूर्णो ज्ञानेन हीनः पशुभिः समानः ॥४४७॥

" जसा गर्दभ हा चंदनाचें ओझें वाहणारा असला तरी त्याला ओझ्याचें मात्र ज्ञान, चंदनाचें नाहीं; त्याप्रमाणेंच वेद व शास्त्र यांत पारंगत असूनही जो ब्राह्मण ज्ञानशून्य तो पशुतुल्य समजावा. "

तरुणि संहर संहर लोचने तृणलवेषु कुठारपरिग्रहः ॥
मयि मनोभवमार्गणपीडिते न हि सतामुचितं मृतमारणम् ४४८

" हे तरुणि ! आपला कटाक्ष आटोप आटोप; अगे ! तृणलवावर कोणी कुठाराचा प्रयोग करतो काय ? मदनाच्या बाणानें पीडित जो मी त्या मजवर हा दुसरा प्रहार कशास पाहिजे ? सज्जन जे आहेत ते मेलेल्यावर घाव घालीत नसतात ! "

चतुरः सखि मे भर्ता यल्लिखति स तत्परो न वाचयति ॥
तस्मादप्यधिको मे स्वयमपि लिखितं स्वयं न वाचयति ४४९

" माझ्या पतीचें चातुर्य काय सांगूं ? तो जें लिहितो तें दुसऱ्यास वाचतां

येत नाहीं." हें पहिलीचें वर्णन ऐकून दुसरी उत्तर करते, "आमचे यजमान तर याहूनही शहाणे आहेत. स्वतः लिहिलेलेंच त्यांस वाचतां येत नाहीं !"

प्रभुर्विवेकी प्रमदा सुशीला तुरंगमः शस्त्रनिपातधीरः ॥
विद्वान्विरागी धनिकः प्रदाता भूमंडलस्याऽऽभरणानि पंच॥४५०॥

" विवेकी राजा, सुशील कांता, शस्त्राचा घाव सोसण्यास खंबीर असा घोडा, वैराग्यशील विद्वान् आणि दानशूर धनिक,—हीं पांच भूमंडलाचीं भूषणें होत !"

पत्राणि जीर्णानि फलं विनष्टं छाया गता पक्षिकुलैः प्रयातम् ॥
वसंत जानीहि तवाऽऽशयाऽसौ समुन्नतिं नैव जहाति वृक्षः ॥४५१॥

" पानें वाळून गेलीं, फळें गळालीं, छाया नाहींशी झाली, पक्ष्यांचे समुदाय आश्रय करिनातसे झाले,—पण इतक्याही उपर ज्यापेक्षां हा वृक्ष आपली उन्नति (उंची—पक्षीं, थोर स्वभाव) टाकीत नाहीं त्या अर्थीं हे वसंता ! हा तुझ्या आशेवर गुंतून राहिला आहे असें समज !"

करिवर संचर धीरं मा मर्दय मर्मराणि पत्राणि ॥
अस्मिन्गह्वरकुहरे धूतसटः केसरी वसति ॥ ४५२ ॥

" हे हस्तिश्रेष्ठा ! हळुहळू चाल, झाडांचा पाला तुडवून वाजवूं नकोस; कां कीं या दरीच्या आंत आयाळ झाडून गर्जना करणारा सिंह वसत आहे!"

पुष्पादनंतरं स्यात्फलं लतायां प्रसिद्धमिति लोके ॥
चित्रं कनकलतेयं पुष्पोद्गमतः फलद्वयं पूर्वम् ॥ ४५३ ॥

" वृक्ष सृष्टींत पाहिलें असतां प्रथम फुलें येऊन नंतर फळें धरतात असा क्रम आढळतो; पण ह्या सुवर्णवेलीच्या ठायीं हा काय चमत्कार दृष्टीस पडतो पहा, कीं पुष्पोद्गमाच्या पूर्वींच फलद्वयाचा संभव !"

अहमिहैव वसन्नपि तावकस्त्वमपि तत्र वसन्नपि मामकः ॥
हृदयसंगम एव सुसंगमो न तनुसंगम एव सुसंगमः ॥ ४५४ ॥

" मी येथें असूनही तुझा आहें व तूं तेथें असूनही माझा आहेस; तस्मात् हृदयसंगम हाच खरा संगम, येरवीं शारीर समागम हा कांहीं वास्तविक संगम नव्हे !"

गुरुजननयने पिधेहि निद्रे त्वरितमिहास्तमुपैहि पद्मबंधो ॥
इति वदति मनोभवाभितप्ता चिरसमयागतवल्लभा मृगाक्षी॥४५५॥

" हे निद्रे ! गुरुजनांचे नेत्र निमीलन कर; हे पद्मबंधो सूर्या ! तूं लवकर अस्तास जा; याप्रमाणें मदनानें विव्हल झालेली स्त्री, कीं तिचा वल्लभ फारां दिवसांनीं घरीं आला,—ती वदती झाली ! "

परिमितविशिखो न चेन्मनोजो यदि च हरो न हरेत्तदीयमंगम् ॥
यदि मृदुकुसुमेषुरेष न स्यादवनितले न किमाचरेत्तदानीम्॥४५६॥

" हा मदन जर परिमितशर (पंचशर) नसता, शिवानें त्यास अनंग केला नसता, आणि कोमल पुष्पेंही त्याचे बाण नसते, तर त्यानें पृथ्वी-तलावर काय काय अनर्थ करून दिले असते ! "

चंद्र स्वरं विहर गगने प्रेयसी नम्रवक्त्रा
नीलांभोज त्वमपि विकसोन्मीलिताक्षी मृगाक्षी ॥
उक्तिं मुक्तां कुरु पिक निजां मानिनी मौनिनीयम्
युष्मद्भाग्यैः फलितमधुना यद्गृहीतोऽभिमानः ॥ ४५७ ॥

" हे चंद्रा ! प्रियेनें रागानें तोंड खालीं केलें आहे, तेव्हां आतां तूं खुशाल गगनांत विहार कर. हे नीलकमला ! तिनें आपले डोळे मिटले आहेत, यास्तव हा तुझा विकास पावण्याचा काल आहे. हे कोकिला ! मानिनीनें मौन अंगीकारलें आहे, यास्तव तूं आपली वाणी प्रगट कर. तुमचीं भाग्यें हल्लीं फळास आलीं आहेत, कां कीं प्रियेनें मान धारण केला आहे ! "

किं केकीव शिखंडमंडिततनुः किं कीरवत्पाठकः
किंवा हंस इवांगनागतिगुरुः शारीव किं सुस्वरः ॥
किंवा हंत शकुंतराजपिकवत्कर्णामृतं सिंचते
काकः केन गुणेन कांचनमये व्यापारितः पंजरे ॥४५८॥

" या कावळ्यास सोन्याच्या पिंजऱ्यांत जो ठेविला आहे तो काय समजून ?—यास काय मोराप्रमाणें शोभिवंत पिसारा आहे ? कां राघूसारखी मनुष्यवाणी आहे ? कां हंसाप्रमाणें स्त्रियांस उपदेशक अशी यास गति आहे ? कां साळुंकीसारखा सुस्वर आहे ? कां पक्ष्यांचा नायक जो कोकिल त्याच्या-

सारखी कर्णमधुरवाणी आहे ? याच्या अंगीं येवढा गुण तरी पाहणारानें काय पाहिला ?"

मुंचद्धारं चिकुरनिकरं बिभ्रती पाणिगर्भे
गात्राश्लिष्टस्तिमितवसनस्पष्टसर्वांगशोभा ॥
स्नानोत्तीर्णा कमलनयना तिर्यगावर्तितास्या
नो वा कस्यासमशरसमाक्रांतमंतः करोति ॥ ४५९ ॥

"मोकळे सुटलेले केश हाताच्या पोकळींत जिनें धरले आहेत, जिचें वस्त्र अंगाबरोबर लगटून गेल्यामुळें जिच्या सर्व अवयवांची शोभा स्पष्ट दिसत आहे व जिनें आपलें तोंड तिरकस फिरविलें आहे, अशी स्नान करून बाहेर आलेली तरुणी पाहून कोणाचें अंतःकरण मदनाक्रांत होत नाहीं !"

अभिलषसि यदींदो ! वक्त्रलक्ष्मीं मृगाक्ष्याः
पुनरपि सकृदब्धौ मज्ज संक्षालयांकम् ॥
सुविमलमथ बिंबं पारिजातप्रसूनैः
सुरभय यदि नो चेत्त्वं क्व तस्या मुखं क्व ॥ ४६० ॥

"हे चंद्रा ! तुला जर कमलनयनेच्या मुखाचें साम्य करायाचें असेल तर पुनः एक वेळ समुद्रांत बुडी मार आणि कलंक धुऊन टाकून आपलें बिंब लखलखीत कर; आणि त्यानंतर पारिजातकाच्या पुष्पांनीं तें सुवासित कर. असें न करशील तर तूं कोणीकडे आणि तें मुख कोणीकडे ?"

यद्यपि बद्धः शैलैर्यद्यपि गिरिमथनमुषितसर्वस्वः ॥
तदपि परभीतभूधररक्षायां दीक्षितो जलधिः ॥ ४६१ ॥

"जरी समुद्राचें बंधन (सेतुबंधसमयीं) पर्वतांनींच केलें, जरी पर्वताच्या (मंदराचलाच्या) योगानेंच मंथन होऊन समुद्रांतील सर्व रत्नें हरलीं गेलीं, तरी त्यांच्या शत्रूपासून (इंद्रापासून) भय उत्पन्न झालें असतां, त्यांस रक्षण करण्याचें व्रत समुद्राचेंच !" मैनाक पर्वत समुद्रांत दडालेला आहे त्यास अनुलक्षून वरील आर्या आहे.*

---

* भर्तृहरीच्या 'नीतिशतका' त असा एक श्लोक आहेः—
मरावें कीं होतें सुरपतिस देऊनि झगडा ॥ प्रहारें वज्राच्या करुनि धरणी इंगल सडा ॥
पित्यातें संग्रामीं त्यजुनि भय निःशंक भिडणें । नव्हे त्या मैनाका उचित जलधीमाजि दडणें ॥

घृणा शंका भयं लज्जा जुगुप्सा चैव पंचमी ॥
कुलं शीलं तथा जातिरष्टौ पाशाः प्रकीर्तिताः ॥ ४६२ ॥

" दया, साशंकता, भय, लज्जा, तिटकारा, कुल, शील आणि जाति हे आठ पाश होत; ह्मणजे एकादें साहस कर्तव्य असतां, हीं आठ प्रतिबंधक होतात. "

कल्याणि पाणिपतितानि विना विचार-
मेतानि मोक्तुमुचितानि न मौक्तिकानि ॥
गुंजेति संजनयते यदिह भ्रमं ते
हस्तारविंदनयनोत्पलयोः प्रभैव ॥ ४६३ ॥

" हे सुंदरी ! तुझ्या हातांत जीं हीं मोतीं आहेत तीं अविचारानें फेंकून देऊं नको. तुला तीं गुंजांसारखीं वाटत असतील खरीं; पण तसें वाटण्याचें कारण तुझ्या हस्तांची ताम्रप्रभा व डोळ्यांची काळीप्रभा ह्या होत ! "

महतोः सुवृत्तयोः सखि हृदयग्रहयोग्ययोः समुच्छ्रितयोः ॥
सज्जनयोः स्तनयोरपि निरंतरं संगतं भवति ॥ ४६४ ॥

" जे थोर बुद्धीचे, सुस्वभावाचे, लोकांच्या हृदयांत भरणारे, उन्नतिसंपन्न अशा सज्जनांची निरंतर संगति राहते. कशी ? तर जसें पृथुल, वर्तुल, मनोरम आणि उन्नत अशा स्तनद्वयाचें अव्यवधान सान्निध्य असतें त्याप्रमाणें ! "

स्वर्गापगायास्तरलैस्तरंगैः पौरांगनानां कुटिलैः कटाक्षैः ॥
धर्मश्च कामश्च समेत्य तीरे ह्यन्योन्यमायोधनमारभेते ॥४६५॥

" गंगेच्या तीरीं धर्म आणि काम हे दोघे येऊन एकमेकांशीं युद्ध करूं लागतात; एकाचें आयुध गंगेचे चंचल तरंग आणि दुसऱ्याचें पौरवधूंचे कुटिल कटाक्ष ! "

मीमांसा पठिता न यैरुपनिषन्नैव श्रुता तत्त्वतः
श्रीमच्छंकरभाष्यतो भगवती गीताऽप्यधीता न यैः ॥
सिद्धांतापगतं शिरोमणिमतं ज्ञात्वापि किंचित्ततो
भट्टाचार्यपदं गताः कथमहो लज्जां लभंते न ते ॥ ४६६ ॥

" ज्यांनीं मीमांसेचें अध्ययन केलें नाहीं, ज्यांनीं तत्त्वतः उपनिषच्छ्रवणही

कधीं केलें नाहीं, ज्यांनीं श्रीमच्छंकराचार्यांच्या भाष्यावरून भगवद्गीतेचें परिशीलनही केलें नाहीं, ते लोक शिरोमणीच्या अपसिद्धांतरूप मताचें किंचित् ज्ञान होतांच बेलाशक भट्टाचार्य हें उपपद आपल्या नांवाला लावून घेतात, तर त्यांस लज्जा कशी वाटत नाहीं ? "

यत्राऽऽर्जवेन लघिमा गरिमाणं वक्रता तनुते ॥
छंदःशास्त्र इवास्मिँल्लोके सरलः सखे किमसि ॥ ४६७ ॥

" छंदःशास्त्रांत जसें आहे कीं, सरळ रेघेनें लघु मात्रा मोजतात व बांकडीनें गुरु मोजतात, तशी जगांतली स्थिति आहे, म्हणजे सरळ आचरणानें लघुत्व प्राप्त होतें व वक्रता दाखविल्यानें गौरव प्राप्त होतो, मग असेंअसतां, हे मित्रा ! तूं सरलतेनें कां वागतोस ? " *

अत्यंतमंथनकदर्थनमुत्सहंते
मर्यादया नियमिताः किमु साधवोऽपि ॥
लक्ष्मीसुधाकरसुधाद्युपनीय शेषे
रत्नाकरोऽपि गरलं किमु नोज्जगार ॥ ४६८ ॥

" सज्जन हे मर्यादेनें नियमित झालेले जरी असले तरी त्यांचा अतीच उपमर्द झाला असता तो त्यास सहन होत नाही. पहा कीं, समुद्र हा रत्नाकर खरा; पण लक्ष्मी, चद्र, अमृत इत्यादि अर्पण केल्यानंतरही जेव्हां त्यास देवदैत्य सोडीनात तेव्हां शेवटी त्यानें विष बाहेर टाकलें ! "

सम्यगनिष्पन्नः सन्योऽर्थस्त्वरया स्फुटीक्रियते ॥
स व्यंग्य एव भवति प्रथमो विनतातनूज इव ॥ ४६९ ॥

" विनतेला पहिला झालेला मुलगा जो अरुण तो जसा गर्भाशयांत पूर्णावयव न होतसाता जन्मास आला व व्यंग (थोटा) निपजला, त्याप्रमाणें जो अर्थ अपूर्णत्वानें व्यक्त केलेला असतां श्रोत्यांस किंवा वाचकांस त्वरित भासमान होतो, तो व्यंग्य समजावा. "

---

* मोरोपंताच्या ' साकी रामायणां ' त पुढील चमत्कारिक उपमा आहे.

प्रभु तारात्मज दूतमुखे त्या हित कथि तें खळ न गणी ॥
त्यांत वक्रपण आधीं मध्यें अंतिंहि जैसे 'मणी ॥

व्यथयतितरामुपेतः स्वच्छप्रकृतीनवद्यलेशोऽपि ॥
उद्विजते ननु चक्षुः सक्तेन रजःकणेनापि ॥ ४७० ॥

" जे प्रकृत्या स्वच्छ असतात, त्यांस दोषाच्या लेशानेंही हीनत्व येतें; असें रजःकण डोळ्यांत गेला असतां, तेवढ्यानेंही डोळा दुखूं लागतो ! "

अशठमलोभमजिह्मं त्यागिनमनुरागिणं विशेषज्ञम् ॥
यदि नाऽऽश्रयति नरं श्रीः श्रीरेव हि वंचिता तत्र ॥ ४७१ ॥

" सदय, निर्लोभ, सरळ, दाता, प्रीतियुक्त व मनुष्यांची ज्यास पारख आहे, अशा पुरुषाचा जर लक्ष्मीनें आश्रय केला नाहीं तर तीच बिचारी फसली असें म्हटलें पाहिजे ! "

या स्वसद्मनि पद्मेऽपि संध्यावधि विजृंभते ॥
इंदिरा मंदिरेऽन्येषां कथं स्थास्यति निश्चला ॥ ४७२ ॥

" जी लक्ष्मी स्वतःचें गृह जें कमल त्यामध्येंही संध्याकाळपर्यंतच कायती राहते, ती दुसऱ्याच्या घरांत कशी दीर्घकाळ राहील ? "

दिग्वाससं गतव्रीडं जटिलं धूलिधूसरम् ॥
पुण्याधिका हि पश्यंति गंगाधरमिवाऽऽत्मजम् ॥ ४७३ ॥

" ज्यास पुण्य-विशेष घडला आहे असेच धन्य पुरुष शिवास व स्व-पुत्रास दिगंबर, यथेच्छ वर्तन करणारा, जटाधारी आणि धुळीनें मळलेला असा पहातात. " वरील विशेषणें दोहोंकडे सहजच लागणारीं आहेत.

मलिनैरलकैरेतैः शुक्लत्वं प्रकटीकृतम् ॥
तद्रोषादेव निर्याता वदनाद्रदनावलिः ॥ ४७४ ॥

" केश हे मूळचे मलिन (काळे) असतां त्यांनीं आपलें शुक्लत्व धारण केलें, या रोषानेंच जणूं काय दंतपंक्ति निघून गेली ! "

श्रुतिः शिथिलतां गता स्मृतिरपि प्रनष्टाऽधुना
गतिर्विपथमागता विगलिता द्विजानां ततिः ॥
गवामपि च संहतिः समुचितक्रियातश्च्युता
कृता नु जरया तया कलियुगस्य साधर्म्यता ॥ ४७५ ॥

जरेचें व कलियुगाचें साम्यः–" (जरापक्षीं) कर्ण मंद झाले आहेत, स्मृति नष्ट होत चालली आहे, नीट चालतां येत नाहीं, दांत पडले आहेत व इंद्रियांचे समुचित व्यापार त्यांजकडून होत नाहींत. "

(कलियुगपक्षीं) " वेदाचें माहात्म्य कमी झालें आहे, स्मृति लुप्तप्राय झाली आहे, सद्वृत्तीचा मार्ग सुटला, (विद्वान्) ब्राह्मणांचे समुदाय दृष्टीस पडत नाहींत, गाईची लोक शुश्रूषा करीत नाहींत. "

सीदंति संतो विलसंत्यसंतः पुत्रा म्रियंते जनकश्चिरायुः ॥
परेषु मैत्री स्वजनेषु वैरं पश्यंतु लोकाः कलिकौतुकानि॥४७६॥

" कलींतील प्रकार किती विचित्र आहे पहा ! सज्जन दुःख पावतात, दुर्जन मजा करतात; पुत्र मरण पावतात, बापास दीर्घायुष्य होतें; परक्यांशीं स्नेहभाव आणि स्वजनाशीं वैर ! "

सद्वंशजातं गुणकोटियुक्तं धनुः कथं पार्थिववामहस्ते ॥
शरः परप्राणविहारदक्षः सपक्षपातोऽप्यधमो गरीयान् ॥ ४७७ ॥

" हे राजा ! जें धनुष्य सद्वंशापासून (पक्षीं, उत्तम वेळूपासून) झालेलें व गुणकोटीनें (पक्षीं, दोरी व टोंकें यांनीं) युक्त तें तूं डाव्या हातांत वागवतोस आणि जो बाण दुसऱ्याच्या प्राणाच्या नाशाविषयीं कुशल व पक्षपातयुक्त (पक्षीं, पंख लावलेला) त्यास उजव्या हातांत घेऊन गौरवितोस हा केवढा अन्याय ! "

नन्वाश्रयस्थितिरियं तव कालकूट
केनोत्तरोत्तरविशिष्टपदोपदिष्टा ॥
प्रागर्णवस्य हृदये वृषलक्ष्मणोऽथ
कंठेऽधुना वससि वाचि पुनः खलानाम् ॥ ४७८ ॥

" हे कालकूटा ! तुला उत्तरोत्तर वरच्या वरच्या स्थानाचा आश्रय करण्यास कोणीं शिकविलें ? पूर्वी तूं सागराच्या हृदयाचे ठायीं वास करीत होतास, पुढें शिवाच्या कंठाचा आश्रय केलास आणि शेवटीं खलांच्या वाणीचे ठायीं राहिलास ! "

आपूर्येत पुनः स्फुरच्छफरिकासारोर्मिभिर्वारिभि-
र्भूयोऽपि प्रविजृंभमाणनलिनं पश्येम तोयाशयम् ॥

इत्याशाशततंतुबद्धहृदयो नक्तंदिनं दीनधीः
शुष्यत्यातपशोषितस्य सरसस्तीरे जरत्सारसः ॥ ४७९ ॥

" जलाशय माशांच्या क्रीडेनें ज्यांत तरंग उत्पन्न होताहेत अशा उदकांनीं पुनः भरून जाईल व यांत कमळें विकसलेलीं मी पुनः पाहीन, अशा आशातंतूंनीं ज्याचें हृदय रात्रंदिवस बद्ध झालें आहे, असा वृद्धहंस या सरोवराच्या तीरीं दीन होत्साता उन्हाचा ताप सोशीत बसला आहे ! "

वैद्या वदंति कफपित्तमरुद्विकारा-
ञ्ज्योतिर्विदो ग्रहगतिं परिवर्तयंति ॥
भूताभिषंग इति भूतविदो वदंति
प्राचीनकर्म बलवन्मुनयो वदंति ॥ ४८० ॥

" शरीरव्याधींची उपपत्ति चौघेजण चार प्रकारांनीं करतात:—वैद्य कफवातपित्तांचे विकार म्हणतात, ज्योतिषी सांगतात कीं हीं ग्रहगतींचीं फळें होत, मांत्रिक भूतचेष्टा म्हणून सांगतात आणि ऋषि प्राक्तन कर्मापासून म्हणजे पूर्वजन्मींच्या आचरणापासून त्यांची उपपत्ति करतात ! "

काकः पद्मवने रतिं न कुरुते हंसो न कूपोदके
मूर्खः पंडितसंगमे न रमते दासो न सिंहासने ॥
कुस्त्री सज्जनसंगमे न रमते नीचं जनं सेवते
या यस्य प्रकृतिः स्वभावजनिता केनापि न त्यज्यते॥४८१॥

" कावळ्यास कमलवनाची शोभा पाहून आनंद होत नाहीं, हंस हा कूपोदकाचे ठायीं रमत नाहीं, मूर्खाला पंडितांच्या समागमानें संतोष होत नाहीं, दासास राजसभा काय होय ? व्यभिचारिणी स्त्री सज्जनांच्या संगतीनें सुख पावत नाहीं, तर नीच जनांचा समागम तिला आवडतो; एकंदरींत जी ज्याची स्वभावसिद्ध प्रकृति ती कोणाच्यानें सोडवते ? "

हस्ती वन्यः स्फटिकघटिते भित्तिभागे स्वबिंबम्
दृष्ट्वा दृष्ट्वा प्रतिगज इति त्वद्द्विषां मंदिरेषु ॥
दंताघाताद्दलितदशनस्तं पुनर्वीक्ष्य सद्यो
मंदं मंदं स्पृशति करिणीशंकया विक्रमार्क ॥ ४८२ ॥

" हे विक्रमादित्या ! तुझ्या शत्रूंच्या मंदिरीं वनांतला हत्ती जाऊन तेथील स्फटिकभिंतीचे ठायीं आपलें प्रतिबिंब पाहून हा दुसरा हत्ती आहे या बुद्धीनें त्यास टक्कर देतो; पण पुढें काय होतें कीं, वरील आघाताच्या योगानें त्याचे दांत मोडून गेले असतां पुनः त्याच भिंतीकडे तो मंदमंद जाऊन हस्तिनीच्या बुद्धीनें त्याच आपल्या प्रतिबिंबास गोंजारूं लागतो ! "

ग्रासोद्गलितसिक्थस्य का हानिः करिणो भवेत् ॥
पिपीलिका तु तेनैव सकुटुंबोपजीवति ॥ ४८३ ॥

" हत्तीनें घांस उचलला असतां त्यांतील शीत जर गळून पडलें तर त्यांत त्याची हानि ती काय? पण ह्या शितांतच मुंगीच्या कुटुंबाचा निर्वाह होतो!"

दरिद्रता धीरतया विराजते कुरूपता शीलतया विराजते ॥
कुभोजनं चोष्णतया विराजते कुवस्त्रता शुभ्रतया विराजते ॥४८४॥

" दरिद्र पुरुष जर स्वभावानें गंभीर असेल तर त्या गुणानें त्याचें दारिद्र्य शोभलें जातें; कुरूप मनुष्य जर सुशील आहे तर तो शोभला जातो. कदन्न उष्ण असल्यानें शोभून जातें; आणि जीर्ण वस्त्र स्वच्छतेनें शोभतें. "

पत्रपुष्पफलच्छायामूलवल्कलदारुभिः ॥
धन्या महीरुहा येभ्यो निराशा यांति नार्थिनः॥४८५॥

" पानें, फुलें, फळें, छाया, मूळें, सालीं व लांकडें यांपैकीं कोणत्या कोणत्या तरी तऱ्हेनें जे अर्थिजनांचे मनोरथ पूर्ण करतात ते वृक्ष धन्य होत!"

कीटगृहं कुटिलोऽन्तः कठिनः क्षारांबुसंभवः शून्यः ॥
शंखः श्रीपतिनिकटे केन गुणेन स्थितिं लेभे ॥ ४८६ ॥

" हा शंख पाहिला तर मुळीं किड्याचें घर, आंत कुटिल, जात्या कठिण, क्षारोदकांत जन्म पावलेला आणि शून्य,—असा असतां विष्णूपाशीं यास आश्रय जो मिळाला तो कोणत्या गुणेंकरून असेल तो असो ! "

सुधाकरकरस्पर्शाद् बहिर्द्रवासि सर्वतः ॥
चंद्रकांतमणे तेन मृदुत्वं लोकविश्रुतम् ॥ ४८७ ॥

" हे चंद्रकांत मण्या ! शीतलत्वाविषयीं येवढें प्रख्यात जें चंद्राचें किरण त्याचा स्पर्शही तुला कठोर लागून तूं द्रव पावतोस, तस्मात् तुझी मृदुत्वाची कीर्ति यथार्थ आहे ! "

चित्रं न तद्यदयमंबुधिरंबुदौघ-
सिंधुप्रवाहपरिपूर्णतया महीयान् ॥
त्वं त्वार्थनाम्रुपकरोषि यदल्पकूप
निष्पीड्य कुक्षियुगुलं हि महत्त्वमेतत् ॥ ४८८ ॥

" मेघांपासून होणाऱ्या वृष्टीनें व नद्यांच्या जलप्रवाहेंकरून सागर हा सदोदित परिपूर्ण असतो यांत कांहीं नवल नाहीं; पण हे अल्पकूपा ! तूं आपल्या कुक्षींचें निष्पीडन करून तृषितांची पीडा दूर करतोस हें तुझें महत्त्व बरीक वर्णन करण्यासारखें खरं ! "

कंपंते गिरयः पुरंदरभिया मैनाकमुख्याः पुनः
क्रंदंत्यंबुधराः स्फुरंति वडवावक्त्रोद्गता वह्नयः ॥
भोः कुंभोद्भव मुच्यतां जलनिधिः स्वस्त्यस्तु ते सांप्रतम्
निद्रालुश्लथबाहुवल्लिकमलाश्लेषो हरिः सीदति ॥ ४८९ ॥

" हे अगस्त्या ! तूं समुद्रास अंजलिगत करून प्राशूं पाहात आहेस, पण ही पहा काय तारांबळ उडून गेली ती !—इंद्राच्या वज्रापासून भय पावलेले मैनाकादि पर्वत जे आजपर्यंत समुद्रात सुखरूप दडून राहिले होते ते आतां इंद्राचे धाकानें कांपूं लागले आहेत, मेघ रडूं लागले आहेत, वडवाग्नि निराश्रय होणार यास्तव तो मुखावाटें ज्वाला टाकूं लागला आहे, आणि झोपाळु व जिची मिठी सईल पडली आहे अशा लक्ष्मीनें आलिंगित जो हरि तोही दुःख पावत आहे;—तर तुला कांहीं दया येऊं दे व समुद्रास सोड कसा ! "

भ्रूभंगे रचितेऽपि दृष्टिरधिकं सोत्कंठमुद्वीक्षते
रुद्धायामपि वाचि सस्मितमिदं दग्धाननं जायते ॥
कार्कश्यं गमितेऽपि चेतसि तनू रोमांचमालंबते
दृष्टे निर्वहणं भविष्यति कथं मानस्य तस्मिञ्जने ॥ ४९० ॥

कोणी मानिनी आपल्या सखीस म्हणतेः—" अगे ! तो प्रियजन दृष्टीसमोर असला म्हणजे मीं आपल्याकडून कितीही मानधारण केला तरी तो पार कसा पडावा ? पहा कीं, मीं आपल्याकडून जरी बळेंच कपाळाला

आठ्या घातल्या, तरी माझी दृष्टि त्याच्या मुखाकडे लागून माझें हृदयगत औत्सुक्य प्रगट करते; मी मुकस्तंभ जरी बसलें तरी अंतर्गत हर्ष या मेल्या तोंडावर स्मिताच्या रूपानें आविर्भूत होतो; आणि मन कितीही कठिण केलें तरी अंगावर येणारा कांटा कशानें लपणार? तेव्हां वरील बाह्य चिन्हांनीं मानाचें कृत्रिमत्व व्यक्त होतें!"

जन्मस्थानं न खलु विमलं वर्णनीयो न वर्णो
दूरे पुंसां वपुषि रचना पंकशंकां करोति ॥
यद्यप्येवं सकलसुरभिद्रव्यगर्वापहारी
को जानीते परिमलगुणः कोऽपि कस्तूरिकायाः ॥ ४९१ ॥

"कस्तूरीचें जन्मस्थान पाहिलें तर तें मोठें निर्मळ आहे असें नाहीं; वर्णही वर्णनीय आहे असें नाहीं; तिचा लेप अंगावर केला असतां चिखल लिंपला आहे कीं काय असा भास होतो; पण इतकें असून ती साऱ्या सुगंधी द्रव्यांच्या तोंडांत मारते; तेव्हां हा तिचा काय लोकोत्तर गुण आहे पहा!"

मौलौ सन्मणयो गृहं गिरिगुहा त्यागः किलात्मत्वचो
निर्यत्नोपनतश्च वृत्तिरनिलैरेकत्र चर्येदृशी ॥
अन्यत्रानृजुवर्त्मता द्विरसना वक्त्रे विषं वीक्षणम्
सर्वामंगलसूचकं कथय भो भोगिन्सखे किं न्विदम् ॥ ४९२ ॥

"हे सर्पा! तुझ्या मस्तकावर पहावें तों उत्तम रत्नें चमकताहेत, तुझें निवासस्थान पर्वतांच्या गुहा होत, त्याग (पक्षीं, दान) तर स्वतः आपल्या त्वचेचाही तूं करतोस, नेहेमींची तुझी वृत्ति पाहिली तर अयत्न सुलभ जो वायु त्यावर तुझा निर्वाह चालतो;—एकीकडे पहावें तों तुझी एकंदर चर्या अशी; पण दुसरीकडे पहा काय आहे तें!—कुटिलगति (कपटाचरण) दोन जिभा (चहाडी), तोंडांत विष (कटु भाषण) आणि अत्यंत अमंगलदायक दर्शन, तेव्हां तुझा खरा प्रकार तरी कोणता म्हणावा?"

काकस्य कति वा दंता मेषस्यांडे कियत्पलम् ॥
गर्दभे कति रोमाणि व्यर्थैषा तु विचारणा ॥ ४९३ ॥

"कावळ्यास दांत किती असतात; मेंढ्याच्या अंडांत किती मांस असतें,

गाढवाच्या अंगावर किती रोम असतात,—इत्यादि गोष्टींची विचक्षणा करीत बसणें म्हणजे मूर्खपणा आहे ! ”

नैषां संध्याविधिरविकलो नाच्युतार्चोऽपि सांगा
न स्वे काले हवननियमो नापि वेदार्थचिंता ॥
न क्षुद्वेलानियतमशनं नापि निद्रावकाशो
न द्वौ लोकावपि तनुभृतां राजसेवापराणाम् ॥ ४९४ ॥

“ जे राजसेवेंत नियुक्त झालेले त्यांची संध्या पुरती व्हावयाची नाहीं, देवपूजा धड उरकायाची नाहीं, यथाकालीं होम घडायाचा नाहीं, वेदार्थाचें मनन करण्यास त्यांस अवकाश नाहीं, वेळेवर जेवण नाहीं व झोंपही नाहीं. सारांश, त्या हतभाग्यांस इहलोकींचें सुख लाभत नाहीं व परलोकींचें नाहीं ! ”

निर्वृत्ताध्वरकृत्य ऋत्विजमहो तीर्णापगो नाविकम्
युद्धांते सुभटं च सिद्धविजयो वोढारमाप्तस्थलः ॥
वृद्धं वारवधूजनं च कितवो निर्घृष्टतद्यौवनो
ध्वस्तातंकचयश्चिकित्सकमपि द्वेष्टि प्रदेयार्थिनम् ॥ ४९५ ॥

“ यज्ञकर्म उरकून गेलें असतां यजमानास ऋत्विज नकोसा होतो, नदी ओलांडून गेलेल्या उतारूस नाविक तृणवत् वाटूं लागतो, युद्ध समाप्त झालें कीं योद्धा म्हणजे कःपदार्थ होऊन जातो, एकदां स्थळ मिळालें म्हणजे मग वरास कोणी विचारीत नाहीं, व्यसनी लोक हे वारवधूंचा बहार भोगून मोकळे झाले म्हणजे मग त्यांस पुसतनासे होतात आणि रोगास दूर करून आपला झालेला पैसा वैद्य मागूं लागला कीं तो माजी रोग्यास दुस्मान वाटूं लागतो ! ”

स्वाधीना दयिता सुतावधि सुतोऽसौ षोडशाब्दावधि
स्यात्कन्या करपीडनावधि सुतस्त्रीस्तद्दशात्वावधि ॥
जामाता बहुलार्पितावधि सखा साधुप्रलापावधि
शिष्यो गुह्यनिरूपणावधि परे चैते धनित्वावधि ॥ ४९६ ॥

“ जोंपर्यंत मुलगा झाला नाहीं तोंपर्यंत बायको आपल्या स्वाधीन, मुलगा सोळा वर्षांपर्यंत, मुलगी लग्न होई तोंपर्यंत, सून तीस यौवनदशा

प्राप्त होई तोंपर्यंत, जांवई जोंपावेतों पुष्कळ पोंचतें आहे तोंपर्यंत, मित्र लोक आपणास बरें म्हणताहेत तोंपर्यंत, शिष्य गुरुकिल्ली सांगून दिली नाहीं तोंवर आणि सामान्यतः इतर लोक जवळ पैसा आहे तोंपर्यंत !"

तापं लुंपसि सर्वतो वितरसे मुक्ताफलं शुक्तिषु
क्षेत्रं सिंचासि किंच पल्लवयसि श्रीखंडमुख्यान्द्रुमान् ॥
क्षारं क्षारमिदं जलं जलनिधेराधाय जीमूत हे
विश्वं जीवयसि ब्रवीतु जगति प्रौढोऽपि कस्ते गुणान् ॥४९७॥

"हे मेघा ! तूं साऱ्या जगाचा ताप घालवितोस, समुद्रांतील शिंपांत मोती उत्पन्न करतोस, शेतें शिंपतोस, चंदनादि वृक्षांस पल्लवित करतोस, समुद्राचें अतिशय खारट जें पाणी तें शोषून घेऊन विश्वाचें पुनरुज्जीवन करतोस; तेव्हां कोणी केवढाही प्रौढ वक्ता झाला तरी तुझ्या गुणांचें यथास्थित वर्णन करणें केवढें दुरापास्त आहे !"

स्निग्धेंद्रोपलसुंदरः कचभरो वक्त्रं सगोत्रं विधो-
र्वक्षोजौ मणिकुंभडंबरमुषौ मध्योऽस्ति वा नास्ति वा ॥
श्रोणीमंडलमूरुदुर्वहमहो शोणाब्जतुल्ये पदे
मन्ये मंजुगिरो मरालमहिलाध्येयो गतेर्विभ्रमः ॥ ४९८ ॥

"तुळतुळीत इंद्रनीलांप्रमाणें सुंदर केशपाश, चंद्रासारखें रमणीय मुख, रत्नकलशांच्या डौलाचे स्तन, मध्यभाग (कटिप्रदेश) हा सरासरी आहे किंवा नाहीं; मांड्यांस न झेंपणारा असा जघनभार, रक्तकमलतुल्य पावलें, मधुर कंठीचा आणि हंसस्त्रियांनीं ज्यास पाहून झुरावें असा गतिविलास !"

देवो हरिर्वहतु वक्षसि कौस्तुभं त-
न्मन्ये च काचन पुनर्द्युमणेः प्रतिष्ठा ॥
यत्पादसंगतिसमर्पितसौरभाणि
धत्ते स एव शिरसा सरसीरुहाणि ॥ ४९९ ॥

"विष्णु हा कौस्तुभास स्वहृदयीं धारण करो; पण त्याच्याहून दिन-मणीची प्रतिष्ठा मला फार अधिक वाटते. कां तर, त्याच्या पादस्पर्शानें विकास प्राप्त होऊन ज्यांचा सुगंध प्रगट झाला आहे अशीं कमलें विष्णु आपल्या शिरीं धारण करतो !"

राज्यं येन पटांतलग्नतृणवत्त्यक्तं गुरोराज्ञया
पाथेयं परिगृह्य कार्मुकवरं घोरं वनं प्रस्थितः ॥
स्वाधीनः शशिमौलिचापविषये प्राप्तो न वै विक्रियाम्
पायाद्वः स बिभीषणाग्रजनिहा रामाभिधानो हरिः ॥ ५०० ॥

" ज्यानें वस्त्राच्या दशेला अडकलेल्या तृणाप्रमाणें आपल्या पित्याच्या आज्ञेवरून राज्य सोडून दिलें, जो धनुष्य हेंच काय तें पाथेय (शिदोरी) बरोबर घेऊन घोर अरण्यांत गेला, जो स्वतंत्र आहे, ज्याला शंकरचापाच्या दर्शनेंकरून भीति वाटली नाहीं, तें ज्यानें सहज मोडून टाकलें आणि बिभीषणाच्या थोरल्या भावाचा ज्यानें वध केला तो रामनामधारी विष्णु तुमचें रक्षण करो. "

कुलाचला यस्य महीं द्विजेभ्यः प्रयच्छतः सीमदृषत्त्वमापुः ॥
बभूवुरुत्सर्गजलं समुद्राः स रैणुकेयः श्रियमातनोतु ॥५०१॥

" ज्याच्या पृथ्वीप्रदानसमयीं अष्टकुलाचल हे ब्राह्मणांच्या दानविषयक भूमीचे धोंडे झाले आणि समुद्र हे दानोदक झाले, तो रेणुकापुत्र तुम्हांस श्रेयस्कर होवो ! "

पदव्यक्तिव्यक्तीकृतसहृदयानंदसरणौ
कवीनां काव्येन स्फुरति बुधमात्रस्य धिषणा ॥
नवक्रीडावेशव्यसनपिशुनो यः कुलवधू-
कटाक्षाणां पंथाः स खलु गणिकानामविषयः ॥५०२॥

" शब्दश्रवणमात्रेंकरून सहृदयाच्या ठायीं उत्पन्न होणारा जो आल्हाद तो कवीच्या काव्याचे ठायीं ज्ञात्यास मात्र बुद्धिगोचर होतो. कसा ? तर ज्याप्रमाणें नूतन समागमाच्या योगानें प्राप्त झालेल्या रसिकत्वाचे दर्शक जे कुलवधूंचे कटाक्ष ते गणिकाजनांस अगम्य असतात ! "

ते पृथ्वीपतयो जयंति तनयो येषां द्विषद्भूभृताम्
ते वंद्या यतयो विशंति मतयो येषां परे ब्रह्मणि ॥
ते श्लाघ्याः कवयो वयोमदभरव्याजृंभमाणांगना-
दृक्पाता इव तोषयंति हृदयं येषां गिरां संचयाः ॥ ५०३ ॥

" ते राजे धन्य, कीं ज्यांच्या पायांवर त्यांच्या शत्रूंस डोकें घांसावें लागतें; ते यति धन्य, कीं ज्यांच्या बुद्धीस परब्रह्म हें गोचर झालें आहे;

आणि ते कवि धन्य, कीं ज्यांचे वाग्विलास तरुणीच्या मदपूर्ण कटाक्षाप्रमाणें रसिकांच्या हृदयास हृष्ट करतात ! "

त एवामी बाणास्तदपि हरलब्धं धनुरिदम्
स एवाहं पार्थः प्रमथितसुरारातिनिचयः ॥
इमास्तास्ता गोप्यो हरिचरणचित्तैकशरणा
ह्रियंते गोपालैर्विधिरपि बलीयान्न तु नरः ॥ ५०४ ॥

कृष्णावतार समाप्त झाल्यावर अर्जुनाची जी दुर्दशा उडाली तिचें तो खेदपूर्वक वर्णन करतोः—" अरेरे ! तेच ना हे माझे बाण, तेंच हें शिवापासून प्राप्त झालेलें धनुष्य, तोच हा मी अर्जुन, कीं ज्यानें दानवांचा मुद्धां संहार केला; आणि ही सर्व जुनीच सामग्री असतां कृष्णाच्या पायांशीं ज्यांचा एकभाव अशा त्या गोपी या वनचरांनीं हरून न्याव्या काय ? तस्मात् दैव हें प्रबल होय, नराचा आपल्या पौरुषाविषयींचा अभिमान सारा खोटा ! "

उत्सिक्तः कुसुमासवैः कुमुदिनीं राजप्रियां पुष्पिणी-
मालिंगन्निशि निर्भयं परिचयं कुर्वन्पुनः पल्लवैः ॥
यावत्पंकजसौरभत्वमखिलं गृह्णँल्लघु प्रस्थित-
स्तावत्कल्य उपस्थिते मरुदयं विष्वग्भयाद्धावति ॥ ५०५ ॥

" पुष्पमधूनें (पक्षीं, मद्यानें) झिंगून गेलेला असा वायु राजप्रिया (राणी पक्षीं, चंद्रवल्लभा) जी कुमुदिनी ती पुष्पिणी (फुललेली; पक्षीं, अस्पर्शा) असतां तिला आलिंगन देऊन तिच्या पल्लवाशीं (पक्षीं, पदराशीं) निर्भयपणें परिचय करीत होत्साता समग्र सुगंधाचें हरण करून जों हळूंच जावयास निघाला आहे तों प्रभातकाळ समीप आलासा पाहून घाबऱ्यां घाबऱ्यां चोहोंकडे धांवतो ! "

अलंकरोति हि जरा राजामात्यभिषग्यतीन् ॥
विडंबयति पण्यस्त्रीमल्लगायकसेवकान् ॥ ५०६ ॥

" राजाचे मंत्री, वैद्य व संन्यासी यांस जरा ही भूषण आणते; तीच वारांगना, मल्ल, गायक व सेवक यांस विडंबनेस पात्र करते ! "

गर्जन्हरिः सांभसि शैलकुंजे प्रतिध्वनीनात्मकृतान्निशम्य ॥
पदं बबंध क्रमितुं सरोषः प्रतर्कयन्नन्यमृगेंद्रनादम् ॥ ५०७ ॥

" पर्वतावरील एका कुंजांतील जलाशयाच्या कांठीं असतां सिंहानें मोठ्यानें गर्जना केली व तिजसरसे चोहोंकडे प्रतिध्वनि उठले; ते ऐकून सिंह त्वेषास चढून अन्य सिंहाच्या शंकेनें त्यावर झांप घालण्यास तयार झाला ! "

उपानीतं दूरात्परिमलमुपाघ्राय मरुता
समायासीदस्मिन्मधुरमधुलोभान्मधुकरः ॥
परो दूरे लाभः कुपितफणिनश्चंदनतरोः
पुनर्जीवन्यायाद्यदि तदिह लाभोऽयमतुलः ॥ ५०८ ॥

" हा मधुकर वाऱ्यावर वाहत आलेल्या परिमलास हुंगून मधुर मधूच्या लोभानें या चंदनाकडे आला आहे. आतां यास वरील लाभ होणें तर दुरापास्तच आहे, पण वरील वृक्षावर जो क्रुद्ध सर्प आहे त्याच्या तडाक्यांतून वांचून हा जिवंत माघारीं जावो म्हणजे यानें मोठी मिळविली ! "

दष्टे जगद्वपुपि कालभुजंगमेन
तत्रांधकारमिपमाविरभूद्विषं यत् ॥
संजातलक्ष्मणि तदिंदुमणौ निपाय्य
ज्योत्स्नामये पयासि तत्क्षिपति स्म धाता ॥ ५०९ ॥

" कालरूप भुजंगमानें (पक्षीं, कृष्णसर्पानें) जगद्रूप शरीरास दंश केला असतां अंधकाराच्या रूपानें जो विपार चोहोंकडे पसरला तो पाजविल्यानें ज्याला काळेपणा आला आहे असा चंद्र झाला असतां नंतर त्यास चंद्रिकारूप दुग्धराशींत ब्रह्मदेव जणों काय टाकतां झाला ! "

सुधाधाम्नः कांतिस्तव वदनपंकेरुहगुणै-
र्जितेव म्लानत्वं व्रजति सहसा प्राणदयिते ॥
वदत्येवं कांते दिवसविरहातंकचकिता
तदंगे संलग्ना तव दिशतु राधा प्रियशतम् ॥ ५१० ॥

" हे प्राणप्रिये ! तुझ्या मुखकमलाच्या कांतीनें जणूं काय लज्जित

झालेली अशी ही चंद्राची शोभा म्लानत्व पावत आहे असें वाटतें, यामुळें कृष्णाचें भाषण ऐकून प्रातःकाल झालासा पाहून आतां आपणास याचा विरह होणार म्हणून घाबरलेली व आपल्या वल्लभाच्या अंगावर जिनें अंग टाकून दिलें आहे अशी राधा तुझें बहुत कल्याण करो ! ”

श्लेषे केचन शब्दगुंफविषये केचिद्रसे चापरेऽ-
लंकारे कतिचित्सदर्थविषये चान्ये कथावर्णके ॥
आः सर्वत्र गभीरधीरकविताविंध्याटवीचातुरी-
संचारे कविकुंभिकुंभभिदुरो बाणस्तु पंचाननः ॥ ५११ ॥

“ कोणी कवि श्लेषांतच निपुण असतात, कोणी शब्दशय्येंत, कोणी रसांत, कोणी अलंकारांत, कोणी प्रौढ अर्थाचें निबंधन करण्यांत, किंवा कोणी कथानक बांधण्यांत; पण कवितारूप गहन विंध्याटवींत संचार करण्याविषयीं अत्यंत कुशल असा म्हटला म्हणजे कविगजांचा गर्व परिहार करणारा एक बाणरूप सिंहच होय ! ”

ये संसत्सु विवादिनः परयशःशल्येन शूलाकुलाः
कुर्वंति स्वगुणस्तवेन गुणिनां यत्नाद्गुणाच्छादनम् ॥
तेषां रोषकषायितोदरदृशां कोपोष्णनिःश्वासिनाम्
दीप्ता रत्नशिखेव कृष्णफणिनां विद्या जनोद्वेगिनी ॥ ५१२ ॥

“ जे सभेंत नेहेमीं वाग्जल्प करणारे, दुसऱ्याच्या कीर्तिश्रवणानें ज्यांच्या पोटांत शूळ उठतो व जे आपल्या गुणांची प्रशंसा करून दुसऱ्यांच्या गुणाचें आच्छादन करण्याविषयीं नेहेमीं टपलेले असतात, अशांची विद्या रागानें ज्यांची दृष्टि लाल झाली आहे व जे उष्ण निःश्वास टाकताहेत, अशा कृष्णसर्पाच्या शिरोरत्नाप्रमाणें लोकांस अत्यंत भयावह होय ! ”

ज्योतिःशास्त्रमहोदधौ बहुतरोत्सर्गापवादात्मभिः
कल्लोलैर्निबिडे कणान्कतिपयाल्लँब्ध्वा कृतार्था इव ॥
दीर्घायुःसुतसंपदादिकथनैर्दैवज्ञपाशा इमे
गेहं गेहमनुप्रविश्य धनिनां मोहं मुहुः कुर्वते ॥ ५१३ ॥

“ बहुत नियम व अपवाद या तरंगांनीं व्याप्त असा जो ज्योतिःशास्त्र-

रूप महासागर त्यांतले थोडेसे कण प्राप्त झाल्यानें केवळ कृतार्थ होऊन बसलेले असे जे छोटेखानी ज्योतिषी ते दीर्घायुष्य, संतत, संपत, इत्यादिकांविषयीं धनिकांस आशीर्वाद देत दारोदार हिंडतात !"

उपचारः कर्तव्यो यावदनुत्पन्नसौहृदाः पुरुषाः ॥
उत्पन्नसौहृदानामुपचारः कैतवं भवति ॥ ५१४ ॥

"जोंपर्यंत कोणाशीं मैत्री जडली नाहीं तोंपर्यंत त्यास आदरसत्कारादि उपचार करावे; पण एकदां मैत्री जुळल्यावर मग वरील उपचार करणें हें ढोंग दिसतें !"

मांसं मृगाणां दशनौ गजानां मृगाद्विषां चर्म फलं द्रुमाणाम् ॥
स्त्रीणां स्वरूपं च नृणां हिरण्यमेते गुणा वैरकरा भवंति ॥५१५॥

"मृगांचें मांस, हत्तींचे दांत, सिंह व वाघ यांचें कातडें, वृक्षांचें फळ, स्त्रियांचें सौंदर्य आणि धनाढ्यांचें द्रव्य,—हे सर्व गुण प्रत्येकाच्या नाशास कारणभूत होत."

दारेषु किंचित्स्वजनेषु किंचिद्गोप्यं वयस्येषु सुतेषु किंचित् ॥
युक्तं न वा युक्तमिदं विचिंत्य वदेद्विपश्चिन्महतोऽनुरोधात् ॥५१६॥

"कांहीं गोष्टी बायकोपासून गुप्त ठेवाव्या लागतात, कांहीं चाकरमाणसांपासून, कांहीं मित्रांपासून व कांहीं पुत्रांपासून; एकंदरीत कोणतीही गोष्ट युक्त आहे कीं अयुक्त आहे याचा विचार करून शहाण्या मनुष्यानें मोठें धोरण ठेवून बोलत असावें."

राष्ट्रस्य चित्तं कृपणस्य वित्तं मनोरथं दुर्जनमानुषाणाम् ॥
स्त्रियाश्चरित्रं पुरुषस्य भाग्यं देवो न जानाति कुतो मनुष्यः ॥५१७॥

"राष्ट्राची चित्तवृत्ति, कृपणाचें धन, दुर्जनांचें मनेप्सित, स्त्रियांचें कामचरित आणि पुरुषांचा भाग्योदय,—या पांचांचा देवासही थांग लागत नाहीं, मग माणसाचा काय पाड !"

संतश्चेदमृतेन किं यदि खलस्तत्कालकूटेन किम्
दातारो यदि कल्पशाखिभिरलं यद्यर्थिनः किं तृणैः ॥

किं कर्पूरशलाकया यदि दृशः पंथानमेति प्रिया
संसारेऽपि सतींद्रजालमपरं यद्यस्ति तेनापि किम् ॥ ५१८ ॥

" जर सज्जनाचा समागम आहे तर अमृत कशाला पाहिजे? दुर्जनाशीं संबंध आहे तर कालकूटाचें काय प्रयोजन? दाते आहेत तर कल्पवृक्षांची काय गरज आहे? याचकांपुढें तृणाची काय मातब्बरी आहे? प्रिया दृष्टीस पडली असतां कापराच्या काडीनें डोळे किती गार होणार? संसाराच्या विचित्र पसाऱ्यापुढें गारुड्याचा खेळ झक मारतो!"

कलहांतानि हर्म्याणि कुवाक्यांतं च सौहृदम् ॥
कुराजांतानि राष्ट्राणि कुकर्मांतं यशो नृणाम् ॥ ५१९ ॥

" कलह लागला कीं घर बुडालें, दुर्वचनाचा प्रयोग झाला कीं मैत्री आटपली, वाईट राजा आला कीं राष्ट्राची इतिश्री समजावी, दुष्कर्म घडलें कीं अब्रू खालीं झाली!"

वित्तं परिमितमधिकव्ययशीलं पुरुषमाकुलीकुरुते ॥
ऊनांशुकमिव पीनस्तनजघनायाः कुलीनायाः ॥ ५२० ॥

" जो हाताचा सढळ त्याला थोडा आदा असला म्हणजे फार पीडा होते; कीं ज्याप्रमाणें स्तन व जघन यांचा विस्तार कुलीन स्त्रियेस आखूड वस्त्रामुळें संकोचदायक होतो!"

येनांचलेन सरसीरुहलोचनाया–
स्त्रातः प्रभूतपवनादुदये प्रदीपः ॥
तेनैव सोऽस्तसमयेऽस्तमयं विनीतः
क्रुद्धे विधौ भजति मित्रममित्रभावम् ॥ ५२१ ॥

" कमलाक्षीच्या ज्या पदराच्या योगानें वाऱ्यापासून दीपाचें प्रथम संरक्षण झालें, तोच पदर पुढें त्यास अस्ताम पोंचविण्यास कारणीभूत झाला. तेव्हां दैव प्रतिकूल झालें असतां मित्रही शत्रु बनतो!"

सहजमलिनवक्रभावभाजां भवति भवः प्रभवात्मनाशहेतुः ॥
जलधरपदवीमवाप्य धूमो ज्वलनविनाशमनुप्रयाति नाशम् ॥५२२॥

" जे स्वभावत.च मलिन व वक्र त्यांस उन्नति प्राप्त झाली असतां ते आपल्या व जनित्याच्या नाशास सुद्धां कारण होतात; पहा कीं, धूम हा मेघ बनला कीं, अग्नीच्या उपशमास कारण होऊन नंतर स्वतः लय पावतो ! "

कल्पवृक्षोऽपि कालेन भवेद्यदि फलप्रदः ॥
को विशेषस्तदा तस्य वन्यैरन्यमहीरुहैः ॥ ५२३ ॥

" कल्पवृक्षही जर अवकाशानें फलप्रद होऊं लागला, तर मग त्याच्यांत व इतर रानवट झाडांत काय अंतर राहिलें ? "

वरं दारिद्र्यमन्यायप्रभवाद्विभवादपि ॥
शरीरे कृशता रम्या स्थूलता न तु शोफतः ॥ ५२४ ॥

" अन्यायानें मिळविलेल्या वैभवापेक्षा दारिद्र्य बरें; जसें, सुजेनें आलेल्या स्थूलपणापेक्षां रोडपातळपणा बरा ! "

अंतर्विशति मार्जारी शुनी वा राजवेश्मनि ॥
बहिष्ठस्य गजेंद्रस्य किमर्थः परिहीयते ॥ ५२५ ॥

" मांजरी व कुत्री ह्या दोघी खुशाल राजवाड्यांत प्रवेश करतात; आणि हत्ती पाहिला तर त्यास जागा बाहेर ! पण असें असल्यानें हत्तीचें काय कमी होत आहे ? "

पीयूषेण सुराः श्रिया मुररिपुर्मर्यादया मेदिनी
शक्रः कल्परुहा शशांककलया श्रीशंकरस्तोषितः ॥
मैनाकादिनगा निजोदरगृहे यत्नेन संरक्षिता-
स्तच्चूलीकरणे घटोद्भवमुनिः केनापि नो वारितः ॥ ५२६ ॥

" समुद्रानें देवास अमृत दिलें, विष्णूस लक्ष्मीचें दान केलें, पृथ्वीस मर्यादा दिली, इंद्रास कल्पवृक्ष दिला, शंकरास चंद्राची कला देऊन संतुष्ट केलें आणि मैनाकादि पर्वतास आपल्या उदराचे ठायी ठाव दिला; पण ज्या वेळेस अगस्त्यानें त्याला प्राशनार्थ अंजलीत घेतलें त्या वेळेस वरच्यांपैकीं एकानेंही त्याचें रक्षण केलें नाहीं ! "

रत्नाकरे परिहृता वसतिः किमन्य-
दंगीकृतः कठिनवेधनदुःखभारः ॥

वक्षोजकुंभपरिरंभणलोलुपेन
किं किं न तेन विहितं नवमौक्तिकेन ॥ ५२७ ॥

" मौक्तिकानें समुद्रांतली आपली वसती सोडून दिली; फार तर काय ? पण वेधनसंस्काराचें महादुःखही सहन केलें ! हें सर्व कशाकरतां ? तर कुचकुंभपरिरंभणाविषयीं जी त्याची उत्कट इच्छा ती तृप्त करण्याकरतां ! "

यथा देशस्तथा भाषा यथा राजा तथा प्रजा ॥
यथा भूमिस्तथा तोयं यथा बीजं तथांऽकुरः ॥ ५२८ ॥

" जसा देश तशी भाषा; जसा राजा तशी प्रजा, जशी भूमि असेल तसें उदक असणार; आणि जसें बीं असेल त्या मानाचें झाड निपजणार ! "

सद्यः फलति गांधर्वं मासमेकं पुराणकम् ॥
वेदाः फलंति कालेषु ज्योतिर्वैद्यं निरंतरम् ॥ ५२९ ॥

" गायनविद्या तत्काल फलद्रूप होते; पुराणाची प्राप्ति महिन्यानें होते; वेदांचें फल कालांतरानें दृष्टीस पडतें; आणि ज्योतिष व वैद्य हीं निरंतर लाभप्रद होतात ! "

न देवाय न धर्माय न बंधुभ्यो न चार्थिने ॥
दुर्जनेनार्जितं द्रव्यं भुज्यते राजतस्करैः ॥ ५३० ॥

" दुर्जनानें मिळविलेलें द्रव्य देवकार्य, धर्मकृत्य, संबंधीजन, किंवा याचक यांच्याकडे खर्च व्हावयाचें नाही; तर त्याचा उपभोग राजा किंवा तस्कर यांजकडून व्हावयाचा ! "

नैताः स्वयमुपभोक्ष्यसि मोक्ष्यसि चेज्जलद यत्र कुत्रापि ॥
तत्किं तत्र न मुंचासि मुक्ता मुक्ता भवंति यत्राऽऽपः ॥५३१॥

" हे मेघा ! जर हा जलसंचय तूं स्वतः उपभोगणार आहेस असें नाहीं व कोठें तरी यदृच्छेनें टाकून देणार. तर ज्या ठिकाणीं जलबिंदु सोडले असतां ते मौक्तिकरूप होतात तेथें वरील संचयाचा तूं कां विनियोग करीत नाहींस ? "

पाथोनिधिमधि पाथो वितरासि पाथोद किं तेन ॥
दिनकरकराभितप्तं चातकपोतं न तोषयासि ॥ ५३२ ॥

" मूर्खास मान म्हटला म्हणजे त्याच्या घरांतल्या घरांत, अधिकाऱ्यास त्याच्या गांवांत, राजास त्याच्या देशांत; परंतु विद्वानास तो जिकडे जाईल तिकडे ! "

अर्थाहरणकौशल्यं किं स्तुमः शास्त्रवादिनाम् ॥
अव्ययेभ्योऽपि ये चार्थान्निष्कासयंति ह्यनेकशः ॥ ५४२ ॥

" जे शास्त्रवेत्ते आहेत त्यांची अर्थनिष्पादनाविषयीं जी निपुणता असते ती काय सांगावी ! प्रत्यक्ष अव्ययांपासूनही ते अर्थ काढूं शकतात ! " या श्लोकांत ' अर्थ ' व ' अव्यय ' हे द्व्यर्थी शब्द होत हें उघडच आहे.

वक्त्रं पूर्णशशी सुधाऽधरलता दंता मणिश्रेणयः
कांतिः श्रीर्गमनं गजः परिमलस्ते पारिजातद्रुमः ॥
वाणी कामदुधा कटाक्षलहरी तत्कालकूटं विषम्
मन्ये सुंदरि हा श्रमाय मथितो मूढैः सुरैः सागरः॥५४३॥

" मुख हें पूर्णचंद्र होय, अधरपल्लव हा सुधामय, दांतांची पंक्ति ही जणूं रत्नेंच होत, शरीरसौंदर्य हें लक्ष्मी होय, गजगति गमनाचे ठायीं आहे, निःश्वासाचे ठायीं पारिजाताचा सुवास अधिष्ठित आहे, वाणी केवळ कामधेनुच आणि कटाक्ष हे कालकूटतुल्य होत;- -मग इतकें सर्व आयतें सिद्ध असतां जेव्हां देवांनी समुद्रमंथनाचा येवढा खटाटोप केला तेव्हां ते मूर्ख नव्हेत ?"

इंदुं निंदति चक्रवाकयुगुलं भासां निधिं कौशिकः
स्वादु क्षीरमरोचकी सुकृतिनं पापी जडः पंडितम् ॥
त्यक्तं सर्वजनैः खलः कटुवचा ग्राम्यः पुमान्नागरम्
कः पैतामहगोलकेऽत्र निखिलैः संमानितो वर्तते ॥५४४॥

" चक्रवाकांचा जोडा चंद्रास निंदतो, दिवाभीत सूर्याचा तिटकारा करतें, ज्याच्या तोंडाला रुची नाहीं तो मधुर जें दुग्ध त्यास नांव ठेवतो, पापी पुण्यवंताची व मूर्ख पंडिताची निंदा करतो, कटुभाषण करणारा जो खळ तो सर्वांनीं सोडलेल्यास दोष देतो आणि गांवढळ मनुष्य शहरवासी पुरुषास वाईट म्हणतो,—तेव्हां या ब्रह्मांडगोलांत सर्वांनी संमानित असा कोण आहे बरें ? "

" सूर्याचें तेज असंगत झालें आणि काजव्यांची मंडळी चमकूं लागली, हंसांचें कूजित बंद झालें आणि दिवाभीत शब्द करायाला लागले, ही परम शोचनीय स्थिति न साहून शुद्ध जी कमलिनी ती भ्रमरांच्या मिषानें जणों काय विष प्राशनच करीत आहेशी भासते ! "

गतः स कालो यत्रासन्देवाः सेवानुवर्तिनः ॥
दशानन दशां पश्य तरंति दृषदोंऽभसि ॥ ५६३ ॥

" हे रावणा ! ज्या काळीं प्रत्यक्ष देव हे तुझे सेवक झाले होते तो काळ गेला; आतांच्या काळाचा महिमा पहा, कीं पाण्यावर दगड तरूं लागले आहेत !"

काकैः सह विरुद्धस्य कोकिलस्य कलागिरः ॥
खलसंगेऽपि नैष्ठुर्यं कल्याणप्रकृतेः कुतः ॥ ५६४ ॥

" काकांचा आणि कोकिलांचा जरी विरोध आहे तरी कोकिलानें मधुरवाणी टाकली आहे कीं काय ? नाहीं. खलांचा संसर्ग पडला असतांही सुस्वभाव मनुष्य निष्ठुरत्व धारण करीत नाहीं ! "

सखे साहजिकं प्रेम दूरादपि विजायते ॥
चकोरीनयनद्वंद्वमानंदयति चंद्रमाः ॥ ५६५ ॥

" हे मित्रा ! साहजिक जें प्रेम तें दूर अंतरावरूनही जडतें; पहा, चकोरीच्या नेत्रयुग्मास आकाशस्थ चंद्र आल्हाद देतो ! "

किं तया सुमहत्याऽपि श्रिया देशांतरस्थया ॥
रिपवो यां न पश्यंति सुहृद्भिर्या न भुज्यते ॥ ५६६ ॥

" दूरच्या देशांत असलेल्या संपत्तीचा काय उपयोग ? कीं जी पाहून शत्रु झुरत नाहींत आणि मित्र जिचा उपभोग घेत नाहींत ! "

सौहार्दस्वर्णरेखाणामुच्चावचभिदाजुषाम् ॥
परोक्षमिति कोऽप्यस्ति परीक्षानिकषोपलः ॥ ५६७ ॥

" मैत्रीरूप भिन्न भिन्न सुवर्णरेखांची परीक्षा करण्याचा एक मोठा उत्कृष्ट निकष आहे; तो कोणता ? तर परोक्ष ! " म्हणजे कोणाचें आपणावर किती प्रेम आहे हें परोक्ष भाषणावरून तेव्हांच कळतें !

द्यूते पणः प्रणयकेलिषु कंठपाशः
क्रीडापरिश्रमहरव्यजनं रतांते ॥
शय्या निशीथसमये जनकात्मजायाः
प्राप्तं मया विधिवशादिदमुत्तरीयम् ॥ ५६८ ॥

" जें सीतेचें उत्तरीय (शेला) द्यूताचे वेळेस पण लावावयास उपयोगीं पडत असे, प्रणयक्रीडेचे वेळीं जें कंठपाश होत होतें, सुरतानंतर जें श्रमपरिहार करणारें व्यजन होत होतें आणि मध्यरात्रीं प्रसंगवशात् शय्याही होत असे, तें आज मला सुदैवेंकरून प्राप्त झालें ! "

दातुरापत्तिसंप्राप्तौ याचके समुपस्थिते ॥
नास्तीति वाग्जीवितयोर्बहिर्निःसरणे रणः ॥ ५६९ ॥

" याचक याचना करायाला आला आणि दात्याला तर आपत्ति प्राप्त झालेली. तेव्हां ' नाहीं ' ह्मणतांना दात्याच्या जीविताचा आणि वाणीचा झगडा होतो; म्हणजे वरील शब्द उच्चारणें त्यास मरणप्राय होऊन जातें ! "

मौखर्यं लाघवकरं मौनमुन्नतिकारकम् ॥
मुखरं नूपुरं पादे कंठे हारो विराजते ॥ ५७० ॥

" वाचाळपणा हा लघुत्व आणणारा आहे आणि मौन हें उन्नति देणारें आहे; पहा कीं, निरंतर शब्द करणारीं जीं नूपुरें त्यांचें अधिष्ठान पायांवर आणि मुका जो मौक्तिकहार तो कंठाचे ठायीं धारण केला जातो ! "

त्वयि वर्षति पर्जन्ये सर्वे पल्लविता द्रुमाः ॥
अस्माकमर्कवृक्षाणां जीर्णे पत्रेऽपि संशयः ॥ ५७१ ॥

" हे पर्जन्या ! तूं वृष्टि केली असतां सारे वृक्ष पल्लवीत झाले; पण आम्ही जे अर्कवृक्ष (रुई) त्या आम्हांस जीर्णपत्राविषयीं सुद्धां वानवा ! "

जिह्वे प्रमाणं जानीहि भोजने भाषणेऽपि च ॥
अतिभुक्तिरतीवोक्तिः सद्यः प्राणापहारिणी ॥ ५७२ ॥

" हे जिव्हे ! भोजन व भाषण या दोहोंतही परिमित असत जा; कां कीं, अतिभोजन व अतिभाषण हीं दोन्हीं तात्काळ प्राणहरण करणारीं होत? " म्हणजे मर्यादा सोडून दोन्हीही केलीं असतां घात होतो !

संचारिणी कांचनवल्लरीव विद्युल्लता वा पतिता नभस्तः ॥
घृतस्य धारा पतिता न जाने दिवं गता वाऽथ भुवं गता वा ॥५७३॥

कोणी विनोदी कवि तुपाच्या धारेचें वर्णन करतोः—" ही धार इतकी चंचल आहे कीं, जणों काय हलणारी सुवर्णवल्लीच, किंवा आकाशांतून पडलेली विद्युल्लताच; शिवाय तिचें रूप इतकें सूक्ष्म आहे कीं, ती पडली केव्हां तीही समजली नाहीं; मला तर असाही भ्रम झाला कीं, ती आकाशांत गुप्त झाली किंवा भूमींत गडप झाली, कोण जाणे ? "

नेपथ्यादपि राजते हि नितरां व्यालुप्तभूषाननम्
संभोगश्रममीलितं विजयते चक्षुः कटाक्षादपि ॥
गाढालिंगनकौतुकादपि नवं दोर्वल्लिविस्रंसनम्
प्रत्यालापरसादपि प्रियतरं मौनं कुरंगीदृशः ॥ ५७४ ॥

" रतिप्रसंगेंकरून ज्यावरची पत्रादिरचना विलुप्त झालेली आहे असें मुख पाहिल्यापरीस अधिक खुलतें, संभोगश्रमास्तव निमीलित झालेलीं नेत्रें कटाक्षाहून अधिक शोभा देतात, गाढालिंगनाच्या सुखापेक्षां बाहुद्वयाचें शिथिलत्व हें विशेष रमणीय वाटतें आणि प्रत्युत्तरापेक्षांही श्रांतताजन्य जें मौन तें प्रियकर होतें ! "

सरसिरुहोदरसुरभावधरितबिंबाधरे मृगाक्षि तव ॥
वद वदने मणिरदने तांबूलं केन लक्षयाम वयम् ॥ ५७५ ॥

" हे मृगनयने ! कमलाच्या गाभ्याप्रमाणें सुवासिक आणि तोंडल्याचा गर्व हरण करणारा ज्याचा अधरोष्ठ आहे, तसेंच ज्यांतील दंतपंक्ति रत्नांप्रमाणें झळकते, अशा तुझ्या मुखाचे ठायीं तांबूल आहे कीं नाहीं हें आम्हीं कशावरून ओळखावें ? " म्हणजे तांबूलाच्या योगानें प्राप्त होणारे जे धर्म—सुवास, अधररक्तिमा, आणि दंतशुभ्रता,—ते तुझ्याठायीं स्वभावसिद्धच आहेत; तेव्हां अर्थातच तांबूलचर्वण हें पुनरुक्त होय !

गुरुषु मिलितेषु शिरसा प्रणमसि लघुषून्नता समेषु समा ॥
उचितज्ञाऽसि तुले किं तुलयसि गुंजाफलैः कनकम् ॥५७६॥

" हे तुले ! गुरूंशीं तूं नम्रभाव प्रगट करतेस, लघूंशीं उन्नतीनें वागतेस

आणि सामान्यांशीं बरोबरीनें राहतेस, ही तुझी उचितज्ञता प्रशंसा करण्यासारखी आहे खरी; पण गुंजेची आणि सोन्याची तुलना करतेस हें किती असमंजस आहे ! ”

ग्रंथिलतया किमिक्षोः किमपभ्रंशेन भवति गीतस्य ॥
किमनार्जवेन शशिनः किं दारिद्र्येण दयितस्य ॥ ५७७ ॥

“ ऊंस गांठ्याळ असला म्हणून काय झालें ? गाण्यांत वर्णापभ्रंश झाला म्हणून माधुर्याची काय हानि आहे ? चंद्राची कोर वांकडी असली म्हणून काय बिघडलें ? वल्लभाच्या दारिद्र्यास्तव अनुरक्त स्त्रीचा प्रेमा उडेल काय ? ”

अप्युत्तमात्प्रलपतो बलाच्च परिजल्पतः ॥
सर्वतः सारमादद्यादश्मभ्य इव कांचनम् ॥ ५७८ ॥

“ उत्तम भाषण करणारापासून किंवा मोठ्या कष्टानें जो बोलतो त्यापासून सार काढून घेत असावें; कसें ? तर दगडांतून सोनें काढतात त्याप्रमाणें ! ”

किं पुष्पं किं फलं चास्य करीरस्य महात्मनः ॥
येन वृद्धिं समासाद्य न कृतः पत्रसंग्रहः ॥ ५७९ ॥

“ या महात्म्याच्या करीराची काय थोरवी सांगावी ? कीं ज्यानें वृद्धीसमयीं नुसता पत्रांचाही संग्रह केला नाहीं; मग पुष्पाची किंवा फलाची गोष्ट तर दूरच ! ”

पुराणांते श्मशानांते मैथुनांते च या मतिः ॥
सा मतिः सर्वदा चेत्स्यात्को न मुच्येत बंधनात् ॥५८० ॥

“ पुराणश्रवणानंतर, स्मशानयानाच्या नंतर आणि मैथुनावसानीं जी मनाची स्थिति होते ती जर सदोदित राहील, तर संसारबंधनापासून कोण मुक्त होणार नाहीं ? ”

दूरस्थाः पर्वता रम्या वेश्या च मुखमंडने ॥
युद्धस्य वार्ता रम्या च त्रीणि रम्याणि दूरतः ॥ ५८१ ॥

“ डोंगर दुरून साजरे, वेश्येचें रमणीयत्व तेवढें चेहरेपट्टीवर पाहून

घ्यावें, आणि युद्धाची वार्ता मात्र रम्य; या तिहींचा साक्षात् प्रसंग करण्याच्या भरीस कोणीं पडूं नये ! ''

न स्वल्पमप्यध्यवसायभीरोः करोति विज्ञाननिधिर्गुणं हि ॥
अंधस्य किं हस्ततलस्थितोऽपि प्रकाशयत्यर्थमिह प्रदीपः ॥५८२॥

" ज्याला कृति करून दाखविण्याचा दम नाहीं त्याच्यापाशीं केवळ ज्ञानाचें मोठें कोठारही जरी असलें तरी त्यापासून कांहीं निष्पन्न होणार नाहीं. पहा कीं, अंधळ्यानें आपल्या हातावर जरी दिवा घेतला असला तरी त्यापासून त्यास पदार्थदर्शन होणार आहे काय ? ''

व्यजनमरुनः श्वासश्रेणीमिमामुपचिन्वते
मलयजरसो धाराबाष्पं प्रपंचयितुं प्रभुः ॥
कुसुमशयनं कामास्त्राणां करोति सहायताम्
द्विगुणगरिमा कामोन्माथः कथं नु विरंस्यति ॥ ५८३ ॥

" विंझण्याचा वारा हा निश्वासवातास वाढवितो, चंदनाचा रस हा अश्रुधारांची वृद्धि करतो आणि पुष्पशय्या ही कामायुधांस साह्य मात्र होते; मग अशा योगानें कामाची बाधा ही दुणावली असतां ती दूर कशी व्हावी ?''

आदाय वारि परितः सरितां मुखेभ्यः
किं तावदर्जितमनेन दुरर्णवेन ॥
क्षारीकृतं च वडवादहने हुतं च
पातालकुक्षिकुहरे विनिवेशितं च ॥ ५८४ ॥

" चोहोंकडून नद्यांच्या मुखांपासून जलौघ घेऊन दुष्ट समुद्रानें काय मिळविलें बरें ? येवढें मात्र केलें कीं, मूळचें गोडें पाणी होतें तें खारट करून टाकलें, कांहीं वडवाग्नीच्या मुखीं घातलें आणि कांहीं पाताळाच्या खबदाडींत ठेवून दिलें ! ''

शक्रादरक्षि यदि पक्षयुगं तथाऽपि
मैनाक संति तव नेह गतागतानि ॥

निःसत्त्वता च निरपत्रपता च किंतु
पाथोनिधौ निवसता भवताऽर्जिताऽत्र ॥ ५८५ ॥

" हे मैनाका ! तुला समुद्रानें आपल्या पोटांत घेतल्यामुळें तुझ्या पंखाचा बचाव झाला हें खरें; पण पूर्वीप्रमाणें आतां तुला आकाशांत संचार कोठें करतां येतो आहे ? त्याप्रमाणेंच सागराश्रय केल्यानें तुझें दुर्बलत्व व निर्लज्जत्व जगप्रसिद्ध झालें हें तूं कसें जाणत नाहींस ? "

तृषां धरायाः शमयत्यशेषां यः सोऽम्बुदो गर्जति गर्जतूच्चैः ॥
यस्त्वेष कस्यापि न हंति तृष्णां स किं वृथा गर्जति निस्त्रपोऽब्धिः॥५८६॥

" जो मेघ पृथ्वीची सारी तृषा शमवितो तो गर्जतो हें ठीकच आहे, तो खुशाल मोठ्यानें गर्जना करो; पण जो अदत्त कोणाचीही ताहान भागवीत नाहीं तो समुद्र निर्लज्जाप्रमाणें व्यर्थ गर्जना करतो हें काय ? "

क्रौंचः क्रीडतु कुर्दतां च कुररः कंकः परिष्वज्यताम्
मद्गुर्माद्यतु सारसश्च रसतु प्रोड्डीयतां टिट्टिभः ॥
भेकाः संतु बका वसंतु चरतु स्वच्छंदमाटिस्तटे
हंहो पद्मसरः कुतः कतिपयैर्हंसैर्विना श्रीस्तव ॥ ५८७ ॥

" हे पद्मसरोवर ! तुझे ठायीं क्रौंच हा क्रीडा करो, कुरर खिदळो, कंक तुला आलिंगन देवो, मद्गु तुझ्या उदकाचें सेवन करून मत्त होवो, सारस शब्द करो, टिट्टिभ उडो, बेडूक व बगळे हे तुझ्या आश्रयानें असोत व आटि हा तुझ्या तीरीं स्वच्छंदेंकरून विहार करो; पण हें सर्व असूनही कांहीं हंस जर तुझ्याजवळ नाहींत तर तुला कोठली शोभा ? "

यावद्यावद्भवति कलया पूर्णकामः शशांक-
स्तावत्तावद्द्युतिमयवपुः क्षीयते सा मृगाक्षी ॥
मन्ये धाता घटयति विधुं सारमादाय तस्या-
स्तस्माद्यावन्न भवति सखे पूर्णिमा तावदेहि ॥ ५८८ ॥

" चंद्राची एकेक कळा जों जों वाढत जाते तों तों मृगनयनेच्या कांतिमय शरीराचा ऱ्हास होतांना दृष्टीस पडतो, यावरून असें वाटतें कीं ब्रह्म-

देव हा तिच्या शरीरलावण्यापासून चंद्रास निर्माण करतो; तर हे मित्रा! जोंवर पूर्णिमा दूर आहे तोंवर तूं तिला जाऊन भेट!"

संचारो रतिमंदिरावधि सखीकर्णावधि व्याहृतम्
चेतः कांतसमीहितावधि महामानोऽपि मौनावधि ॥
हास्यं चाधरपल्लवावधि पदन्यासावधि प्रेक्षितम्
सर्वं सावधि नावधिः कुलभुवां प्रेम्णः परं केवलम् ॥५८९॥

"कुलस्त्रियांचा संचार म्हटला म्हणजे रतिमंदिरापर्यंत, भाषण सखीच्या कानीं पडे तोंपर्यंत, मनाचा व्यापार पतिवांछित जाणण्यापर्यंत, अतिशयित मान म्हटला म्हणजे मौनधारण, हंसणें अधरपल्लवावेरी आणि पाहणें पाऊल टाकण्यापर्यंत; एका गोष्टीस मात्र त्यांच्या ठायीं मर्यादा नाहीं, ती गोष्ट कोणती? तर पतिविषयक प्रेम!"

सत्यमेव गदितं त्वया विभो जीव एक इति यत्पुराऽवयोः ॥
अन्यदारनिहता नखव्रणास्तावके वपुषि पीडयंति माम् ॥५९०॥

"हे प्राणनाथा! आपण जें मला सांगितलें, कीं तुझा व माझा देह हे एकच आहेत हें सर्वथा खरें आहे. यास प्रत्यंतर पहा कीं, अन्य स्त्रीनें आपल्या शरीरास केलेलीं नखक्षतें तिसऱ्या ठिकाणीं मला येऊन टोंचलीं!"

विप्रियमप्याकर्ण्य ब्रूते प्रियमेव सर्वदा सुजनः ॥
क्षारं पिबति पयोधेर्वर्षत्यंभोधरो मधुरमंभः ॥ ५९१ ॥

"सज्जन पुरुष अप्रिय भाषण श्रवण करूनही नेहेमीं प्रियच बोलत असतात; ज्याप्रमाणें मेघ हा समुद्राचें क्षारोदक पिऊन मधुरजलाचाच वर्षाव करतो!"

मेरुर्दूरगतो महान्हिमगिरिः प्रालेयमात्रोऽभव-
च्चंद्रः श्रीसहितोऽपि याचकभयात्क्षीणत्वमालंबते ॥
कौपीनं धृतवान्हरोऽपि सहसा विष्णुर्जले संस्थितो
वारां राशिरपेयतामुपगतः को नामः दातुं क्षमः ॥ ५९२ ॥

"मेरु याचकांस भिऊन दूर सरला, हिमालय हिमाच्छादित होऊन

बसला, चंद्र हा लक्ष्मीयुक्त खरा, पण तोही वरील भयानें क्षीण झाला, शिवानें कौपीन धारण केलें. विष्णु पाण्यांत जाऊन दडला आणि समुद्र हा अपेय झाला, तेव्हां आतां दाता उरला तरी कोण ? ”

कृष्णा ते कचसंहतिरंबुजनयने तवाधरः शोणः ॥
त्वं सुरतरंगिणी कथमभितस्तापी न ते वियोगः स्यात् ॥५९३॥

“ हे कमलनयने ! तुझी वेणी ही कृष्णा (नदीविशेष, पक्षीं, काळी) आहे; तुझा अधरोष्ठ हा शोण (नदविशेष; पक्षीं, आरक्त) आहे आणि तूं स्वतः सुरतरंगिणी (देवनदी; पक्षीं, कामिनी) आहेस; मग तुझा वियोग हा तापी (नदीविशेष; पक्षीं, ताप देणारा) कसा नसेल ? ”

स्निग्धमालप सुरूक्षमेव वा त्वत्कथैव सखि मे रसायनम् ॥
शीतलं सलिलमुष्णमेव वा पावकं हि शमयेदसशंयम् ॥ ५९४ ॥

“ हे सखि ! तूं गोड बोल किंवा कठोर भाषण कर; तुझें भाषण हेंच मला आल्हाद देतें. पहा कीं, उदक हें थंड असो अगर ऊन असो अग्नीचा उपशम करणारच ! ”

सुमध्ये वाग्भंगैर्वचनविधिमंगीकुरु न वा
स्मितज्योत्स्नाकांतं कुरु वदनमेतन्मयि न वा ॥
त्रिलोकीमूर्धन्या यदि विविधपुण्याधिकतया
मया दृष्टाऽसि त्वं तदिह सफलं मेऽजनि जनुः ॥ ५९५ ॥

“ हे सिंहमध्ये ! तूं कुटिलोक्तीचें भाषण कर अथवा न कर; किंवा मजकडे पाहून स्मितचंद्रिकेनें विराजमान असें मुख कर किंवा करूं नको; माझें जन्म येवढ्यानेंच सफल झालें, कीं त्रैलोक्यांत सौंदर्यानें श्रेष्ठ अशी जी तूं ती माझ्या विविध पुण्यांच्या कमाईनें आज माझ्या दृष्टीस पडलीस ! ”

भानुबिंबमिदमस्तगामि च प्रोद्यतं कुमुदबंधुमंडलम् ॥
दृश्यते रतिपतेः प्रवासिनां क्रोधरक्तमिव लोचनद्वयम् ॥ ५९६ ॥

“ एकीकडे अस्तास जाणाऱ्या सूर्याचें बिंब व दुसरीकडे उदय पावणारें चंद्रबिंब दिसत आहे; हीं प्रवासिजनांस रतिपतीचीं दोन आरक्त झालेलीं नयनेंच काय अशीं भासतात ! ”

सहते शरशतघातानाजानेयः कशां नैव ॥
सहते विपत्सहस्रं मानी नैवापमानलेशमपि ॥ ५९७ ॥

" जातिवंत घोडा हा रणांगणावर शेंकडों बाणांचे घाव सहन करतो, पण चाबकाचा फटकारा त्यास बिलकुल सहन होत नसतो; तसेंच जो मानी आहे तो हजारों विपत्तींस दाद देत नाहीं, पण कोणाचें फट म्हटलेलें त्यास खपत नाहीं ! "

दृढतरगलकनिबंधः कूपनिपातोऽपि कलश ते धन्यः ॥
यज्जीवनदानैस्त्वं तर्षामर्षं नृणां हरसि ॥ ५९८ ॥

" हे कलशा ! तुझ्या मानेला फांस लावून लोक तुला विहिरींत ढकलून देतात असें जरी आहे तरी तूं धन्य आहेस; कां कीं तृषेनें पीडलेल्यास तूं जीवनाचें दान करतोस ! "

प्राप्य प्रमाणपदवीं को नामाऽऽस्ते तुलेऽवलेपस्ते ॥
नयसि गरिष्ठमधस्तात्तदितरमुच्चैस्तरां कुरुषे ॥ ५९९ ॥

" हे तुले ! तुला सर्व लोक प्रमाण समजूं लागले येवढ्यानें तुझ्या अंगीं हा केवढा ताठा आला पहा ! कीं वजनदाराचें पारडें खालीं बसवून हलक्यास तूं उंच पदवीला पोंचवितेस ! "

को हि तुलामधिरोहति शुचिना दुग्धेन सहजमधुरेण ॥
तप्तं विकृतं मथितं तथाऽपि यत्स्नेहमुद्गिरति ॥ ६०० ॥

" स्वभावेंकरून मधुर जें दुग्ध त्याची सर कोणास येणार आहे ? पहा कीं, त्यास तापविलें, त्यांत विरजण घातलें, त्याचें मथन केलें, तरी शेवटीं काय ? स्नेहाचा (लोण्याचा) च आविर्भाव करतें ! "

जगति विदितमेतत्काष्ठमेवासि नूनम्
तदपि च किल सत्यं कानने वर्धितोऽसि ॥
नवकुवलयनेत्रीपाणिसंगोत्सवेऽस्मि-
न्मुसल किसलयं ते तत्क्षणाद्यन्न जातम् ॥ ६०१ ॥

" हे मुसळा ! साऱ्या जगास माहितच आहे कीं तूं काष्ठ आहेस, शिवाय तूं मुळींच अरण्यांत वाढलेलें आहेस; तेव्हां या नवकुवलयनेत्रीच्या कर-

स्पर्शाचा महालाभ तुला झाला असतां तुला जे तत्क्षणीं अंकुर फुटले नाहींत तें ठीकच आहे ! "

भेकेन क्वणता सरोषपरुषं यत्कृष्णसर्पानने
दातुं कर्णचपेटमुज्झितभिया हस्तः समुल्लासितः ॥
यच्चाधोमुखमक्षिणी विदधता नागेन तूष्णीं स्थितम्
तत्सर्वं विषमंत्रिणो भगवतः कस्यापि लीलायितम् ॥६०२॥

" कृष्णसर्पावर रागानें जळफळून व त्यास टाकून बोलून त्याच्या मुसकाडींत देण्याकरितां बेडकानें जो बेलाशक आपला पंजा वर उचलला आणि अशा समयीं नागानें खालीं मान घालून डोळे मिटून वरील प्रकार जो सहन केला,—हें सर्व हे महामांत्रिका ! तुझ्या अद्भुत सामर्थ्याचें फल होय ! "

तृषार्तैः सारंगैः प्रति जलधरं भूरि विरुतम्
घनैर्मुक्ता धारा सपदि पयसस्तान्प्रति मुहुः ॥
खगानां के मेघाः क इह विहगा वा जलमुचा-
मयाच्यो नाऽऽर्तानामनुपकरणीयो न महताम् ॥६०३॥

" तृषार्त झालेल्या पक्ष्यांनीं मेघांकडे पाहून फार आक्रोश केला आणि मेघांनींही त्यांजवर दया करून जलधारांनीं त्यांचा संताप शमविला; आतां वस्तुतः पाहतां मेघ हे पक्ष्यांचे कोण व मेघांचे पक्षी हे कोण ? पण जे दुःखित होतात त्यांस सर्वांपाशीं याचना करणें आहे व थोर आहेत त्यांस उपकार करतांना आप्त किंवा अनाप्त हा कांहीं एक विचार नसतो ! "

शिला बाला जाता चरणरजसा यत्कुलशिशोः
स एवायं सूर्यः सपदि निजपादैर्गिरिशिलाम् ॥
स्पृशन्भूयो भूयो न खलु कुरुते कामपि वधूम्
कुले कश्चिद्धन्यः प्रभवति नरः श्लाघ्यमहिमा ॥६०४॥

" ज्या सूर्याच्या कुलांत उत्पन्न झालेल्या एका कुमारानें आपल्या पादस्पर्शेकरून शिलेची स्त्री केली, तो नित्य प्रतिपर्वतावर पादन्यास करून भ्रमण करीत असतो, पण अद्याप त्याच्या प्रभावानें एकही स्त्री बनली

नाहीं;—तेव्हां हेंच खरें कीं एकाची सर दुसऱ्याला येत नाहीं; नांव करून जाणारा असा पुरुष एकेक कुलांत एकेकदांच होऊन जातो ! "

दीप्यंतां ये दीप्तयै घटिता मणयश्च वीरपुरुषाश्च ॥
तेजः स्वविनाशाय तु भवति तृणानामिव लघूनाम् ॥ ६०५ ॥

" जसे रत्नदीप प्रकाशार्थ निर्माण केलेले असतात त्याप्रमाणें जे वीर्य-संपन्न पुरुष आत्मप्रभाव गाजवण्याकरतां या भूलोकावर सृष्टिकर्त्यानें पाठविलेले असतात ते आपलें शौर्य प्रगट करोत; पण त्यांचें पाहून हलक्यानें आपली मर्दुमकी दाखवूं पाहणें हें पेटलेल्या गवताप्रमाणें आहे,—केवळ आत्मविनाश हेंच त्याचें फळ ! "

शमयति गजानन्यान्गंधद्विपः कलभोऽपि स-
न्भवति सुतरां वेगोदग्रं भुजंगशिशोर्विषम् ॥
भुवमधिपतिर्बालावस्थोऽप्यलं परिरक्षितुम्
न खलु वयसा जात्यैवायं स्वकार्यसहो भरः ॥ ६०६ ॥

" गंधगज हा तरुण असतांही इतर हत्तींचा पराभव करतो, त्याप्रमाणेंच नागाच्या पोराचें विष वेगेंकरून तीव्रतर असतें; तेव्हां यावरून स्पष्ट आहे कीं, राजा हा बाल्यावस्थेंत असला तरी त्याच्या अंगीं पृथ्वीला आळा घालण्याचें सामर्थ्य असतें तें वयेंकरून प्राप्त होत नसतें, तर हा जातिगुणच समजायाचा ! "

जिह्वैकैव सतामुभे फणवतां स्रष्टुश्चतस्रश्च ता-
स्ताः सप्तैव विभावसोर्नियमिताः षट् कार्तिकेयस्य च ॥
पौलस्त्यस्य दशाभवन्फणिपतेर्जिह्वासहस्रद्वयम्
जिह्वालक्षशतैककोटिनियमो नो दुर्जनानां मुखे ॥ ६०७ ॥

" सज्जनांस जिव्हा एकच असते, सर्पास दोन असतात, ब्रह्मदेवास चार आहेत, अग्नीस सात व कार्तिकस्वामीस सहा आहेत, रावणास दहा होत्या आणि शेषास दोन हजार आहेत; पण दुर्जनांच्या तोंडांत किती लक्ष किंवा कोटी आहेत याचा कांहींच नेम सांगवत नाहीं ! "

यः पृष्ठं युधि दर्शयत्यरिभटश्रेणीषु यो वक्रता-
मस्मिन्नेव बिभर्ति यश्च किरति क्रूरध्वनिं निष्ठुरः ॥
दोषं तस्य तथाविधस्य भजतश्चापस्य गृह्णन्गुणम्
विख्यातः परमेष एव नृपतिः सीमा गुणग्राहिणाम् ॥ ६०८॥

"हे राजा ! तुझ्या गुणग्राहकत्वाचें काय वर्णन करावें ? पहा, हें तुझें धनुष्य युद्धाचे ठायीं शत्रुवीरसमुदायास आपली पाठ दाखवितें, तुझेच ठायीं आपलें वक्रत्व प्रगट करतें आणि निष्ठुर होत्सातें क्रूरध्वनि करतें; पण तें असें दोषयुक्त (पक्षीं, भुजाचा आश्रय करणारें) असतांही त्याचा तूं गुण (पक्षीं, दोरी) ग्रहण करतोस !"

नाऽऽलिंगंति कुचद्वयं भवदिभप्रोत्तुंगकुंभद्वय-
त्रासाद्वेणिलतासु नैव दधति प्रीतिं तवासिभ्रमात् ॥
भ्रूभंगान्भवदीयदुर्धरधनुर्भ्रांत्या भजंते न ते
वैरिक्षोणिभुजो निजांबुजदृशां भूमंडलाखंडल ॥ ६०९ ॥

"हे पृथ्वींद्रा ! तुझे शत्रु तुझ्या हत्तींच्या उंच गंडस्थळाच्या भ्रमानें आपल्या स्त्रियांस आलिंगन करीनातसे झाले, तुझ्या खड्गाच्या भ्रमानें त्यांस स्त्रियांच्या कबरीभाराकडे पहाण्याची भीति वाटूं लागली आणि तुझ्या भयंकर धनुष्याच्या भ्रांतीनें त्यांस स्त्रियांच्या भ्रुकुटि भयप्रद होऊं लागल्या आहेत !"

मधुरमिव वदंति स्वागतं भृंगनादै-
र्नतिमिव फलनम्रैः कुर्वतांऽमी शिरोभिः ॥
ननु ददत इवार्घ्यं पुष्पवृष्टिं किरंतः
कथमतिथिसपर्यां शिक्षिताः शाखिनोऽपि ॥ ६१० ॥

"हे आश्रमवृक्षही अतिथींची पूजा करावयास शिकले आहेत काय ? पहा हे भृंगांच्या गुंजारवांनीं जणूं काय मधुर भाषणयुक्त स्वागत करतात, फलांनीं नम्र झालेल्या माथ्यांनीं हे जसे काय नमन करतात आणि पुष्पवृष्टीच्या मिषानें अर्घ्यप्रदानच करिताहेतसे दिसतात !"

मकरीविरचनभङ्ग्या राधाकुचकलशपीडनव्यसनी ॥
ऋजुमपि रेखां लुंपन्बल्लववेषो हरिर्जयति ॥ ६११ ॥

" पत्रावलीची विरचना करण्याच्या मिषानें राधेच्या कुचपीडनाविषयीं लालस आणि सरळरेषा आली असतांही ती मोडून टाकणारा, असा बल्लव-रूपी हरि जय पावतो ! "

दंभोलिस्फूर्जदंभोधरविपुलतडिद्दंभगंभीरनादै-
रंभःसंभारसंभावनकुतुकि कुलं चातकानामनृत्यत् ॥
उर्ध्वं विन्यस्तचंचूपुटमुपरिपरिभ्राम्यदुत्पातवातै-
रंभोदोन्मुक्तमंभःकणमपि न चिरात्प्राप्य नम्रं मिथोऽभूत् ॥६१२॥

" मेघांचा गडगडाट व विजांचा चमचमाट पाहून चातकसमुदायास मोठी आशा उत्पन्न झाली कीं आतां जलवृष्टीची रगाडीच रगाडी होऊन जाईल, यास्तव ते उडूं बागडूं लागले व वर आपल्या चोंचा करून झंझावाताबरोबर मिसळून भ्रमण करूं लागले; पण सरतेशेवटीं मेघांपासून बिचाऱ्यांस एकही जलकण न प्राप्त होऊन लज्जायमान होत्साते सर्व जागच्या जागीं चीप बसले ! "

पततु नभसो गच्छत्वस्तं निमज्जतु वारिधौ
व्रजतु वरुणागारद्वारं प्रभाभिरनादृतः ॥
तदपि तरणिर्दत्त्वा पादं शिरःसु महीभृताम्
दलिततिमिरव्रातः प्रातः पुनः सकृदेष्यति ॥ ६१३ ॥

" सूर्य हा आकाशापासून पतन पावो, अस्ताप्रत जावो, समुद्रांत बुडो किंवा निष्प्रभ होत्साता वरुणगृहाच्या द्वारीं जावो; तरी येवढें निश्चित आहे कीं, तो अंधकारसमूहाचा नाश करून व पर्वतांच्या शिखरांवर पाय ठेवून पुनः उदयास येणार ! "

पक्षद्वंद्वविराजितोऽहममलं मीनान्नसेवे सदा
पुष्टांगः स कलादिभिः परिवृतश्चंद्रः समः किं मम ॥
सर्वस्थाणुशिरोगतोऽहममलं चंद्रं बको हासते
मात्सर्येण दुरात्मकोऽपि सुजनं दृष्ट्वा सदा हासते ॥६१४॥

" मी चंद्राप्रमाणें पक्षद्वयानें (दोन्ही अर्थ उघडच आहेत) विराजमान आहें, मी नेहेमीं मीनराशी (मत्स्यसमूह; पक्षीं, राशीविशेष) भोगीत असतों, शिवाय मी पुष्टांग आहें आणि चंद्राला तर कळा लागतात (नेहमीं न्यूनाधिक होत असतो), मग चंद्र माझी बरोबरी कशी पावेल ? तसेंच मी सर्व स्थाणूंच्या (वृक्षांचीं खोडें; पक्षीं, शिव) शिखरीं वास करतों;—याप्रमाणें स्वच्छ जो चंद्र त्यास बगळा हा हांसतो ! सारांश, दुर्जन हा मत्सरभावानें भलत्याशींच बरोबरी करून त्याचा उपहास करीत असतो ! "

समाप्तश्चायं सभापान्तरः सुभाषितसमुच्चयः ।

श्रीरस्तु.
